सन २०२०-२०२१ या वर्षाकरिता समिती दिनांक १३ जानेवारी २०२१ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परिक्षणाची कामे प्रमुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा. सभापती, विधानपरिषद व मा. अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक १३ जानेवारी २०२१ रोजी केले. समिती पद्धतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला " Mini Legislature " सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्त्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेरीहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो. परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तरी ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पद्धतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधामंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्त्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वक्षेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्त्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंतसुद्धा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा. सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरूरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारून संबंधित अधिका-यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुद्धा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुस-या सदस्यांनी माहिती विचारण्याची पद्धत जोपसली आहे. या पद्धतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयातील मुद्दे तयार करून आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करून विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्या दृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधाणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवत असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्द्यांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पद्धती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पद्धतीचे स्थान व महत्त्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोस्ताहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठारेपणे निर्णयदेखील घेतले आहेत. से करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचा-यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करून ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारून घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्यांची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करून काही चांगल्या बाबींचे समर्थन करून संबंधितांना प्रोस्ताहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २०१३-२०१४ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुर्नविलोकन व सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-२०१८ साठी गठीत झालेल्या समितीने जालना जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने जालना जिल्हा परिषदेस दिनांक २५, २६ व २७ सप्टेंबर २०१८ रोजी भेट देऊन श्रीमती निमा अरोरा, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता गठीत झालेल्या समितीने जालना जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिका-यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्द्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक ६ ऑगस्ट २०१९ व दिनांक १४ ऑगस्ट २०१९ रोजी जिल्हा परिषद, जालना संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या, प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री. मनुकुमार श्रीवास्तव, अप्पर मुख्य सचिव, महसूलस विभाग, श्री. श्यामलाल गोयल, अप्पर सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, श्रीमती वंदना कृष्णा, अप्पर सचिव, शालये शिक्षण विभाग, डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. अनुकुमार, प्रधान सचिव, पशुसंवर्धन विभाग, श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. अमिताभ गुप्ता, प्रधान सचिव, गृह विभाग, श्री. दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. राजेंद्र भागवत, सचिव, विधी व न्याय विभाग, एकनाथ डवले, सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री. विनायक देशमुख, ए.आय.जी.एल. अँड ओ., श्री दिनेश डिंगळे, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, श्री. महेंद्र हजारी, सह सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, श्री. सं.द. सुर्यवंशी सह सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, श्री. मनोहर ठोंबरे, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. दे. आ. गावडे, सह सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. यु.ब. अजेटराव, उप सचिव, गृह विभाग, श्री. रमेश चव्हाण, उप सचिव, महसूल विभाग, श्री. विजय चौधरी, उप सचिव (पस), कृषी व पणन विभाग, डॉ. एस. एस. पंचपोर, अवर सचिव, पदुम विभाग, श्री. गणेश पवार, अवर सचिव, पाणीपुरवठा विभाग व स्वच्छता विभाग, श्री. ए.जी.गोटेकर, अवर सचिव, वित्त विभाग, श्री. पारस बोथरा, उपायुक्त (अस्थापना), विभागीय आयुक्त कार्यलाय, जालना, श्री. व्ही.एम. रसाळ, सहाय्यक

आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद, श्री. के. ए. चव्हाण, सहाय्यक संचालक (लेखा), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद तसेच श्री. सु.रा. भोसले, संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या जालना परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्द्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०२०-२०२१ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक ३ मार्च २०२१ रोजीच्या बैठकीत प्रारूप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरूस्तींसह संमत केला.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक ३ मार्च २०२१.

**संजय रायमुलकर,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | परिच्छेद क्रमांक (४) | पृष्ठ क्रमांक (५) |
|---|---|---|---|---|
| (१) | एक | पर्यावरण संतुलित ग्रामसमृद्धी योजना अंतर्गत सौरदिवे खरेदीबाबत (सन २०१३-१४) | ३.५२/१४ | .. |
| (२) | दोन | महाऑनलाईन तांत्रिक मनुष्यबळ (कंत्राटी) यांची १३ व्या वित्त आयोगामधून ९०% वेतनाची रक्कम अदा करणेबाबत. (सन २०१३-१४) | ३.५३/२० | .. |
| (३) | तीन | मानव विकास कार्यक्रम अंतर्गत इयत्ता ८ वी ते १२ वीच्या मुलींना सायकल वाटप करणेबाबत व गट स्तरावरील अभिलेखे न दर्शविलेबाबत (सन २०१३-१४) | ३.१३५/७ | .. |
| (४) | चार | कामधेनू दत्तक ग्रामविकास योजना जिल्हा योजनेतून औषधी खरेदीबाबत. (सन २०१३-१४) | ३.८७३/११ | .. |
| (५) | पाच | तेराव्या वित्त आयोगाअंतर्गत केलेल्या विविध दुरूस्ती व बांधकामाबाबत. (सन २०१३-१४) | ४.३२८/१० | .. |
| (६) | सहा | सामुहिक विकास योजनेअंर्गत केलेल्या अंगणवाडी बांधकामाबाबत. (सन २०१३-१४) | ४.३२९/८ | .. |
| (७) | सात | खाजगी टँकरने पाणीपुरवठा केल्याबाबत कंत्राटदाराला केलेल्या प्रदानामधील अनियमिततेबाबत. (सन २०१३-१४) | ४.४७१/१३ | .. |
| (८) | आठ | पंचायत समित्यांनी लेखापरिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे. (सन २०१३-१४) | ४.७९३/१० | .. |
| (९) | नऊ | सन २०१३-२०१४ च्या वर्षात पंचायत समित्यांमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (शिक्षक समायोजनाबाबत). (सन २०१३-१४) | ४.७९८/३३ | .. |
| (१०) | दहा | सर्वसाधारण शिफारशी | | |
| | | **समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त** | | |

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, जालना

## पर्यावरण संतुलित ग्रामसमृद्धी योजना अंतर्गत सौरदिवे खरेदीबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.५२/१४ (सन २०१३-१४)**

सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, जालना सन २०१३-१४ मध्ये २१२ ग्रामपंचायती या योजनेंतर्गत ६३६ नग सौर पथदिवे खरेदीसाठी रुपये ८७,९२,७००/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) ग्रामपंचायतीने लोकवर्गणी रुपये ४,२२५/- दिनांक ३० एप्रिल, २०१३ पूर्वी जमा करून घेतले नाही.

(२) स्पेस सोलार औरंगाबाद हे पुरवठादार सन २०१२-१३ मध्ये दरकरारमध्ये समाविष्ट नाही.

(३) पुरवठादाराशी केलेला करारनामा वैध नाही.

(४) सदर योजनेस प्रशासकीय तांत्रिक मान्यता नाही, त्यामुळे रुपये ८७,९२,७००/- चा खर्च लेखापरिक्षणात तात्पुरता अमान्य ठेवण्यात येत आहे.

**शासन निर्णय (अभिप्राय)**

(१) शासन निर्णय, कक्ष अधिकारी व जलसंधारण विभाग यांचे पत्र क्र.सौदिवे/२०१२/प्र.क्र.७३/परा-६, दिनांक १५ फेब्रुवारी, २०१२ व कक्ष अधिकारी आदेश/२०१३ प्र.क्र.१५/पंरा-६, दिनांक ३० मार्च, २०१३ अन्वये ग्रामपंचायती सौरपथदिवे बसविण्यासाठी पात्र.

(२) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.सौ/दि-२०१३/प्र.क्र.१८/पंरा/दिनांक ३० मार्च, २०१३ नुसार स्पेस सोलार औरंगाबाद पुरवठादाराचे दरसूचीमध्ये नाव समाविष्ठ नाही.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १२५ नुसार प्रशासकीय/तांत्रिक मान्यता घेण्यात आली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जालना यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला**

(१) सदरील योजनेचा शासन निर्णय दिनांक ३० मार्च, २०१३ चा असल्यामुळे ग्रामपंचायत स्तरावर योजनेची प्रसिद्धी व प्रचार करणेसाठी अत्यंत कमी वेळ असल्यामुळे दिनांक ३० एप्रिल, २०१३ पर्यंत ग्रामपंचायतीकडून वर्गणी गोळा होऊ शकली नाही. तथापि, सदरील रक्कम दिनांक १६ डिसेंबर, २०१३ पर्यंत जमा करून घेण्यात आलेली आहे.

(२) ग्रामविकास विभाग, मुंबई यांचे शासन निर्णय दिनांक ३० मार्च, २०१३ मध्ये मेडाच्या दरकराराप्रमाणे मे.स्पेस सोलार, औरंगाबाद या एजन्सीची जालना जिल्हा मधील ग्रामपंचायतीच्या रस्त्यांवर सौर पथ दिवे बसविणेसाठी शासनाने नेमणूक करून दिली आहे. सदर एजन्सीचे नाव दिनांक ३० मार्च, २०१३ चे शासन निर्णयासोबत जिल्हानिहाय यादीमध्ये अनुक्रमांक १६ वर नमूद केलेला आहे. तसेच सन २०१२-१३ च्या मेडा च्या दरपत्रकात सदरील संस्थेचे नाव अ.क्र.६४ वर आहे. (सोबत शासन निर्णय दिनांक ३० मार्च, २०१३ ची प्रत व मेडाचे दरपत्रक सलग्न यादी).

(३) ग्रामविकास विभाग, मुंबई यांचे शासन निर्णय दिनांक ३० मार्च, २०१३ मध्ये मुद्दा क्र.४ व ५ मध्ये सौर पथ दिव्यांचा कार्यक्रम राबविताना महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाने (मेडा) निर्गमित केलेल्या दरकरारतील सुचीतील सर्व अटी व शर्ती संबंधित एजन्सीला बंधनकारक आहेत. त्याप्रमाणे प्रस्तूत कार्यालयाचे आदेश दिनांक ३० मार्च, २०१३ अन्वये संबंधित एजन्सीला कळविण्यात आले आहे व त्याबाबतचा करारनामा रुपये १८,६००/- चे बंधपत्रावर घेणे आवश्यक होते. परंतु रुपये १००/- च्या बंधपत्रावर करण्यात आला होता. संबंधितांकडून रुपये १८,५००/- वसूल करण्यात येवून शासनखाती जमा करण्यात आलेली आहे.

(४) ग्रामविकास विभाग, मुंबई यांचे पत्र दिनांक २७ जुलै, २०११ तसेच दिनांक २६ ऑगस्ट, २०१३ अन्वये सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात सौर पथदिवे कार्यक्रम राबविताना स्वतंत्ररित्या प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता घेण्याची अट शिथील केलेली आहे. (सोबत शासन पत्र दिनांक २७ जुलै, २०११ व दिनांक २६ ऑगस्ट, २०१३ ची प्रत सलग्न).

(१) शासन पत्र दिनांक १५ फेब्रुवारी, २०१२ अन्वये जालना जिल्ह्यातील २१२ ग्रामपंचायत मध्ये सौर पथदिवे बसविणेसाठी ग्रामपंचायतींची निवड करून दिली आहे. तसेच शासन निर्णय दिनांक ३० मार्च, २०१३ अन्वये स्पेस सोलार एजन्सीची निवड करून देण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयानुसार जालना जिल्ह्यामध्ये २१२ ग्रामपंचायतीमध्ये सौर पथदिवे बसविण्याबाबतची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(२) शासन निर्णय दिनांक ३० मार्च, २०१३ अन्वये स्पेस सोलार एजन्सीची निवड करून देण्यात आलेली आहे. उक्त शासन निर्णयासोबत देण्यात आलेल्या निवड यादीमध्ये स्पेस सोलार, औरंगाबाद या पुरवठादाराचे नाव अ.क्र.१६ वर नमूद आहे. (सोबत शासन निर्णय दिनांक ३० मार्च, २०१३ व जिल्हानिहाय निवड झालेल्या एजन्सीची यादी संलग्न).

(३) ग्रामविकास विभाग, मुंबई यांची दिनांक २६ ऑगस्ट, २०१३ च्या मार्गदर्शक सूचनानुसार शासन निर्णय दिनांक ३० मार्च, २०१३ मधील परिशिष्ट ९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सदर योजनेस प्रशासकीय/तांत्रिक मान्यतेची अट शिथील केली आहे. (सोबत दिनांक २६ ऑगस्ट, २०१३ मार्गदर्शक सूचना संलग्न).

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

जालना जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सदर ग्रामपंचायतींची निवड कोणत्या निकषाप्रमाणे केली होती, या योजनेमध्ये किती ग्रामपंचायतींनी त्यांचा हिस्सा जमा केला व किती ग्रामपंचायतींमध्ये काम पूर्ण झाले. लोकवर्गणी जमा करून सौरदिवे लावण्याबाबत जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतींना अवगत केले होते काय, ग्रामपंचायतींनी लोकवर्गणी गोळा करून ती भरण्याबाबत आश्वासन दिले होते काय, ग्रामपंचायतींकडून लोकवर्गणी कधी भरुन घेतली? तसेच लोकवर्गणी जमा न करता सौरदिवे लावण्याची परवानगी का दिली?

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, पर्यावरण संतुलित ग्रामसमृद्धी योजनेचा शासन निर्णय दिनांक ३० मार्च, २०१३ रोजीचा असल्यामुळे ग्रामपंचायत स्तरावर योजनेची प्रसिद्धी व प्रचार करण्यासाठी अत्यंत कमी वेळ असल्यामुळे दिनांक ३० एप्रिल, २०१३ पर्यंत ग्रामपंचायतींकडून वर्गणी गोळा होऊ शकली नाही. सर्व ग्रामपंचायतींनी लोकवर्गणीचा १० टक्के हिस्सा दिलेला आहे. ग्रामपंचायतींकडून दिनांक १६ डिसेंबर, २०१३ पर्यंत लोकवर्गणी भरुन घेतलेली आहे.

यावर समितीने आक्षेप घेत विचारणा केली की, याचाच अर्थ करारनामा झाल्यानंतर लोकवर्गणी जमा केली आहे. ग्रामपंचायतीची सौरदिवे लावण्याबाबतची मागणी नसताना सुद्धा त्या ठिकाणी सौर पथदिवे लावून, त्यांना लोकवर्गणी जमा करण्यास बंधनकारक केले. वास्तविक पाहता ग्रामपंचायतींकडून विहित मुदतीत लोकवर्गणी भरुन घेण्याची जिल्हा परिषदेची जबाबदारी होती. शासन निर्णयानुसार सदरहू योजना राबविण्यासाठी दिनांक ३० एप्रिल, २०१३ पर्यंत लोकवर्गणी जमा करावयाची होती. परंतु जिल्हा परिषदेने दिनांक १६ डिसेंबर, २०१३ पर्यंत लोकवर्गणी जमा केली आहे. सौर पथदिवे खरेदीबाबत रुपये ८७,९२,७००/- इतक्या रकमेचे देयक कधी अदा करण्यात आले. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदरहू सौर पथदिव्यांचे देयक दिनांक २१ फेब्रुवारी, २०१४ रोजी अदा करण्यात आले होते.

यावर समितीने तत्कालिन आणि विद्यमान मुख्य लेखा व वित्त अधिका-यांना विचारणा केली की, लेखा संहितेमध्ये जिल्हा परिषदेचे आर्थिक सल्लागार म्हणून मुख्य लेखा व वित्त अधिका-यांची जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे हे खरे आहे काय, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले.

तद्नंतर समितीने मुख्य लेखा व वित्त अधिका-यांना विचारणा केली की, एखाद्या वस्तूचे देयक अदा करावयाचे असेल तर संहितेमध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, सर्व बाबी तपासून देयक अदा करावयास पाहिजे. परंतु या प्रकरणी लोकवर्गणी जमा झालेली नसताना कोणत्या आधारे देयक अदा करण्यात आले, देयक अदा करण्यापूर्वी सर्व बाबी तपासल्या होत्या काय, शिवाय तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या संदर्भातील कोणत्याही बाबींची तपासणी केली नाही. वास्तविक पाहता मुख्य कार्यकारी अधिका-यांनी विभाग प्रमुखांच्या कामकाजावर लक्ष द्यावयास पाहिजे होते, परंतु त्यांनी या प्रकरणी दुर्लक्ष केले. मुख्य लेखा व वित्त अधिका-यांनी सर्व बाबी तपासल्याशिवाय देयक अदा करता कामा नये. विहित तारखेपर्यंत लोकवर्गणी जमा झालेली नसताना तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिका-यांनी सौर पथदिव्यांचे देयक अदा कसे केले?

यावर तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विदित केले की, दिनांक १६ डिसेंबर, २०१३ पर्यंत लोकवर्गणी जमा झाली होती आणि सदरहू सौर पथदिव्यांचे देयक दिनांक २१ फेब्रुवारी, २०१४ रोजी अदा करण्यात आले. यावर समितीने विचारणा केली की, लोकवर्गणी जमा होण्यापूर्वीच मुख्य लेखा व वित्त अधिका-यांकडे देयक आले होते काय, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस नकारात्मक उत्तर दिले.

यावर समितीने आक्षेप घेत विचारणा केली की, मुळात दिनांक ३० एप्रिल, २०१३ या विहित तारखेपर्यंत लोकवर्गणी जमा करून घेतलेली नसताना उक्त योजनेची अंमलबजावणी कशी करण्यात आली. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, दिनांक ३० मार्च, २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार लोकवर्गणी जमा करण्यासाठी दिनांक ३० एप्रिल, २०१३ पर्यंतची मुदत दिली होती. परंतु शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर केवळ एक महिन्यात लोकवर्गणी जमा करण्यासाठी पुरेसा वेळ नसल्यामुळे उक्त कालावधीत लोकवर्गणी जमा होऊ शकली नाही. परिणामी, ग्रामपंचायतीकडून लोकवर्गणीचा हिस्सा थोडासा विलंबाने प्राप्त झाला.

यावर समितीने मुद्दा उपस्थित केला की, सन २०१२-१३ च्या दर करारात पुरवठादार समाविष्ट नसताना शासनाने थेट एजन्सीची नेमणूक करून पुरवठा केला काय, तसेच हा निधी कोणत्या योजनेचा होता, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, पर्यावरण संतुलित ग्रामसमृद्धी योजनेंतर्गत सौरदिवे खरेदीबाबतची ही योजना होती आणि हा निधी याच योजनेचा होता. यावर समितीने विचारणा केली की, शासनाने अमुक यंत्रणेकडूनच खरेदी करावी अशा प्रकारचे पत्र दिल्यामुळे आपल्याला त्या यंत्रणेकडून खरेदी करणे बंधनकारक होते काय, तसेच सौर पथदिव्यांची खरेदी किती रकमेची होती. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, सदरहू खरेदी १ कोटी २५ लाख रुपयांची होती. ही विशेष योजना असल्यामुळे शासनाने जर ठरविले तर ते यामध्ये हस्तक्षेप करु शकतात.

यानंतर समितीने सन २०१३-२०१४ चे लेखे सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीसाठी ठेवले होते का, त्यामध्ये पर्यावरण संतुलीत ग्रामसमृद्धी योजनेचा समावेश आहे का अशी विचारण केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, दिनांक २६ ऑगस्ट, २०१३ च्या परिपत्रकानुसार प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेण्याची आवश्यकता नाही. यावर ग्रामविकास विभागाच्या उप सचिवांनी विदित केले की, मुख्य लेखा व वित्त अधिका-यांच्या खात्यावर जमा केलेल्या निधीची प्रशासकीय मान्यता जिल्हा परिषद स्तरावर घेतली पाहिजे.

यावर समितीने विचारणा केली की, पर्यावरण संतुलित ग्रामसमृद्धी योजनेंतर्गत सौरदिवे खरेदी करण्याबाबतचा हा विषय आहे. ग्रामपंचायतीने ठरवून दिलेल्या निकषांमध्ये राहून वस्तुंची खरेदी केली पाहिजे व त्यासाठी जिल्हा परिषदेची मान्यता घेतली पाहिजे. परंतु सदर प्रकरणात जिल्हा परिषदेची मान्यता घेतली गेली नाही. करारनामा देखील केला गेला नाही. यामध्ये जिल्हा परिषदेच्या अधिकारांवर गदा आणण्याचे काम झाले आहे. "यासाठी जिल्हा परिषदेच्या विषय समितीची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही." असे शासन स्तरावरुन परिपत्रक काढण्यात आले ही बाब देखील अतिशय गंभीर आहे. कुठलीही खरेदी करीत असताना जिल्हा परिषदेच्या विषय समितीची व जिल्हा परिषदेची मान्यता घेण्याची आवश्यकता आहे. सदर परिपत्रक निघाल्यानंतर ते जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये ठेवण्यात आले होते का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, याबाबत सविस्तर माहिती नाही. आर्थिक व्यवहार झाल्यामुळे ते सर्वसाधारण सभेपुढे ठेवले होते. सर्वसाधारण सभेने यावर काहीही आक्षेप घेतले नाहीत.

यावर समितीने विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिकारी या स्वतःच्या अधिकारांचा व्यवस्थित वापर करीत नाहीत. विषय समितीने घेतलेल्या ठरावांची योग्य प्रकारे अंमलबजावणी होते किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची आहे. यापूर्वीच्या कोणत्याही समितीच्या किंवा सर्वसाधारण सभेच्या बैठकांचे कार्यवृत्त वाचलेले नाही. जिल्हा परिषदेला सहकार्य करण्याची जबाबदारी असतानाही ते करीत नसल्याचे दिसत आहे. पंचायत समिती स्तरापासून होणारे ठराव व त्यांची अंमलबजावणी होते किंवा कसे यावर लक्ष ठेवले पाहिजे. राष्ट्रीय आरोग्य मिशन कार्यक्रमाच्या देखील बैठका होत नसल्याचे पदाधिका-यांनी सांगितले. सर्व शिक्षा अभियानामध्ये अशासकीय सदस्यांची नेमणूकही केलेली नाही.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बैठकीमध्ये ' शासकीय परिपत्रकाचे वाचन करणे ' हाच पहिला विषय असतो. परंतु अधिकारी मात्र तो विषय घेत नाहीत. पंचायत समितीच्या मासिक सभेला देखील मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी हजर राहिले पाहिजे. पंचायत समित्यांच्या मासिक सभांना हजेरी लावली आहे का, कोणतेही खातेप्रमुख देखील सभांना हजेरी लावत नाहीत याचे योग्य नियोजन केले पाहिजे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली**

सन २०१३-१४ या वर्षामध्ये पर्यावरण संतुलित ग्रामसमृद्धी योजनेअंतर्गत सौरदिवे खरेदी करण्यासाठी ग्रामपंचायतीने ठरवून दिलेल्या निकषानुसार वस्तू खरेदी करताना जिल्हा परिषदेची मान्यता घेणे, जिल्हा परिषदेच्या विषय समितीची मान्यता घेणे, करारनामा करणे याबाबीची पूर्तता न केल्याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधिताची जबाबदारी निश्चित करून त्यांचेवर कोणती कारवाई करण्यात आली, अद्याप कोणतीही कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली**

ग्रामविकास विभाग यांचे आदेश दिनांक ३० मार्च, २०१३ नुसार जालना जिल्ह्यात २१२ ग्रामपंचायतीमध्ये प्रत्येकी ३ सौर पथदिवे याप्रमाणे ६३६ सौर पथदिवे बसविण्यासाठी स्पेस सोलार एजन्सी या एजन्सीची निवड करून देण्यात आली. तसेच सदर एजन्सीचे नाव मेडा दरपत्रकाचे यादीमध्ये अ.क्र.६४ वर समाविष्ट आहे. त्यानुसार सदरील एजन्सीने सन २०१३-२०१४ मध्ये पथदिवे बसविण्याचे काम केलेले आहे.

उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र दिनांक २७ जुलै, २०११ व उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे पत्र दिनांक २६ ऑगस्ट, २०१३ अन्वये सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षात सौर पथदिवे कार्यक्रम राबविताना जिल्हा परिषदांनी शासन निर्णय दिनांक ३० मार्च, २०१३ मधील परिच्छेद ९ मध्ये नमूद केलेल्या बाबींची पूर्तता करून सदर कार्यक्रम विहीत वेळेत पूर्ण करावयाचा असल्याने

हा कार्यक्रम राबविताना स्वतंत्ररित्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेण्याची आवश्यकता नाही असे नमूद असल्यामुळे त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.

सदर सौरदिवे खरेदीसाठी संबंधित एजन्सीसोबत करारनामा रुपये १००/- चे बंधपत्रावर करण्यात आला. सदर करारनामा रुपये १८,६००/- च्या बंधपत्रावर करणे आवश्यक होते. सदर बाब लक्षात आल्यानंतर उर्वरित रक्कम रुपये १८,५००/- संबंधित एजन्सीकडून दिनांक १९ सप्टेंबर, २०१८ रोजी चलनाद्वारे वसूल करून शासन खाती भरणा करण्यात आलेली आहे.

वर नमूद शासन परिपत्रक दिनांक २२ जुलै, २०११ व दिनांक २६ ऑगस्ट, २०१३ नुसार खरेदीची कार्यवाही करण्यात आलेली असल्यामुळे व सर्व प्रक्रिया नियमानुसार राबविण्यात आल्यामुळे यामध्ये कोणतीही अनियमितता दिसून येत नसल्याने संबंधितावर कारवाई करण्यात आलेली नाही.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय (योजना-१) :-** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

## अभिप्राय व शिफारशी

जालना जिल्हा परिषदेमध्ये सन २०१३-२०१४ मध्ये २१२ ग्रामपंचायतींकरिता पर्यावरण संतुलित ग्रामसमृद्धी योजनेंतर्गत ६३६ नग सौरपथदिवे खरेदीसाठी रुपये ८७,९२,७००/- खर्च केला आहे. याबाबत पुढील प्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत.

ग्रामपंचायतीने लोकवर्गणी रुपये ४,२५५/- दिनांक ३० एप्रिल, २०१३ पूर्वी जमा करून घेतली नाही. स्पेस सोलार, औरंगाबाद या पुरवठादाराचे नाव सन २०१२-२०१३ मधील दरकरारामध्ये समाविष्ट नाही. पुरवठादाराशी केलेला करारनामा वैध नाही. सदर योजनेस प्रशासकीय व तांत्रिक मान्यता नाही. उपरोक्त लेखा आक्षेपाच्या संदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीनुसार ग्रामपंचायतीकडून दिनांक १६ डिसेंबर, २०१३ पर्यंत वर्गणी जमा करून घेण्यात आलेली आहे. मे.स्पेस सोलार, औरंगाबाद या पुरवठादाराचे नाव शासन निर्णयासोबत जिल्हा निहाय यादीमध्ये नमूद आहे. तसेच मेडाच्या दरपत्रकात सदरील पुरवठादार संस्थेचे नाव आहे. त्याबाबतचा करारनामा रुपये १८,६००/– च्या बंधपत्रावर घेणे आवश्यक होते परंतु रुपये १००/- च्या बंधपत्रावर करण्यात आला होता. संबंधितांकडून रुपये १८,५००/– वसूल करण्यात आले असून ते शासन खाती जमा करण्यात आलेले आहेत. सौर पथदिवे कार्यक्रम राबविताना स्वतंत्ररित्या प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता घेण्याची अट शिथील केलेली आहे.

सदर माहितीच्या अनुषंगाने समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, पर्यावरण संतुलित ग्रामसमृद्धी योजनेंतर्गत सौर पथदिवे खरेदीसाठी लोकवर्गणीचा १० टक्के हिस्सा ग्रामपंचायतीकडून दिनांक ३० एप्रिल, २०१३ पर्यंत जमा होऊ शकला नाही. ग्रामपंचायतीकडून दिनांक १६ डिसेंबर, २०१३ पर्यंत लोकवर्गणी भरुन घेतलेली आहे. त्याअर्थी सौर पथदिवे पुरवठादारासमवेत करारनामा झाल्यानंतर लोकवर्गणी जमा केलेली आहे. ग्रामपंचायतीची सौर पथदिवे लावण्याबाबतची मागणी नसताना सुद्धा त्याठिकाणी सौर पथदिवे बसविण्यात आले व ग्रामपंचायतींना लोकवर्गणी जमा करण्यास बंधनकारक करण्यात आले. वास्तविक पाहता ग्रामपंचायतीकडून विहित मुदतीत लोकवर्गणी भरुन घेण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेची होती त्यामुळे समिती याप्रकरणी तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

**तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या खात्यावर जमा झालेल्या निधीची प्रशासकीय मान्यता जिल्हा परिषद स्तरावरुन घेणे आवश्यक होते. तथापि, सदर प्रकरणामध्ये जिल्हा परिषदेची मान्यता घेतली असल्याचे दिसून येत नाही. विशेष म्हणजे ग्रामविकास विभागाने दिनांक २६ ऑगस्ट, २०१३ रोजीच्या परिपत्रकामध्ये जिल्हा परिषदेचे लेखे प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेसाठी जिल्हा परिषदेची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही असे शासन स्तरावरुन परिपत्रक काढण्यात आले आहे ही बाब अत्यंत गंभीर आहे, त्यामुळे समिती याप्रकरणी असमाधान व्यक्त करीत आहे. सबब उपरोक्त प्रकरणी ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषदेच्या लेखे तपासणीसंदर्भात जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेबाबत नेमकी भूमिका स्पष्ट करावी व योग्य ती कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, जालना

**महाऑनलाईन तांत्रिक मनुष्यबळ (कंत्राटी) यांची १३ व्या वित्त आयोगामधून ९०% वेतनाची रक्कम अदा करणेबाबत**

**परिच्छेद क्रमांक ३.५३/२० (सन २०१३-१४)**

सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, जालना सन २०१३-१४ मध्ये महाऑनलाईन लिमिटेड, मुंबई यांच्या एकूण मागणीच्या प्राप्त ईनव्हाईस बिलाच्या ९०% रक्कम प्रथम बिल प्राप्त होताच अदा करावयाची होती. परंतु सामान्य प्रशासन विभागाने सदर रक्कम प्राप्त होण्याच्या अगोदर महाऑनलाईन तांत्रिक मनुष्यबळ (कंत्राटी) यांचे १३ व्या वित्त आयोगामधून ९०% वेतनाची रक्कम दिल्यामुळे रुपये ५,१८,९२,८०७/- चा खर्च लेखा परिक्षणात तात्पुरते अमान्य करण्यात येत आहे. मनुष्यबळ मोबदला अदा करण्यासाठी शासन निर्णय क्रमांक तेविआ-२०११/प्र.क्र./वित्त-४, दिनांक १ नोव्हेंबर, २०११ द्वारे मार्गदर्शक सूचनांचे वेतन अदा करताना पालन झालेले नाही.

(१) जिल्हा परिषद स्तरावर महाऑनलाईन तर्फे कंत्राटी पद्धतीने नेमलेल्या तांत्रिक मनुष्यबळाला अदा करावयाच्या मोबदल्याचे देयक महाऑनलाईनने उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांना सादर करावे.

(२) पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर महाऑनलाईनतर्फे कंत्राटी पद्धतीने नेमलेल्या तांत्रिक मनुष्यबळाला अदा करावयाच्या मोबदल्याचे देयक महाऑनलाईनने संबंधित गट विकास अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांना एकाच वेळी सादर करावे.

(३) पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर कंत्राटी पद्धतीने नेमलेल्या तांत्रिक मनुष्यबळाला अदा करावयाच्या मोबदल्याचे देयकाची एक प्रत महाऑनलाईन कडून संबंधित गट विकास अधिकारी यांना प्राप्त झाल्यानंतर गट विकास अधिकारी यांनी त्या देयकाचे पडताळणी करावी व सदरचे देयक उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांना सादर करावे.

(४) महाऑनलाईन मार्फत कंत्राटी पद्धतीने जिल्हा परिषद/पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या तांत्रिक मनुष्यबळाच्या मोबदल्याच्या अदायगीबाबतची तीनही स्तरावरील एकत्रित व एकूण रकमेची देयके उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी एकूण देयकाच्या ९०% रक्कमेच्या अदायगीची प्रक्रिया देयक प्राप्त झाल्यानंतर अदा करण्याची कार्यवाही करावी व तसेच उर्वरित १०% रकमेच्या अदायगीची प्रक्रिया उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी पडताळणीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर तीन महिन्याच्या आत करावी.

(५) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर मोबदल्याच्या रकमेच्या अदायगीमध्ये कमी/अधिक रक्कम महाऑनलाईनला अदा झाल्याची पडताळणी करावी.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जालना यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे महाऑनलाईन, मुंबई यांच्या एकूण मागणीच्या प्राप्त ईनव्हाईस बिलाच्या ९०% रक्कम प्रथम बिल प्राप्त होताच शासन निर्णय क्रमांक तेविआ-२०११/प्र.क्र./वित्त-४ दिनांक १ नोव्हेंबर, २०११ मधील तरतुदीप्रमाणे महाऑनलाईन तांत्रिक मनुष्यबळ (कंत्राटी) यांचे १३ व्या वित्त आयोगामधून अदा केलेल्या बिलाचा तपशील खालीलप्रमाणे आहे. तसेच परिच्छेदात नमूद ईनव्हाईस बिल मागणी पत्र व अदा केलेल्या ईनव्हाईस बिलाची वितरण आदेशाची प्रत जोडली आहे.

| अ.क्र. | ईनव्हाईस बिल प्राप्त दिनांक | ईनव्हाईस बिल मागणी रक्कम | ९०% ईनव्हाईस बिल रक्कम वितरीत दिनांक | ९०% ईनव्हाईस बिल अदा रक्कम |
|---|---|---|---|---|
| (१) | दि.११/४/२०१३ व ८/५/२०१३ | १,१६,५८,४७७/- | १३/५/२०१३ | १,०४,९२,६२९/- |
| (२) | दि.११/६/२०१३ व ११/७/२०१३ | १,१५,४१,६२३/- | १७/७/२०१३ | १,०३,८७,४६०/- |
| (३) | दि.११/८/२०१३ व ११/९/२०१३ | १,१४,७४,२०३/- | ८/१०/२०१३ | १,०३,२६,७८६/- |
| (४) | दि.११/१०/२०१३ व ११/११/२०१३ | १,४४,५६,२२९/- | ११/१२/२०१३ | १,०३,१०,६०६/- |
| (५) | दि.११/१२/२०१३ व ११/१/२०१४ | १,१५,२८,१४०/- | २१/१/२०१४ | १,०३,७५,३२६/- |
| | एकूण मागणी | ५,७६,५८,६७२/- | - | ५,१५,९२,८०७/- |

शासन निर्णय क्रमांक तेविआ-२०११/प्रक्र./वित्त-४, दिनांक १ नोव्हेंबर, २०११ द्वारे मार्गदर्शक सूचनाप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

(१) जिल्हा परिषद स्तरावर महाऑनलाईनतर्फे कंत्राटी पद्धतीने नेमलेल्या तांत्रिक मुनष्यबळाला अदा करावयाच्या मोबदल्याचे देयक महाऑनलाईनने उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांना सादर केल्यानंतर देयक अदा करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

(२) पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर महाऑनलाईनतर्फे कंत्राटी पद्धतीने नेमलेल्या तांत्रिक मनुष्यबळाला अदा करावयाच्या मोबदल्याचे देयक महाऑनलाईनने संबंधित गट विकास अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांना एकाचवेळी सादर केल्यानंतर देयक अदा करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर कंत्राटी पद्धतीने नेमलेल्या तांत्रिक मनुष्यबळाला अदा करावयाच्या मोबदल्याचे देयकाची एक प्रत महाऑनलाईन कडून प्राप्त झाल्यानंतर गट विकास अधिकारी यांनी पडताळणी प्रमाणपत्र सादर केलेले आहेत.

(४) तीनही स्तरावरील एकत्रित व एकूण रकमेची देयके महाऑनलाईनकडून प्राप्त झाल्यानंतर ९०% रकमेच्या अदायगीची कार्यवाही करण्यात आली आहे तसेच उर्वरित १०% रक्कम पडताळणीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर देयक अदा करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

(५) महाऑनलाईन तर्फे कंत्राटी पद्धतीने नेमलेल्या तांत्रिक मनुष्यबळाला अदा करावयाच्या मोबदल्याच्या देयकामध्ये कमी/अधिक रक्कम अदा झालेली नाही याची पडताळणी करण्यात आलेली आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

जालना जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ९० टक्के रक्कम अदा केल्यानंतर गट विकास अधिकारी यांचेकडून पडताळणी अहवाल ३ महिन्यात प्राप्त करून उर्वरित १० टक्के रक्कम अदा करणेची आहे. सदर अहवाल केव्हा प्राप्त झाले. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विदित केले की, जिल्हास्तरावर अभिलेखे रेकॉर्ड नव्हते. त्यांनी नोंदवह्या ठेवल्या नाहीत. यावर समितीने पुढे विचारणा केली की, दर तीन महिन्यांनी खर्चाची नोंदवही सर्वसाधारण सभेपुढे ठेवली पाहिजे. तशी कार्यवाही केली जाते का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, नोंदवही सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याची कार्यवाही केली जाते.

यानंतर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या सर्व विभागाच्या आस्थापनेवर सहायक लेखाअधिकारी कार्यरत आहेत. त्यांच्या साप्ताहिक बैठका घेण्यात येतात काय, त्यांच्या कामाचे मुल्यमापन कसे केले जाते. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विदित केले की, दरमहा बैठका घेण्यात येतात. नोंदवह्यांचा विषय परिच्छेदामध्ये नव्हता. दर तीन महिन्याला समितीसमोर खर्चाच्या नोंदवह्या मान्यतेकरिता ठेवण्यात येतात.

यावर समितीने विचारणा केली की, चालू आर्थिक वर्षात किती लेखाशीर्षावर बजेट प्रोव्हीजन आहे हे माहिती नसेल तर नोंदवह्या कशा ठेवता, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) यांनी विदित केले की, जिल्हा परिषदेकडे जनसुविधा, 'क' वर्ग तिर्थक्षेत्र, मोठ्या ग्रामपंचायती, अल्पसंख्यांक, इत्यादी विभागाची माहिती आहे. तद्नंतर समितीने विचारणा केली की, ही माहिती जिल्हा परिषदेकडे आहे तर जिल्हा परिषदेने त्याबाबतच्या नोंदवह्या का ठेवल्या नाहीत. मुख्य कार्यकारी अधिकारी हे दरमहा बैठका घेत असतील व विभाग प्रमुखांचे अहवाल किंवा गोपनीय अहवाल लिहितात, यांचे कामकाज समाधानकारक असल्याची नोंद कशी केली. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, दरमहा बैठका घेण्यात येतात.

यावर समितीने मत व्यक्त केले की, विषय सूची नुसार कामकाजाचा आढावा घेतलेला नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नियमानुसार काम केलेले नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी हे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) यांच्यावर कोणती कारवाई करणार आहेत ते समितीला सांगावे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) यांना कारणे दाखवा नोटीस देऊन पुढील कारवाई करण्यात येईल. यावर समितीने विचारणा केली की, विषय सुचीनुसार दरमहा कामकाजाचा आढावा घेतलेला नाही व विभाग प्रमुखांनी विषय सुचीनुसार कामकाज केलेले नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी हे विभाग प्रमुखांच्या डेली नोटस् तपासतात का व त्यानुसार यांचे वेतन देयक मंजूर करतात. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विदित केले की, खाते प्रमुख स्वतः आहरण व संवितरण अधिकारी आहेत.

समितीने पुढे असे मत व्यक्त केले की, मासिक कामकाज मुख्य कार्यकारी अधिकारी तपासतात तेव्हा त्याबाबत आक्षेप का घेत नाहीत. शासनाने ठरवून दिलेले आहे की, वेळापत्रकाप्रमाणे कोणत्या महिन्यात कोणते काम करायचे आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना १२ महिन्याचे वेळापत्रक माहिती आहे का. वेळापत्रक व्यवस्थित केले आहे की नाही हे पाहण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिका-यांची आहे. खाते प्रमुखांनी समाधानकारक लिहिल्यामुळे मुख्य लेखा व वित्त अधिकारी देयक करीत असतात. वेळापत्रकाप्रमाणे व दैनंदिन कामकाजाप्रमाणे काम करण्याबाबत

शासनाने निदेश दिलेले आहेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, विभाग प्रमुखांच्या डाय-या, दौरा दैनंदिनीमध्ये त्यांनी काम लिहिलेले असेल, त्यासंदर्भात तक्रार असेल तर तपासणी करण्यात येते. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी समितीला विदित केले की, नोंदवह्या नसल्यामुळे लेखा परीक्षकांना त्या पाहता आलेल्या नाहीत म्हणून सदर मुद्दा आलेला आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, आक्षेपातील प्रिया नावाचे सॉफ्टवेअर चालू आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होकारार्थी उत्तर देऊन महाऑनलाईन सोबत करार झालेला आहे. ऑपरेटरची बैठक देखील घेतलेली आहे. कधी कधी त्यांना पैसे मिळत नाही असे विदित केले. यावर समितीने आक्षेप घेत विचारणा केली की, महाऑनलाईनला पैसे देणे ही गंभीर बाब आहे. महाऑनलाईनसोबत झालेल्या करारनाम्यानुसार ऑपरेटरला देय असलेले मानधन महाऑनलाईन देत नाही याची खात्री मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केली आहे, तर महाऑनलाईनला का पैसे द्यायचे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, चौदाव्या वित्त आयोगाच्या निधीतून महाऑनलाईनला रक्कम दिली जाते.

यावर समितीने विचारणा केली की, मुख्य लेखा व वित्त अधिकारी त्यांचे पैसे कापून महाऑनलाईनला धनादेश देतात काय, आरटीजीएस करताना उपयोगिता प्रमाणपत्र पाहिले जाते काय, नेमके किती देयक देय आहे. आकडेवारी नसेल तर महाऑनलाईनला देयक अदा करतेवेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी तपासणी करीत नाहीत काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, याबाबत चूक झालेली आहे. पूर्वी महाऑनलाईन होती. आता दुसरी एजन्सी आहे. या खाजगी एजन्सीचे नाव वेगळे आहे.

तद्नंतर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विदित केले की, महाऑनलाईनला देयक केले जात होते, ते ९० टक्के व १० टक्के या प्रकारे होत होते. आता महाऑनलाईन नाही. सीएससी ही एजन्सी राज्यस्तरावरील आहे. ग्रामपंचायतीकडून ऑपरेटरचे पैसे जिल्हा परिषदेला जमा होतात. येथून तो राज्य सरकारच्या खात्यावर जमा होऊन राज्यस्तरावरुन त्यांचे देयक होते. जिल्हा परिषदेकडून थेट देयक होत नाही. याकरिता जिल्हा परिषदेने वेगळे खाते काढलेले आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांचे संयुक्त खाते याकरिता आहे.

यावर समितीने मत व्यक्त केले की, एखाद्या पंचायत समितीने जिल्हा परिषदेकडे रक्कम हस्तांतरित केली. ती रक्कम जिल्हा परिषदेला राज्यस्तरावर पाठवायची आहे. परंतु त्या कालावधीत ऑपरेटर कामावर होते की नाही. त्याला उचित रक्कम मिळते की नाही हे तपासण्याची जबाबदारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत यांची आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, या प्रकल्पाकरिता प्रत्येक जिल्ह्याला जिल्हा व्यवस्थापक नियुक्त करण्यात आलेला आहे. त्यांची याबाबत मुख्य जबाबदारी आहे की, हे सर्व तपासून घेण्यात येईल. तद्नंतर समितीने विचारणा केली की, पडताळणी करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची आहे, त्याशिवाय देयक केले जाऊ नये. जिल्ह्यातील आज एकही ऑपरेटर असा नसेल की त्याचे पैसे महाऑनलाईन कपात करीत नाही. शासनासोबत करारनामा केला जातो, त्यात आकडे फुगवून दाखविले जातात. प्रत्यक्षात कमी रक्कम ऑपरेटरला दिली जाते. करारनाम्यातील अटी व शर्तींचे पालन केले जात नाही. ऑपरेटर व शासनाची फसवणूक केली जाते, संबंधित एजन्सीवर गुन्हा दाखल करणार का ?

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, ग्रामपंचायतीकडून अग्रीम घेऊन सुद्धा त्या कर्मचा-यांना वेळेवर पगार मिळत नाही. ग्रामसेवकांनी पैसे कपात करून घ्यावेत असा त्यांच्यावर दबाव आणला जातो. जिल्हा परिषदेने त्या ऑपरेटर्सना पैसे मिळत नाहीत हे लक्षात आल्यानंतर शासनास कळविले आहे काय, यावर समितीने लक्षात आणून दिले की, त्यामुळे जो गैरव्यवहार होतो त्यासाठी आपण सुद्धा जबाबदार आहात असे प्रथम दर्शनी दिसून येते. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, व्हिडिओ कॉन्फरन्समध्ये सर्व अडचणी सांगितलेल्या आहेत व यासंदर्भात लेखी कळविण्यात येईल. यावर समितीने विचारणा केली की, व्हिडिओ कॉन्फरन्समध्ये अनेक आदेश दिले जातात. त्या सर्व आदेशांचे पालन करण्यात येते काय, जिल्हा परिषदेने समितीला असे विदित केले की, लोकप्रतिनिधींना व्हिडिओ कॉन्फरन्समध्ये सांगितले आहे, विभागाला लेखी कळविण्यात आलेले नाही. समितीने निदेश दिले की, जिल्हा परिषदेने लेखी कळवावे आणि त्यांचे देयक थांबवावे. ऑपरेटर मुलांना उशिरा देयक मिळाले याबाबत सुद्धा जबाबदारी निश्चित केली पाहिजे. तसेच, आता पर्यंत लेखी न कळविण्याची कारणे काय आहेत याची सुद्धा तपासणी केली पाहिजे.

यावर उपायुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी विदित केले की, विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत जिल्हा परिषदेच्या कामकाजाची वार्षिक तपासणी केली जाते. आढाव्याच्या वेळी काही त्रुटी आढळून आल्या होत्या त्या संदर्भात विभागीय आयुक्त कार्यालयाने असमाधान व्यक्त केले आहे.

यावर समितीने निदर्शनास आणून दिले की, शासनाने दप्तर दिरंगाई संदर्भात कायदा केलेला आहे. त्या कायद्यानुसार खाते प्रमुखांकडे ७ दिवसांपेक्षा जास्त दिवस फाईल राहता कामा नये. परंतु, जिल्हा परिषदेचे मागील वर्षीचे ११ कोटी रुपये अखर्चित आहेत. उपायुक्तांनी सांगितले की, जिल्हा परिषदेची वार्षिक तपासणी करताना मोठ्या प्रमाणावर त्रुटी आढळून आलेल्या आहेत आणि त्याबाबत त्यांनी असमाधान देखील व्यक्त केले

आहे. महाऑनलाईन संदर्भातील ऑपरेटर मुलांची होणारी हेळसांड, त्या मुलांना शासनाच्या निकषाप्रमाणे वेळेवर देयक न मिळणे आणि ती मुले व्यवस्थित काम करतात किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेवर आहे. ऑपरेटर मुलांना वेळेवर देयक मिळत नसेल तर जिल्हा परिषद सुद्धा दोषी आहे. तसेच, रक्कम अदाईची नियंत्रण नोंदवणी मंजूर नाही. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांना नोंदवह्यांच्या संदर्भात माहिती नाही. यामध्ये मोठ्या प्रमाणावर दिरंगाई झालेली दिसते. महाऑनलाईन संदर्भातील करारनामा तपासून देयक करण्याच्या संदर्भात कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. समिती उपायुक्तांना सांगू इच्छिते की, हा प्रश्न गंभीर आहे. या संदर्भात सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. या प्रकरणी ज्या अधिका-यांनी दिरंगाई केलेली आहे त्यांच्यावर तात्काळ जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कारवाईसह एका महिन्यात समितीला अहवाल सादर करावा. समिती या संदर्भात सचिवांची साक्ष घेईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

महाऑनलाईन तांत्रिक मनुष्यबळ (कंत्राटी) यांचे संदर्भातील करारनामा तपासून देयक अदा करण्याबाबत कोणतीही कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत, याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित करून त्यांचेवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सदरील मुद्यांच्या अनुषंगाने अनुपालन सादर करण्यात येते की, शासन निर्णय दिनांक १ नोव्हेंबर, २०११ मधील मार्गदर्शक सुचनेनुसार महाऑनलाईन तांत्रिक मनुष्यबळ (कंत्राटी) यांचे १३ व्या वित्त आयोगामधून वेतनाची रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

तसेच या बाबतीत विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे स्तरावरुन चौकशी समिती नेमून दिनांक २३ जुलै, २०१९ रोजी चौकशी करण्यात आलेली आहे. चौकशी अहवाल प्राप्त होताच चौकशी अहवालाच्या अधिन राहून कार्यवाही करण्यात येईल.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय (वित्त-४) :-** वेतनाची रक्कम अदा करावयाची कार्यवाही शासन निर्णयातील तरतुदीनुसार केलेली आहे. याप्रकरणी चौकशी पूर्ण करून चौकशी अहवालानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

## अभिप्राय व शिफारशी

सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, जालना अंतर्गत सन २०१३-२०१४ या वर्षामध्ये महाऑनलाईन लिमिटेड, मुंबई यांच्या एकूण मागणीच्या प्राप्त इन्व्हॉईस बिलाच्या ९०% रक्कम प्रथम बिल प्राप्त होताच अदा करायची होती. परंतु सामान्य प्रशासन विभागाने सदर रक्कम प्राप्त होण्याच्या अगोदर महाऑनलाईन तांत्रिक मनुष्यबळ (कंत्राटी) यांचे १३ व्या वित्त आयोगामधून ९०% वेतनाची रक्कम दिल्यामुळे रुपये ५,१८,९२,८०७/- एवढा खर्च झाल्याबाबत लेखा परिक्षणात तात्पुरते अमान्य करण्यात आले आहे. मनुष्यबळ मोबदला अदा करण्यासाठी वित्त विभागाच्या दिनांक ४ नोव्हेंबर, २०११ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन वेतन अदा करतेवेळी झालेले नाही. यासंदर्भात पुढील प्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत.

महाऑनलाईन तर्फे कंत्राटी पद्धतीने नेमलेल्या तांत्रिक मनुष्यबळाला अदा करावयाच्या मोबदल्याचे देयक महाऑनलाईनने उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांना सादर करावे. तांत्रिक मनुष्यबळाला अदा करावयाचे मोबदल्याचे देयक महाऑनलाईनने संबंधित गटविकास अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांना एकाचवेळी सादर करावे व त्या देयकाची पडताळणी करावी व देयकाच्या ९०% रकमेच्या अदायगीची प्रक्रिया देयक प्राप्त झाल्यानंतर अदा करण्याची कार्यवाही करावी तसेच उर्वरित १०% रकमेच्या अदायगीची प्रक्रिया उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी पडताळणीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत करावी.

उपरोक्त लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी खुलाशाच्या आधारे समितीने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, **जिल्हा स्तरावर अभिलेखे व नोंदवह्या ठेवलेल्या नव्हत्या. सदर खर्चाच्या नोंदवह्या जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे आवश्यक होते. तथापि, त्याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे समिती याप्रकरणी तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.**

तसेच समितीच्या असेही निदर्शनास आले आहे की, महाऑनलाईन समवेत करारनामा करण्यात आला होता. त्यानुसार ऑपरेटरला किती रुपये रक्कम दिलेली आहे त्याप्रमाणे ऑपरेटरला तेवढे पैसे मिळतात किंवा कसे याची खातरजमा कशाप्रकारे केली आहे याबाबतची माहिती समितीला प्राप्त होऊ शकली नाही. विषय सूचीनुसार दरमहा कामकाजाचा आढावा घेतलेला नाही व संबंधित विभाग प्रमुखांनी विषय सूचीनुसार

कामकाज केलेले नाही. **पंचायत समितीमध्ये आहरण व संवितरण अधिकारी म्हणून गट विकास अधिकारी व जिल्हा परिषदेमध्ये मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याकडे ही जबाबदारी सोपविलेली असते व मासिक कामकाज मुख्य कार्यकारी अधिकारी तपासतात तेव्हा त्याबाबत त्यांनी यासंदर्भात आक्षेप घेणे आवश्यक होते. तथापि, आक्षेप घेण्यात आले नाहीत त्यामुळे समिती याबाबत असमाधान व्यक्त करीत आहे.**

**सबब, महाऑनलाईन तांत्रिक मनुष्यबळ (कंत्राटी) यांची १३ व्या वित्त आयोगामधून ९०% वेतनाची रक्कम दिल्यामुळे रुपये ५,१८,९२,८०७/- एवढा खर्च झाल्याबाबत सखोल चौकशी करण्यात यावी व या प्रकरणी ज्या अधिका-यांनी दिरंगाई केलेली आहे त्यांच्यावर तात्काळ जबाबदारी निश्चित करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, जालना

## मानव विकास कार्यक्रम अंतर्गत इयत्ता ८ वी ते १२ वी च्या मुलींना सायकल वाटप करणेबाबत व गट स्तरावरील अभिलेखे न दर्शविलेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.१३५/७ (सन २०१३-१४)**

या योजनेवर वित्तीय वर्ष २०१३-२०१४ मध्ये रुपये १,५६,६०,००० /- इतका खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक माविका-२०१२/प्र.क्र.६९/का १४१८, दिनांक १२ जुलै, २०१२ नुसार शाळेपासून ५ किलोमीटरच्या आत राहणा-या गरजू मुलींना सायकलीचे वाटप करणे या योजनेस मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक माविका-२०१२/प्र.क्र.९९/का. १४१८, दिनांक ३ डिसेंबर, २०१३ नुसार तालुका नकाशामध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा दोन वेगळ्या रंगाच्या स्केच पेनने चिन्हांकित कराव्यात असे आदेश आहेत. त्याप्रमाणे संचिकेमध्ये नकाशा दिसून आला नाही. माध्यमिक शाळेच्या व उच्च माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकांकडून पंचायत समितीला प्राप्त झालेल्या लाभार्थी मुलींच्या तपशिलवार माहितीमध्ये पंचायत समिती, घनसावंगी यांचेकडून प्राप्त यादीमध्ये मत्सोदरी विद्यालय, तिर्थपूरी येथे यादीमध्ये खाडाखोड करून लाभार्थी वाढविले आहेत. तसेच पंचायत समिती, जालना यांचेकडून प्राप्त यादीमध्ये शाळानिहाय गोषवारा काढलेला नाही. निकष कोणते लावले याचा उल्लेख केलेला नाही. पाच किमी अंतरापेक्षा जास्त अंतरावरील लाभार्थ्यांची निवड केली आहे. यादीमध्ये काही लाभार्थ्यांचे गाव नमूद केले नसून काहींचे गावापासून शाळेपर्यंतचे अंतर नमूद केले नाही. त्यामुळे लाभार्थी निवड योग्य आहे किंवा कसे याबाबत खात्री करता येत नाही.

(२) पंचायत समिती, परतूर यांनी १२ वी तील एकाही विद्यार्थीनीला लाभ दिलेला नाही. पंचायत समिती, बदनापूर यांनी विद्यार्थीनींच्या वर्गाची नोंद केली नाही. त्याचप्रमाणे नियमोचित लाभार्थी निवड केलेली नाही. पंचायत समिती, मंठा यांनी पाच किमीपेक्षा जास्त अंतरावरील दोन लाभार्थी दिले असून १२ वी चा एकही लाभार्थी नाही. त्याचप्रमाणे गटशिक्षणाधिकारी यांनी स्वाक्षरी केली नसल्याचेदेखील नमूद केलेले आहे. पंचायत समिती, भोकरदन यांनी एस.सी./एसटी/ ओबीसी/व्हीजेएनटी याच विद्यार्थीनींना लाभ दिला आहे. खुल्या प्रवर्गातील एकाही विद्यार्थीनीला लाभ दिला नाही. पंचायत समिती, अंबड यांनी दोन टप्प्यात यादी सादर केली आहे. यामध्ये विद्यार्थीनींची उपस्थितीची टक्केवारी नमूद केलेली नाही. पंचायत समिती, जाफ्राबाद यांनी मुलींना या योजनेचा लाभ दिला नसलेबाबत मुख्याध्यापक व गटशिक्षणाधिकारी यांचे प्रमाणपत्र दिलेले नाही.

(३) सायकल वाटपाबाबत अभिलेख सादर केले गेले नसल्यामुळे याबाबत दिल्या गेलेल्या सूचनांचे पालन झाले आहे याची खात्री करता आली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जालना यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

लेखापरिक्षणातील परिच्छेदांस अनुसरून खालीलप्रमाणे मुद्देनिहाय अनुपालन सादर करण्यात येत आहे.

१.१ - शासन पत्र क्र.माविका-२०१२/प्र.क्र.९९/का १४१८, दिनांक ३ डिसेंबर, २०१३ मध्ये नमूद केल्यानुसार तालुक्यातील लाभार्थी मुलींची संख्या माहित करण्यासाठी तालुका नकाशामध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा दोन वेगळ्या रंगाच्या स्केच पेनने चिन्हांकित करण्यात आलेल्या असून चिन्हांकित केलेला नकाशा अवलोकनासाठी उपलब्ध आहे.

१.२ - गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, घनसावंगी यांनी लाभार्थी मुलींची यादी सादर करताना अ.क्र.६२८ चे पुढे हस्तलिखित ६ नावे लिहून स्वाक्षरी केलेली आहे. सदरची ६ लाभार्थी मुलींची नावे ही मत्सोदरी विद्यालय, तिर्थपूरी येथील असल्याने व सदर शाळेतील उर्वरित ३० मुलींची नावे ही यादीतील अ.क्र.५५७ ते ५८६ वर असल्याने गोषवारा तयार करताना ३०+६=३६ असे लिहिण्याऐवजी ३० ला ३६ करून दुरुस्ती करण्यात आलेली आहे. त्यामुळे यादीत खाडाखोड केलेली नाही अथवा विद्यार्थी वाढवलेले नाहीत.

१.३ - पंचायत समिती, जालना यांचेकडून प्राप्त यादीमध्ये शाळानिहाय गोषवारा काढण्यात आलेला आहे व निकषानुसार लाभार्थी निवड करताना अंतर, जात, प्रवर्ग, इयत्तानुसार निवड केलेली आहे. मानवविकास कार्यक्रमांतर्गत इयत्ता ८ वी ते १२ वी मधील मुलींना त्यांनी मध्येच शाळा सोडू नये, त्यांना ज्या ठिकाणी बस अथवा अन्य वाहतुकीची सुविधा उपलब्ध नाही अशा ठिकाणच्या मुलींना त्यांचे इयत्ता १२ वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करता यावे म्हणून मोफत सायकल देण्यात येते. तालुक्यातील सेवली, दरेगांव, नेर या ठिकाणी ग्रामीण भागातून शिक्षण घेण्यासाठी शाळेत जाणे येणे करणा-या मुलींची संख्या जास्त आहे. मोहाडी, काकडा ही तांड्याची वस्ती आहे. त्या ठिकाणी बस सुविधा उपलब्ध नाही. बस सुविधा उपलब्ध नसल्याने तेथील मुलींना सायकलींचे वाटप करण्यात आलेले आहे.

२.१ - लाभार्थी मुलींना सायकलींचा जास्त कालावधीसाठी वापर करता यावा यादृष्टीने गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, परतूर यांनी लाभार्थी निवड करताना ६६६ लाभार्थी उद्दिष्टानुसार इयत्ता ८ वी, ९ वी, १० वी व ११ वी या क्रमाने लाभार्थीची निवड करून यादी सादर केली आहे. त्यांना अनुज्ञेय लाभार्थी मुलींची संख्या ६६६ असल्याने इयत्ता ११ वी पर्यंतच्या लाभार्थी मुलींपर्यंतच उद्दिष्टपूर्ती झाल्यामुळे इयत्ता १२ वी च्या मुलींना लाभ दिलेला नाही. वर्गनिहाय लाभार्थी मुलींची संख्या खालीलप्रमाणे आहे :—

| | |
|---|---|
| वर्ग ८ वी | २७९ |
| वर्ग ९ वी | १६४ |
| वर्ग १० वी | १६७ |
| वर्ग ११ वी | ५६ |
| एकूण | ६६६ |

२.२ - पंचायत समिती, बदनापूर यांनी लाभार्थीना प्रत्यक्ष लाभ देताना अ.क्र.७९ ते ८३ (५), अ.क्र.४६८ ते ४८० (१३) व अ.क्र.५८३ ते ५९७ (१५ विद्यार्थी) हे कोणत्या वर्गात आहेत याची नोंद घेण्यात आलेली आहे.

२.३ - पंचायत समिती, मंठा अ.क्र.३१० व ३११ वरील लाभार्थी मुली ह्या ६ कि.मी. व ८ कि.मी. चे दोन लाभार्थी आहेत त्यांना योजनेचा प्रत्यक्ष लाभ देताना गटशिक्षणाधिकारी तसेच शाळा व्यवस्थापन व विकास समितीने अंतराची प्रत्यक्ष खात्री करूनच लाभार्थीला योजनेचा लाभ दिलेला आहे. लाभार्थी यादीवर गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, मंठा यांची अनावधानाने राहिलेली स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे.

२.४ - शासन पत्र दिनांक ३ डिसेंबर, २०१३ मधील अ.क्र.४ मधील मार्गदर्शक सूचनेनुसार गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, भोकरदन यांनी SC/ST/OBC/VJNT या प्राधान्य क्रमानुसार एकूण ६६६ लाभार्थीची यादी तयार केलेली आहे. उद्दिष्टपूर्ती झाल्यामुळे खुल्या प्रवर्गातील लाभार्थीला लाभ देता आलेला नाही. सदर यादीस जिल्हाधिकारी, जालना यांची मान्यता घेण्यात आलेली आहे.

२.५ - गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, अंबड यांनी ६८४ ची एकच यादी सादर केली असून ६८४ पैकी त्यांना मान्य उद्दिष्ट ६६६ लाभार्थी विद्यार्थीनींना सायकल वाटप योजनेचा प्रत्यक्ष लाभ दिलेला आहे. तसेच यादीमध्ये विद्यार्थीनींची उपस्थिती नोंदविलेली असून आता उपलब्ध आहे.

२.६ - गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद यांनी तालुक्यातील एकूण १४५९ लाभार्थी मुलींची यादी सादर केली असून योजनेचा प्रत्यक्ष लाभ देताना लाभार्थी मुलींना यापूर्वी या योजनेचा लाभ दिला नसलेबाबतचे मुख्याध्यापक व गटशिक्षणाधिकारी यांचे प्रमाणपत्र घेण्यात आलेले आहे. अवलोकनासाठी उपलब्ध आहे.

३.१ - गट स्तरावरील सायकल वाटप संदर्भातील सर्व अभिलेखे उपलब्ध असून ती अभिलेखे पंचायती राज संस्थांच्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन (४२) वा अनुपालन अहवाल वाचनाचे वेळी सहाय्यक संचालक, पंचायत राज समिती, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना तपासणीसाठी उपलब्ध करून देण्यात आले होते. त्यांनी सर्व अभिलेख्यांची तपासणी केलेली आहे. शासन पत्रातील सूचनांचे पालन करूनच योजना राबविण्यात आलेली आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

जालना जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समिती, घनसावंगीमधील यादीमध्ये मुख्याध्यापक, मत्सोदरी विद्यालय, तीर्थपुरी यांचेकडून प्राप्त झालेल्या यादीमध्ये ६ नावे गट शिक्षणाधिकारी यांनी नंतर समाविष्ट करण्याची कारणे काय आहेत, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, गोषवारा तयार करताना ३०+६=३६ असे लिहिण्याऐवजी ३० ला ३६ करून दुरुस्ती करण्यात आलेली आहे. त्यामुळे यादीत खाडाखोड केलेली नाही किंवा विद्यार्थी संख्या वाढविण्यात आलेली नाही. यावर समितीने पुढे विचारणा केली की, शाळा निहाय यादी विषय समिती समोर मान्यतेसाठी ठेवण्यात आली होती काय, नसल्यास यात कोणाची चूक आहे. पंचायती राज समिती दौ-यावर येण्यापूर्वी संबंधितांवर कारवाई का केली नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, याबाबत खाते प्रमुखांना विचारले असता त्यांनी शाळा निहाय यादी विषय समिती समोर ठेवण्यात आली नव्हती असे सांगितले. यामध्ये संबंधित खाते प्रमुखांची चूक आहे. या संदर्भात चौकशी करण्यात येईल.

तद्नंतर समितीने मत व्यक्त केले की, मुख्य कार्यकारी अधिका-यांनी या संदर्भात कारवाई करावयास पाहिजे होती. परंतु, त्यांनी कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी सुद्धा जबाबदार आहेत. जिल्हा परिषदेच्या विषय समितीने एखादा चुकीचा ठराव केला तर तो रद्द करण्यासाठी आयुक्तांकडे पाठविता येतो. म्हणजे विषय समित्यांच्या मनाप्रमाणे कामकाज होत नाही. खास बाब म्हणून शासनाची मान्यता घेवू असे त्यांना सांगितले जात नाही. जे आक्षेप आहेत ते जिल्हा परिषदेवरील आहेत. हे जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांना डावलून केलेले कृत्य आहे. मानव विकास अंतर्गत सायकली वाटप करावयाच्या आणि ठराव केलेला आहे किंवा नाही हे न बघता मुख्य लेखा व वित्त अधिका-यांनी देयक करावयाचे हे बरोबर नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या संदर्भात कारवाई करण्यात येईल असे विदित केले.

यावर समितीने आक्षेप घेत विचारणा केली की, विषय समितीची मान्यता घेतलेली नाही. इयत्ता १२ वी मधील मुलींना सायकलींचा लाभ मिळालेला नाही, असा आक्षेप आहे. आक्षेपामध्ये सायकल वाटपाबाबत अभिलेखे सादर केले गेले नसल्यामुळे याबाबत दिल्या गेलेल्या सूचनांचे पालन झाले आहे याची खात्री करता आली नसल्याचे नमूद केले आहे. संबंधित अधिकारी अभिलेखे व्यवस्थित ठेवतात किंवा नाही हे मुख्य कार्यकारी अधिका-यांनी तपासले पाहिजे. परंतु, आपण ते तपासले नसेल. मग अभिलेखे दाखविण्याची जबाबदारी कोणाची होती. लेखापरिक्षणाच्या वेळी अभिलेखे सादर न केल्यामुळे संबंधित अधिका-यावर नियम ७ नुसार कारवाई केली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, अभिलेखे दाखविण्याची जबाबदारी संबंधित गट शिक्षणाधिकारी यांची होती. सदर आक्षेप शिक्षण विभागाचा आहे. गट स्तरावरील सायकल वाटपासंदर्भातील सर्व अभिलेखे उपलब्ध असून ती अभिलेखे पंचायती राज संस्थांच्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन (४२) वा अनुपालन अहवाल वाचनाच्या वेळी सहायक संचालकांना तपासणीसाठी उपलब्ध करून देण्यात आले होते.

यावर समितीने विचारणा केली की, लेखापरिक्षणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध नव्हते. संबंधित अधिकारी लेखापरिक्षणाला येण्यापूर्वी जिल्हा परिषदेला अभिलेखे अद्ययावत ठेवण्याबाबत लेखी कळवितात. संबंधित अधिका-यांनी लेखापरिक्षणाच्या वेळी अभिलेखे सादर करावयास पाहिजे होती. परंतु, त्यांनी लेखापरिक्षणाच्या वेळी अभिलेखे सादर केलेली नाहीत. त्यामुळे संबंधित अधिका-यांवर नियम ७ नुसार कारवाई करावयास पाहिजे. जिल्ह्यात एकाच अधिका-यावर कारवाई करण्यात आलेली आहे काय ? आपण एखाद्या प्रकरणावर चर्चा करतो. परंतु, जिल्ह्यात अशी बरीच प्रकरणे असतील. संबंधित अधिका-यांना आपण पाठीशी घालण्याचे काम करीत आहात. आपण नियमानुसार कारवाई केलेली नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून संबंधितावर कारवाई करण्याची जबाबदारी आपली आहे. परंतु, आपण आपली जबाबदारी पार पाडलेली नाही, हे योग्य नाही. लेखापरिक्षणाच्या वेळी अभिलेखे सादर न केल्यामुळे मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार कारवाई करण्यात यावी. संबंधितास २५ हजार रुपये दंड, सेवा पुस्तिकेत नोंद घेणे व एक वेतनवाढ थांबविण्याची कारवाई करण्यात यावी. जिल्ह्यात अशी बरीच प्रकरणे आहेत. त्या संदर्भात चौकशी करून अशी किती प्रकरणे आहेत याबाबत एका महिन्याच्या आत कारवाईसह समितीला माहिती सादर करावी.

इयत्ता १२ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या गरीब मुलींना सायकलींचे वाटप करण्यात आलेले नाही. कल्याणकारी राज्याने सुरू केलेल्या कल्याणकारी योजना ग्रामीण भागातील तळागाळातील मुलींपर्यंत पोहचविणे अपेक्षित असताना सुद्धा जिल्हा परिषदेने इयत्ता १२ वी तील मुलींना सायकलीच्या लाभापासून वंचित ठेवले आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, ज्या विद्यार्थीनींना सायकलींची जास्त गरज होती त्यांना अहवाल वर्षात सायकलींचे वाटप करण्यात आले होते. तत्कालीन वस्तुस्थिती पाहून इयत्ता ८ वी ते ११ वी तील मुलींना सायकलींचे वाटप करण्यात आले. इयत्ता १२ वी तील मुलींना सायकलीचे वाटप केल्यास त्यांना केवळ १ वर्षेच सायकलीचा उपयोग होणार होता. त्यामुळे इयत्ता १२ वी तील मुलींना सायकलींचे वाटप करण्यात आले नाही. यावर समितीने अधिका-यांच्या लक्षात आणून दिले की, जिल्हा नियोजन अधिका-यांकडून जिल्ह्यात किती विद्यार्थीनींचे प्रवेश झाले याची यादी घेऊन ती जी.बी.समोर ठेवली असती तर त्यावर चर्चा होऊन विद्यार्थीनींच्या संख्येनुसार निधीची मागणी करता आली असती व त्या प्रमाणात निधी मिळाला असता. इयत्ता १२ वीतील मुलींना सायकल एक वर्ष वापरता येईल म्हणून त्यांना सायकलीचे वाटप करण्यात आले नाही. हा विषय जी.बी.समोर ठेवून त्यावर चर्चा न केल्यामुळे आपल्यावर दोषारोप ठेवावयास पाहिजे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, या संदर्भात दिनांक ४ डिसेंबर, २०१३ रोजीचे परिपत्रक अस्तित्वात आहे. त्यामध्ये मानव विकास मिशन अंतर्गत योजना राबविण्याबाबत स्टेप्स दिलेल्या आहेत. यावर समितीने विचारणा करून निदेश दिले की, आपण इतर माहिती न देता एवढेच सांगावे की, उक्त परिपत्रकामध्ये इयत्ता १२ वी तील मुलींना सायकलींचे वाटप करू नये, असे नमूद केलेले आहे काय, या संदर्भात आता नवीन शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. मानव विकास मिशन अंतर्गत राबवावयाच्या योजनांमध्ये लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन जिल्हाधिका-यांनी प्रत्येक महिन्यात बैठक घेऊन त्यांच्याकडून शिफारशी घ्याव्यात हे आपल्याला माहीत आहे काय, या प्रकरणी समितीने अगोदर सूचविल्यानुसार कारवाईसह एक महिन्याच्या आत समितीला कळवावे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होकारार्थी उत्तर दिले.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, मंठा येथील २ विद्यार्थीनी पात्र नसताना त्यांना लाभ देण्याची कारणे काय आहेत, गट शिक्षणाधिकारी यांनी स्वाक्षरी न करण्याची कारणे काय आहेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, पंचायत समिती, मंठा अंतर्गत असलेल्या दोन मुली ६ कि.मी. व ८ कि.मी. वरील लाभार्थी होते. त्यांना योजनेचा प्रत्यक्ष लाभ देताना गटशिक्षणाधिकारी तसेच शाळा व्यवस्थापन व विकास समितीने अंतराची प्रत्यक्ष खात्री करूनच लाभार्थीला योजनेचा लाभ दिलेला आहे. लाभार्थी यादीवर गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, मंठा यांची अनवधानाने राहिलेली स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे. सदरहू अंतराबाबत प्रमाणपत्र घेण्यात आलेले आहे. त्यामुळे कोणत्याही अधिका-यांवर कारवाई करण्याची गरज नव्हती.

यावर समितीने पुन्हा विचारणा केली की, सायकल वाटपाचे अभिलेखे लेखापरिक्षणाच्या वेळी उपलब्ध करून न दिल्यामुळे संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार कारवाई केली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नकारार्थी उत्तर देऊन संबंधितांना कारणे दाखवा नोटीस दिल्या आहेत असा खुलासा केला.

यावर समितीने निदेश दिले की, केवळ कारणे दाखवा नोटीस देऊन काहीही उपयोग होणार नाही. मूळात पंचायती राज समिती येण्यापूर्वीच अशा प्रकरणांमध्ये कारवाई करावयास पाहिजे होती. समिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारू इच्छिते की, अद्यापपर्यंत कारवाई न केल्यामुळे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेवर कारवाई प्रस्तावित करावी काय, विहित मुदतीत कारवाई करण्यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे चुकले आहे काय, लेखापरिक्षणाच्या वेळी ज्यांनी अभिलेखे सादर केले नाहीत त्यांच्यावर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार संबंधितांस २५ हजार रुपये दंड, सेवा पुस्तिकेत नोंद आणि एक वर्षाची वेतनवाढ रोखावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले.

यावर समितीने मत व्यक्त केले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपली चूक मान्य केली आहे. कारवाई करण्यात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दुर्लक्ष केल्यामुळे समितीने मुख्य कार्यकारी अधिका-यांवरच कारवाई का प्रस्तावित करू नये. तसेच या प्रकरणी संबंधितांवर कारवाई करून समितीला तातडीने कळवावे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या बाबतीत संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

यानंतर समितीने विचारणा केली की, पंचायत समिती, जाफ्राबाद यांनी १४५९ लाभार्थी मुलींची यादी सादर केली होती. त्यापैकी किती लाभार्थ्यांना लाभ दिला व प्राप्त यादीपेक्षा कमी लाभार्थ्यांना लाभ दिला असल्यास त्याचे निकष काय लावले, सदर निकष पंचायत समिती भोकरदनसाठी लावणे शक्य नव्हते काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद यांनी तालुक्यातील एकूण १४५९ लाभार्थी मुलींची यादी सादर केली असून योजनेचा प्रत्यक्ष लाभ देताना लाभार्थी मुलींना यापूर्वी या योजनेचा लाभ दिला नसल्याबाबत मुख्याध्यापक व गटशिक्षणाधिकारी यांचे प्रमाणपत्र घेण्यात आलेले आहे. सदरहू प्रमाणपत्र अवलोकनासाठी उपलब्ध आहे. यावर समितीने विचारणा केली की, पंचायत समिती, जाफ्राबाद सारखेच निकष पंचायत समिती, भोकरदनसाठी लावले नव्हते काय ?

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सर्व पंचायत समित्यांच्या ठिकाणी अशाच प्रकारचे निकष लावलेले आहेत. यावर समितीने विचारणा केली की, जर सर्वच ठिकाणी एकाच प्रकारचे निकष लावले असते तर हा परिच्छेद लेखापरीक्षणाच्या वेळी उपस्थित झालाच नसता. या बाबतीत संचालक, स्थानिक निधी (लेखा) यांचे काय म्हणणे आहे, यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी खुलासा केला की, खुल्या प्रवर्गातील एकाही विद्यार्थीनीला या योजनेचा लाभ दिलेला नाही, हाच लेखापरीक्षणातील आक्षेप होता.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, शासन पत्र दिनांक ३ डिसेंबर, २०१३ मधील अ.क्र.४ मधील मार्गदर्शक सूचनेनुसार गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, भोकरदन यांनी एससी/एसटी/ओबीसी/व्हीजेएनटी या प्राधान्यक्रमानुसार एकूण ६६६ लाभार्थींची यादी तयार केलेली आहे. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली लाभार्थी ठरवून सर्व विद्यार्थ्यांना लाभ दिलेला आहे. जे प्राधान्यक्रमावर होते त्यांना लाभ देण्यात आलेला आहे.

**उपरोक्त माहितीच्यासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

पंचायत समिती, घनसावंगीमधील मत्सोदरी विद्यालय, तिर्थपूरी यांचेकडून प्राप्त यादीमध्ये खाडाखोड करून विद्यार्थी संख्या वाढविल्याप्रकरणी संबंधित खाते प्रमुखांची चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली आहे तसेच मानव विकास कार्यक्रमांतर्गत इयत्ता ८ वी ते १२ वी च्या मुलींना सायकल वाटप करणेबाबत व गटस्तरावरील अभिलेखे न दर्शविल्याप्रकरणी महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे, अशी एकूण किती प्रकरणे निदर्शनास आली आहेत. याबाबतचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल समितीला सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, घनसावंगी यांनी लाभार्थी मुलींची यादी सादर करताना अ.क्र.६२८ चे पुढे हस्तलिखित ६ नावे लिहून स्वाक्षरी केलेली आहे. सदरची ६ लाभार्थी मुलींची नावे ही मत्सोदरी विद्यालय तिर्थपूरी येथील असल्याने व सदर शाळेतील उर्वरित ३० मुलींची नावे ही यादीतील अ.क्र.५५७ ते ५८६ वर असल्याने गोषवारा तयार करताना ३०+६=३६ करून दुरस्ती करण्यात आलेली आहे. त्यामुळे यादीत खाडाखोड केलेली नाही अथवा विद्यार्थी वाढवलेले नाहीत. तरीही याबाबत तत्कालीन संबंधित गटशिक्षणाधिकारी यांच्याकडून खुलासा घेऊन त्यांना सक्त ताकीद देण्यात आलेली आहे.

गटस्तरावरील सायकल वाटप संदर्भातील सर्व अभिलेखे उपलब्ध असून ती अभिलेखे पंचायती राज संस्थांच्या लेखापरिक्षा पुर्नविलोकन (४२) वा अनुपालन अहवाल वाचनाचे वेळी सहायक संचालक, पंचायत राज समिती, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना तपासणीसाठी उपलब्ध करून देण्यात आले होते. त्यांनी सर्व अभिलेख्यांची तपासणी करून ' खात्याने सादर केलेले अनुपालन परिपर्ण आहे, विद्यार्थीनींची निवड, RTGS द्वारे वाटप, खाते क्रमांक, रकमा मिळाल्याचा/सायकल मिळाल्याच्या पोच आहेत, शालेय व्यवस्थापन व विकास समितीच्या सहभागाचे असे सर्व अभिलेखे पाहिले. परिच्छेद पंचायती राज समिती अहवालात समाविष्ठ करून नये. ' असे अभिप्राय दिनांक १० मे, २०१६ ला दिलेले आहेत.

संबंधित गटशिक्षणाधिकारी यांनी सर्व अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध करून दिले असल्यामुळे महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार संबंधित गटशिक्षणाधिकारी यांचेविरुद्ध कारवाई करण्यात आलेली नाही.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय (वित्त-७) :-** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्रायः-** जिल्हा परिषदेने दिलेल्या अभिप्रायाशी विभाग सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने जालना जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ६ ऑगस्ट, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, मानव विकास कार्यक्रमांतर्गत इयत्ता ८ वी ते १२ वीच्या मुलींना सायकल वाटप करणेबाबत व गटस्तरावरील अभिलेखे न दर्शविण्याबाबतचा आहे. या संदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा करावा. यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी खुलासा केला की, मानव विकास कार्यक्रमांतर्गत इयत्ता ८ वी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थीनींना सायकल वाटप करण्यात येते. या कार्यक्रमांतर्गत सायकल वाटपाचे उद्दिष्ट साध्य करण्यात येते. सदरहू योजना डीबीटी तत्वावरील आहे. गटशिक्षणाधिकारी हे विद्यार्थीनींची निवड निश्चित करतात आणि तद्नंतर लाभार्थ्यांची यादी अंतिम झाल्यानंतर विद्यार्थीनींना लाभ देण्यात येतो.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, पंचायत समिती स्तरावरील बॉडीच्या माध्यमातून लाभार्थी निवड करण्यात येते काय, यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी होकारार्थी उत्तर देऊन खुलासा केला की, त्यानुसारच गटशिक्षणाधिकारी यांनी लाभार्थ्यांची यादी पाठविली. परंतु तद्नंतर असा आक्षेप आला की, सदरहू कार्यक्रमांतर्गत सायकल वाटपासाठी घनसावंगी शाळेतील ३० विद्यार्थीनींची निवड करण्यात आलेली असताना त्यानंतर त्या यादीमध्ये पुन्हा ६ विद्यार्थीनींची नावे समाविष्ट करण्यात आली. याचाच अर्थ ३० अधिक ६, अशाप्रकारे उक्त शाळेतील ३६ विद्यार्थीनींची निवड करण्यात आली. गटशिक्षणाधिका-यांनी पूर्वीच्या ३० च्या आकड्यामध्ये बदल करून सुधारित ३६ हा आकडा नमूद केला. परंतु हा जो बदल करण्यात आला त्यास खाडाखोड समजण्यात आली. तसेच दुसरी बाब अशी की, गटशिक्षणाधिका-यांनी आकड्यामध्ये जो बदल केला होता त्या ठिकाणी स्वतःची स्वाक्षरी केली नव्हती. वास्तविक पाहता लाभार्थी विद्यार्थीनींची नावे, त्यांची संख्या वा बेरीज व्यवस्थित होती. तसेच लाभार्थीना सायकलीचे वाटप सुद्धा व्यवस्थित झालेले आहे. केवळ पूर्वीची लाभार्थी संख्या आणि नंतर नव्याने समाविष्ट केलेली लाभार्थी संख्या यांची बेरीज केल्यानंतर जी नवीन संख्या येते ती नमूद केल्यानंतर त्या बाजूला स्वाक्षरी न केल्यामुळे हा प्रकार घडला. पुनश्च सांगू इच्छिते की, लाभार्थीची निवड योग्यप्रकारे झाली असून त्या सर्व लाभार्थीची नावे निवड यादीत नमूद आहेत. या सर्व ३६ विद्यार्थीनींना सायकल वाटप करण्यात आलेले आहे. या प्रकरणी कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झालेला नाही.

यावर समितीने विचारणा केली की, ३६ विद्यार्थीनींपैकी केवळ ३० विद्यार्थीनींना योजनेचा लाभ दिला आणि उर्वरित ६ विद्यार्थीनींना लाभ दिलेला नसताना सुद्धा तो दिल्याचे दाखविण्यात आले, असे काही या प्रकरणी घडले आहे काय, या ठिकाणी ३६ विद्यार्थीनी योजनेच्या निकषात बसत असताना प्रत्यक्षात ३० विद्यार्थीनींनाच लाभ देण्यात आल्याचे दाखविले आणि त्यानंतर पुन्हा ६ विद्यार्थीनी समाविष्ट करण्यात आल्या असे दिसते. ज्या ६ विद्यार्थीनींची नावे निवड यादीत समाविष्ट करण्यात आली त्यांना या योजनेचा लाभ दिला आहे काय, यावर अपर मुख्य सचिव,

शालेय शिक्षण विभाग यांनी खुलासा केला की, नाही, तसे काहीही झालेले नाही. मुळात या मुद्याचे उत्तर ग्राम विकास विभागाच्या सचिवांनी देणे अपेक्षित आहे. परंतु ते थोड्या उशिराने येणार असल्यामुळे मी उक्त मुद्याचे उत्तर देत आहे. मी स्वतः लाभार्थीची यादी बघितली आहे, प्रस्ताव सुद्धा बघितला आहे. मी पुनश्च सांगू इच्छिते की, मानव विकास कार्यक्रमांतर्गत घनसावंगी शाळेतील पूर्ण ३६ विद्यार्थीनींना सायकल वाटप करण्यात आलेले आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, जिल्हा स्तरावर लाभार्थी निवड होतात. मानव विकास कार्यक्रमांतर्गत घनसावंगी शाळेतील ३६ विद्यार्थीनींना सायकलीचे वाटप करण्यात आलेले आहे. यावर समितीने समाधान व्यक्त करून पुढे विचारणा केली की, लेखा परीक्षणाच्या वेळी गट स्तरावरील अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आले नव्हते. या बाबत काय म्हणणे आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, लेखा परिक्षणाच्या वेळी अभिलेखे सादर केले नाहीत असा आक्षेप होता. या बाबत माहिती घेतली असता असे निदर्शनास आले की, संबंधितांनी विहित मुदतीत अभिलेखे सादर केले आहेत आणि त्या आधारे लेखा परिक्षण सुद्धा झाले आहे.

यावर समितीने मत व्यक्त केले की, समितीच्या भेटीच्या वेळी अशा प्रकारचा खुलासा का केला नाही, जर हाच खुलासा समितीच्या भेटीच्या वेळी केला असता तर हा मुद्दा उपस्थितच झाला नसता. जे मुद्दे जिल्हा बैठकीमध्ये निकालात निघणारे असतात ते मुद्दे त्याच वेळी निकालात काढले तर ते मुद्दे विभागीय सचिवांच्या साक्षीत येणार नाहीत. समितीची अपेक्षा आहे की, जिल्हा प्रशासनाने या बाबत भविष्यात काळजी घ्यावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, समिती ज्यावेळी जिल्हा दौ-यावर आली होती त्यावेळी बैठकीमध्ये असा मुद्दा उपस्थित झाला होता की, लेखा परिक्षणाच्या वेळी अभिलेखे सादर न केल्याप्रकरणी चौकशी करण्यात यावी. जिल्हा परिषदेने या संदर्भातील चौकशी केली असता असे निदर्शनास आले की, संबंधितांनी विहित मुदतीत अभिलेखे सादर केले होते.

यावर समितीने आक्षेप घेत विचारणा केली की, लेखा परिक्षणाच्या वेळी अभिलेखे सादर केले नाही असा मुद्दा जिल्हा बैठकीच्या वेळी उपस्थित झाला होता. समितीच्या दौ-याच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एकाही प्रश्नाचे समाधानकारक उत्तर दिले नव्हते. आता मुख्य कार्यकारी अधिकारी जो खुलासा करीत आहेत तो खुलासा त्यांनी जिल्हा बैठकीच्या वेळी केला असता तर हा मुद्दाच उपस्थित झाला नसता. त्यावेळी कोणते अभिलेखे कोणत्या तारखांना सादर केले या बाबतचा खुलासा केला असता तर हा मुद्दाच उपस्थित झाला नसता.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, अभिलेखे सादर न केल्याबाबत लेखा परिक्षकांनी जे आक्षेप नोंदविले होते ते अभिलेखे लेखा परीक्षण करणा-या पथकाला दाखविण्यास तयार होतो. परंतु त्यांनी सांगितले की, आम्ही सदरहू अभिलेखे तपासण्यासाठी तालुका स्तरावर जाणार नाही, उक्त अभिलेखे जिल्हा स्तरावरील कार्यालयात आणून दाखवावीत. त्यानुसार आम्ही विहित मुदतीत त्यांच्याकडे अभिलेखे सादर केले. लेखा परीक्षकांच्या पथकाने संपूर्ण अभिलेखे तपासल्यानंतर त्यांनी पूर्वी दिलेला शेरा बदलून सदरहू परिच्छेद पंचायती राज समिती अहवालात समाविष्ट करु नये असा अभिप्राय दिला. यावर समितीने समाधान व्यक्त केले.

## अभिप्राय व शिफारशी

मानव विकास कार्यक्रम अंतर्गत इयत्ता ८ वी ते १२ वी च्या मुलींना सायकल वाटप करणेसाठी सन २०१३-२०१४ या वर्षामध्ये रुपये १,५६,६०,०००/- एवढा खर्च करण्यात आला आहे. याबाबत पुढीलप्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत.

नियोजन विभागाच्या दिनांक ३ डिसेंबर, २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार तालुका नकाशामध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना दोन वेगळ्या रंगाच्या स्केच पेनने चिन्हांकित करावे असे आदेश असताना त्याप्रमाणे संचिकेमध्ये नकाशा दिसून आला नाही. पंचायत समिती, घनसावंगी यांचेकडून प्राप्त यादीमध्ये मत्स्योदरी विद्यालय, तिर्थपुरी येथे यादीमध्ये खाडाखोड करून लाभार्थी वाढविण्यात आले, तसेच पंचायत समिती, जालना यांचेकडून प्राप्त यादीमध्ये शाळानिहाय गोषवारा काढण्यात आलेला नव्हता, कोणते निकष लावले याचा उल्लेख नव्हता तसेच ५ कि.मी अंतरापेक्षा जास्त अंतरावरील लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. लाभार्थ्यांचे गाव नमूद केले नाही. गावापासून शाळेपर्यंतचे अंतर नमूद केले नाही. त्यामुळे लाभार्थी निवड योग्य आहे किंवा कसे याबाबत खात्री करता येत नाही. पंचायत समिती, परतूर यांनी इयत्ता १२ वीतील एकाही विद्यार्थीनीला उपरोक्त योजनेचा लाभ दिलेला नाही. तसेच पंचायत समिती, बदनापूर यांनी विद्यार्थीनींच्या वर्गाची नोंद केली नाही. त्याचप्रमाणे पंचायत समिती, मंठा यांनी पाच किमी पेक्षा जास्त अंतरावरील दोन विद्यार्थी दिले असून इयत्ता १२ वीचा एकही विद्यार्थी नाही. पंचायत समिती, भोकरदन यांनी खुल्या प्रवर्गातील एकाही विद्यार्थीनीला लाभ दिला नाही. पंचायत समिती, अंबड यांनी विद्यार्थीनींची उपस्थितीची टक्केवारी नमूद केलेली नाही.

सदरहू लेखा आक्षेपाच्या संदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, पंचायत समिती, घनसावंगी यांचेकडून प्राप्त यादीमध्ये मत्स्योदरी विद्यालय, तिर्थपुरी येथे गोषवारा करतेवेळी ३० हा अंक ३६ करून दुरुस्ती करण्यात आलेली आहे. शाळानिहाय यादी विषय समितीसमोर मान्यतेसाठी ठेवण्यात आलेली नव्हती. यामध्ये संबंधित खातेप्रमुखाची चूक झाल्याचे दिसून येत आहे. तसेच मानव विकास कार्यक्रम अंतर्गत सायकल वाटप करण्याबाबतचा ठराव जिल्हा परिषदेने केलेला आहे किंवा

कसे हे न पहाता मुख्य लेखा व वित्त अधिका-यांनी देयक अदा करण्यात आले आहे. त्यामुळे यासंदर्भात कोणतीही कारवाई न केल्याप्रकरणी समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. सबब, याप्रकरणी सखोल चौकशी करून संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा.

तसेच समितीच्या असेही निदर्शनास आले आहे की, **लेखा आक्षेपामध्ये सायकल वाटपाबाबत अभिलेखे सादर केले गेले नसल्यामुळे याबाबत दिल्या गेलेल्या सूचनांचे पालन झाल्याची खात्री देता येत नसल्यामुळे संबंधित गट शिक्षणाधिकारी यांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी तसेच महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियमातील कलम ७ अन्वये दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा प्रकरणनिहाय अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

**सन २०१३-२०१४ या वर्षादरम्यान जालना जिल्हा परिषदेअंतर्गत जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणा-या इयत्ता १२ वी मध्ये असणा-या गरीब मुलींना सायकलींचे वाटप करण्यात आलेले नाही, त्यामुळे सदर योजनेच्या लाभापासून बहुतांश गरीब मुली वंचित राहिलेल्या आहेत. वास्तविक पहाता इयत्ता १२ वी मध्ये ज्या गरीब विद्यार्थीनींना सायकलची जास्त गरज होती त्यांना त्या अहवाल वर्षामध्ये सायकलींचे वाटप करण्यात आलेले नाही, तसेच पंचायत समिती, जाफ्राबाद यांनी तालुक्यातील १४५९ लाभार्थी मुलींची यादी सादर केली असून योजनेचा प्रत्यक्ष लाभ देताना लाभार्थी मुलींना यापूर्वी या योजनेचा लाभ दिला नसल्याबाबत मुख्याध्यापक व गट शिक्षणाधिकारी यांचे प्रमाणपत्र घेण्यात आलेले आहेत. सदरहू निकष उर्वरित पंचायत समित्यांच्या बाबतीत अंमलात आणले असते तर लेखापरिक्षणाच्यावेळी सदरहू योजनेचा मुद्दा उपस्थित झाला नसता लेखापरिक्षणामध्ये ' खुल्या प्रवर्गातील एकाही विद्यार्थीनीला उक्त योजनेचा लाभ दिलेला नाही त्यामुळे समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणी सखोल चौकशी करून संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण चार

## जिल्हा परिषद, जालना

## कामधेनू दत्तक ग्रामविकास योजना जिल्हा योजनेतून औषधी खरेदीबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.८७३/११ (सन २०१३-१४)**

(१) पशुसंवर्धन विभागाचे सन २०१३-२०१४ या वित्तीय वर्षाचे महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक झेडपीए/२००८/प्र.क्र./४४६/वित्त-९ दिनांक २० जून, २००८ नुसार वेळापत्रकाप्रमाणे योजना राबविलेली नाही.

(२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ९१ प्रमाणे शिल्लक साठा व नियोजन प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.क्रग्रावि/पीआरसी १०८३/५७८ दिनांक २ जुलै, १९९३ अन्वये उपयोगिता प्रमाणपत्र घेण्यात आलेली नाही.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ९८ अन्वये भांडार साठ्याची प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक १०९३/प्र.क्र.१२१३९/३४ दिनांक १ जानेवारी, १९९३ नुसार ज्या वित्तीय वर्षात खरेदी केली आहे त्या वित्तीय वर्षात वाटप व विनियोजन केलेले नाही.

(४) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए २०००/प्र.क्र.४०२३,३३ दिनांक १२ जानेवारी, २००१ च्या टिप १ नुसार विषय समितीच्या पुढील सभेत माहिती अवलोकनार्थ सादर केलेले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जालना यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) कामधेनू दत्तक ग्रामविकास योजना सन २०१३-२०१४ राबविण्यासाठी पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय समितीची मान्यता दिनांक २४ जून, २०१३ रोजी संपन्न झालेल्या विषय समिती सभेत विषय क्र.२, ठराव क्र.९८९ अन्वये प्राप्त झाली. माहे जुलै-ऑगस्ट मध्ये औरंगाबाद-जालना स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक आदर्श आचारसंहिता अंमलात आली. त्यानंतर दिनांक २८ नोव्हेंबर, २०१३ च्या स्थायी समितीत ठराव क्र.९६ अन्वये योजना राबविण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून तांत्रिक व प्रशासकीय मंजुरीचे आदेश दिनांक २५ फेब्रुवारी, २०१४ अन्वये निर्गमित झाले व औषधी खरेदीस तांत्रिक मंजुरी प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त, औरंगाबाद कडून दिनांक २४ मार्च, २०१४ अन्वये प्राप्त झाली म्हणून शासन परिपत्रक दिनांक २० जून, २००८ नुसार वेळापत्रकाप्रमाणे योजना राबविणे शक्य झाले नाही. तथापि, योजनेचा खर्च सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षातच झालेला आहे.

(२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ९८ प्रमाणे शिल्लक साठा व नियोजन प्रमाणपत्र औषधीसाठा नोंदवही नं.३३, पृष्ठ क्र.७० ते ७५ प्रमाणे घेतलेला आहे. उपयोगिता प्रमाणपत्र क्षेत्रीय अधिका-याकडून घेण्यात आलेले असून अवलोकनार्थ समितीसमोर सादर करण्यात येत आहे.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ९८ अन्वये भांडार साठ्याची प्रत्यक्ष पडताळणी दिनांक ५ डिसेंबर, २०१४ रोजी केलेली असून औषधीसाठा नोंदवही पृष्ठ क्र.७० ते ७५ नुसारच औषधी प्राप्त झालेली आहे व त्यानुसारच औषधी वाटप करण्यात आलेली आहे. योजनेअंतर्गत शिबिरे ठराविक कालावधीत घेण्यात येत असल्याने त्याप्रमाणे वाटप व विनियोजन केलेले आहेत.

(४) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए २०००/प्र.क्र.४०२३,३३ दिनांक १२ जानेवारी, २००१ च्या टिप १ नुसार दिनांक ११ एप्रिल, २०१४ च्या ठराव क्र.१०१४ अन्वये विषय समितीच्या सभेत माहिती अवलोकनार्थ सादर करण्यात आलेली आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

जालना जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, कामधेनू दत्तक ग्रामविकास योजना राबविण्याबाबत दिनांक २८ नोव्हेंबर, २०१३ रोजी स्थायी समितीने प्रशासकीय मान्यता दिली असताना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिका-यांनी दिनांक २५ फेब्रुवारी, २०१४ रोजी प्रशासकीय व तांत्रिक मंजुरीचे आदेश विलंबाने काढण्याची कारणे काय आहेत, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, नियोजन विलंबाने झाले होते. एकूण ५० लाख रुपयांची औषधे खरेदी करावयाची होती.

यावर समितीने पुढे विचारणा केली की, स्थायी समितीला प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार असताना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिका-यांनी वेगळे आदेश काढण्याची काय आवश्यकता आहे, यावर प्रकल्प संचालक तथा प्रभारी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, स्थायी समितीने ठराव केला होता. आदेशाचे प्रारुप नव्हते. तद्नंतर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी समितीस माहिती दिली की, स्थायी समितीने दिनांक २८ नोव्हेंबर, २०१३ रोजी ठराव केलेला आहे. परंतु, आदेश काढण्यासाठी दोन महिन्यांचा विलंब झालेला आहे. १५ दिवसात कार्यवृत्त अंतिम होते. यावर प्रकल्प संचालक तथा प्रभारी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, त्यावेळी औरंगाबाद-जालना स्थानिक प्राधिकारी संस्थेच्या निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली होती.

यावर समितीने आक्षेप घेत विचारणा केली की, निवडणुकीची आचारसंहिता केवळ १ महिना १० दिवस असते. ज्यावेळी स्थायी समितीने ठराव केला त्यावेळी आचारसंहिता लागू झाली होती काय, स्थायी समितीने दिनांक २८ नोव्हेंबर, २०१३ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. स्थायी समितीने मान्यता दिल्यानंतर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिका-यांनी केवळ स्वाक्षरी करावयाची आहे. कारण, तोच आदेश आहे. स्थायी समितीने मान्यता दिल्यानंतर त्याच दिवशी आदेश निर्गमित व्हावयास पाहिजेत. यामध्ये ३ महिन्यांचा विलंब झालेला आहे. स्थायी समितीचे सचिव हे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.) असतात. पुरवठा आदेशावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी पाहिजे किंवा कसे हे अगोदर स्पष्ट झाले पाहिजे. या संदर्भातील प्रक्रिया आपण समितीला दाखविली पाहिजे. या बैठकीसाठी विधिमंडळ, मंत्रालय आणि विभागीय आयुक्त कार्यालय या तिन्ही कार्यालयातील अधिकारी उपस्थित आहेत. समितीला वाटते सर्वप्रथम या संदर्भातील प्रक्रिया स्पष्ट व्हावयास पाहिजे. या ठिकाणी मुख्य कार्यकारी अधिकारी हे जिल्हा परिषद सदस्यांच्या अधिकारावर अतिक्रमण करीत आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी जे सांगत आहेत त्या बाबत काही लेखी आदेश आहेत काय, जसे सक्षम प्राधिका-याला २५ लाख रुपयापर्यंतचे अधिकार आहेत तसेच स्थायी समितीचे अध्यक्ष यांना ५० लाख रुपयांपर्यंतचे अधिकार आहेत.

यावर उपायुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी खुलासा केला की, सर्वसाधारण सभा किंवा स्थायी समितीला विशिष्ट अधिकार प्राप्त आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीने पुरवठा आदेश काढले जातात. परंतु आदेशामध्ये सर्वसाधारण सभा किंवा स्थायी समितीने मान्यता दिली असे नमूद केलेले असते. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, या बाबतचे आदेश उपलब्ध आहेत आणि प्रोसिजर सुद्धा सांगितल्याप्रमाणेच आहे. यावर समितीने विचारणा केली की, जर आपल्याकडे लेखी आदेश असतील तर ते समितीला सादर करावेत. २५ लाख रुपयापर्यंतच्या खरेदीचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिका-यांना आणि २८ लाख रुपयापर्यंतच्या खरेदीचे अधिकार स्थायी समितीच्या अध्यक्षांना आहेत. पुरवठा आदेश किंवा प्रशासकीय मान्यतेचे आदेश यावर कोणाची स्वाक्षरी असते. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, लेखी खुलाशाच्या आदेशबाबात माहिती घेऊन सांगण्यात येईल. तसेच पुरवठा आदेश व प्रशासकीय मान्यतेचे आदेश यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी असते.

यावर समितीने माहिती दिली की, मुळात उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) हे सक्षम प्राधिकारी असल्यामुळे त्यांची स्वाक्षरी लागते. परंतु तसे न करता मुख्य कार्यकारी अधिकारी हे स्वतःच सही करतात. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी माहिती दिली की, स्थायी समितीमध्ये झालेल्या ठरावावर स्थायी समितीचे अध्यक्ष आणि सचिव यांच्या सह्या होतात. त्यानंतर अध्यक्षांनी त्यांवर सही करावी असे आदेश काढले होते. परंतु त्यामध्ये स्पष्टता नाही, यामध्ये स्पष्टता आणावयास पाहिजे. तद्नंतर समितीने निदर्शनास आणून दिले की, पुरवठा आदेशावर मुख्य कार्यकारी अधिकारी सही करतात याचा अर्थ ते स्थायी समिती अध्यक्षांना डावलतात. परंतु बांधकाम किंवा सिंचन विभागाची कामे असतील तर कार्यारंभ आदेशावर केवळ कार्यकारी अभियंता सही करतात. पुरवठा आदेश आणि कार्यारंभ आदेश यामध्ये फरक नाही. एका ठिकाणी वस्तू खरेदी करावयाची आहे आणि दुस-या ठिकाणी कामाचे आदेश द्यावयाचे आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता विभाग प्रमुख म्हणून प्रत्येक कार्यारंभ आदेशावर स्वाक्षरी करतात. परंतु ज्या ठिकाणी वस्तू खरेदी करावायची आहे त्या पुरवठा आदेशावर मुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी हेच स्वाक्षरी करतात. ही प्रक्रियाच चुकीची आहे. कायद्यात या बाबत काहीच तरतूद नाही.

यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, दिनांक ३१ जानेवारी, २०१३ रोजीच्या शासन निर्णयात प्रशासकीय मान्यता आणि तांत्रिक मान्यता कोणी द्यावी या बाबत नमूद करण्यात आलेले आहे. दिनांक १७ ऑक्टोबर, २०१७ रोजी नवीन शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. त्यामध्ये अधिकारांत वाढ करण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रशासकीय मान्यता त्या त्या स्तरावर वित्तीय मर्यादेत दिल्या जातात. विषय समिती, स्थायी समिती किंवा जी.बी. मध्ये ठराव मंजूर केला तर त्यामध्ये "पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी" असे एक वाक्य असते. त्यानुसार लेखा संहितेतील नियम ११६ नुसार करार करण्याचे अधिकार जिल्हा परिषदेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत. तथापि, ८५ नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या प्रत्येक विभाग प्रमुखास कॉन्ट्रॅक्ट करण्याचे अधिकार डेलिगेट केले आहेत. त्यानुसार प्रत्येक विभाग प्रमुख पुरवठा आदेशावर स्वाक्षरी करतात.

यावर समितीने आक्षेप घेत विचारणा केली की, मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे समितीला असत्य माहिती देत आहेत. उदाहरणार्थ स्थायी समितीने ५० लाख रुपयांच्या खरेदीस मान्यता दिली तर करारनामा स्वीकृतीसाठी कोणाकडे पाठविला जातो, वास्तविक जो प्रशासकीय मान्यता देईल तोच करारनाम्यास मान्यता देईल. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विदित केले की, मुख्य कार्यकारी अधिका-यांकडे पाठविला जातो. परंतु कलम १२६ नुसार मान्यता देण्यासाठी ती बाब समितीपुढे जाईल. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा विभाग यांनी माहिती दिली की, कलम १२६ नुसार मुख्य कार्यकारी अधिका-यांना अधिकार आहेत आणि कलम ९६ नुसार मुख्य कार्यकारी अधिका-यांना पॉवर डेलिगेट करण्याचे अधिकार आहेत.

यावर समितीने विचारणा केली की, प्रशासकीय आणि तांत्रिक मान्यता देण्याबाबतचे अधिकार कोणाला आहेत या बाबतचा शासन निर्णय अस्तित्वात आहे. जर अध्यक्षांनी २८ लाख रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता दिली तर करारनामा कोण स्वीकृत करेल, त्या करारनाम्यावर कार्यकारी अभियंता सही करतील, परंतु तो करारनामा स्वीकृत कोण करेल, मुख्य कार्यकारी अधिका-यांनी प्रशासकीय मान्यता दिली असेल तर मुख्य कार्यकारी अधिकारी करारनामा करतील. करारनाम्यास जे सक्षम अधिकारी मान्यता देतील ते करारनामा स्वीकृत करतील. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विदित केले की, करारनामा हे विभाग प्रमुख करतील. परंतु नियम १२५ व १२६ नुसार सर्व संबंधितांना या बाबतचे अधिकार आहेत.

यावर संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विदित केले की, कायद्यातील कलम ११६ (१) मध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहे की, "Subject to the provisions of this Act, the Chief Executive Officer may, on behalf of the Zilla Parishad or on its behalf for the purposes of a Panchayat Samiti, enter into any contract or agreement in such manner and form as, according to the law for the time being in force, would bind him if such contract or agreement were on his own behalf." याचाच अर्थ कलम ११६ अंतर्गत मुख्य कार्यकारी अधिका-यांना अधिकार प्राप्त झालेले आहेत आणि कलम ९६ अंतर्गत ते सर्व अधिकार विभाग प्रमुखांना डेलिगेट करण्यात येतात. जिल्हा परिषदेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिका-यांना करारनामा करण्याचे अधिकार आहेत.

यावर समितीने मुद्दा उपस्थित केला की, परंतु जिल्हा परिषद जेव्हा अशाप्रकारे ठराव करेल तेव्हाच विभाग प्रमुखांना अधिकार प्राप्त होतील. जो सक्षम प्राधिकारी मान्यता देईल तो करारनामा स्वीकृत करेल आणि हेच अपेक्षित आहे. शिवाय लेखा संहितेमध्ये सुद्धा तेच नमूद आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केवळ प्रशासकीय बाबी मंजुरीसाठी येत असतात. विकासात्मक योजनांच्या बाबी व प्रशासकीय बाबी या मुख्य कार्यकारी अधिका-यांकडे येतात. ७३ वी घटना दुरुस्ती झाल्यानंतर योजनांच्या संख्येत वाढ झाली आणि त्यामुळे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिका-यांचे पद निर्माण करण्यात आले. सक्षम प्राधिकारी सोडून अन्य अधिका-यांनी प्रशासकीय मान्यता द्यावी असे जे सांगत आहात ते असत्य आहे. नाही तर उद्या प्रशासकीय मान्यता देणारा सक्षम अधिकारी यात अडकेल. जे करारनामा मंजूर करतात त्यांना तांत्रिक बाबीमध्ये कोणकोणत्या बाबी आहेत हे समजले पाहिजे. या बाबतीत विभागीय सचिवांची साक्ष घेतली पाहिजे.

यावर अधिक खुलासा करून संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी विदित केले की, करारनाम्याचा ड्राफ्ट स्थायी समितीने मंजूर करावा हे ठीक आहे. पण सह्या करण्याचा अधिकार कोणत्या तरी एका व्यक्तीला दिला पाहिजे. यावर समितीने पुढे विचारणा केली की, प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार स्थायी समितीच्या अध्यक्षांना आहेत आणि त्यामुळेच ते स्वाक्षरी करण्यास जबाबदार आहेत. जर एखाद्याने मंत्री महोदयांकडे नकारात्मक फाईल पाठविली तर संबंधित विभागाचे मंत्री विशेष बाब म्हणून ती फाईल मंजूर करतात. याचाच अर्थ विभागाने एखादी बाब अमान्य केल्यानंतर सुद्धा मंत्री महोदय आपल्या अधिकारात ती बाब मान्य करू शकतात. औषध खरेदीस प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्तांची तांत्रिक मंजुरी घेण्याची आवश्यकता असताना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांची त्यापूर्वी तांत्रिक मंजुरी घेण्याची कारणे काय आहेत, समितीला वाटते उक्त योजनेतून औषधी खरेदी झालेलीच नाही. कलम १२६ (१) मध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, "....shall be accepted or made, except with the previous sanction of such authorities or officers as may be prescribed by rules." याचाच अर्थ ज्यांनी मान्यता दिली ते सक्षम अधिकारी होय. मला वाटते जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि विभाग प्रमुखांनी ७३ व्या घटना दुरुस्तीची प्रस्तावना वाचली तर सर्व बाबी लक्षात येतील.

कलम ११६ (१) मध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, "या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून मुख्य कार्यकारी अधिका-यास जिल्हा परिषदेच्या वतीने किंवा पंचायत समितीच्या प्रयोजनासाठी जिल्हा परिषदेच्या वतीने अशा रितीने व अशा स्वरुपाची कोणतीही संविदा किंवा करार करता येईल की, जी त्याने स्वतःच्या वतीने केली असती तर ती त्यावेळी अंमलात असलेल्या कायद्यानुसार त्यास बंधनकारक झाली" तसेच ११६ (२) मध्ये नमूद करण्यात आले आहे की, "अशी प्रत्येक संविदा किंवा करार लेखी असेल आणि त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी सही करील आणि ज्या संविदेची किंवा कराराची विषयभूत रक्कम पाच हजार रुपयांहून अधिक असेल ती संविदा किंवा करार जिल्हा परिषदेच्या सामान्य मुद्रेने मोहोरबंद करण्यात" तसेच कलम ११६ (३) मध्ये नमूद केले आहे की, "या कलमान्वये मुख्य कार्यकारी अधिका-यास प्रदान करण्यात

आलेल्या अधिकारांचा वापर जिल्हा परिषदेच्या ज्या विभाग प्रमुखास किंवा गट विकास अधिका-यास, या बाबत मुख्य कार्यकारी अधिका-याने लेखी आदेशाद्वारे सर्वसाधारणपणे किंवा विशेषरित्या अधिकार दिला असेल अशा कोणत्याही विभाग प्रमुखास किंवा गट विकास अधिका-यास मुख्य कार्यकारी अधिका-याच्या नियंत्रणाला अधीन राहून आणि या अधिनियमाच्या तरतुदींच्या व त्यास विहित करणे योग्य वाटेल अशा, कोणत्याही शर्ती व मर्यादा असल्यास त्या शर्तींना व मर्यादांना अधीन राहून करता येईल. अशा दिलेल्या प्रत्येक आदेशाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी अध्यक्षांकडे व स्थायी समितीकडे किंवा संबंधित विषय समितीकडे किंवा पंचायत समितीकडे माहितीसाठी ताबडतोब पाठवील." या सर्व तरतुदींचा विचार करता कार्यालयीन आदेश कोणी द्यावेत, विषय समित्यांचे अधिकार काय आहेत, करारनामा कोणी करायचा आणि तांत्रिक मान्यता कोणी द्यायची या सर्व बाबतीत संदिग्धता आहे.

यानंतर समितीने मत व्यक्त केले की, प्रशासकीय मान्यता देणा-या सक्षम अधिका-याला कामाचा करारनामा कोणी केला आणि कोणत्या अटी व शर्तींच्या अधीन राहून केला हे माहीत नसेल तर ते त्या कामाचा आढावा आणि हिशेब घेऊ शकणार नाहीत. एकंदरीत या सर्व बाबींचा विचार करता मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित करण्याच्या बाबतीत वित्त विभाग, विधी व न्याय विभाग आणि ग्राम विकास विभागाच्या सचिवांची संयुक्त साक्ष घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

कामधेनू दत्तक ग्रामविकास योजना जिल्हा योजनेतून औषधी खरेदीसाठी स्थायी समितीने दिनांक २८ नोव्हेंबर, २०१३ रोजी मान्यता दिली असताना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक २५ फेब्रुवारी, २०१४ रोजी प्रशासकीय व तांत्रिक मंजूरीचे आदेश एवढ्या विलंबाने काढल्याप्रकरणी करण्यात आलेल्या सखोल चौकशीनुसार संबंधितांविरुद्ध जबाबदारी निश्चित करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

विलंबाबाबत चौकशीअंती पशुसंवर्धन विभागातील श्रीमती के.एस.राठोड, पशुधन पर्यवेक्षक हे दोषी असल्याचे निदर्शनास आल्यामुळे त्यांची महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (शिस्त व अपील) नियम, १९६४ नुसार एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात बंद केलेली आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**१) पशुसंवर्धन विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

**२) ग्रामविकास विभागाचे अभिप्राय (आस्था-८) :-** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने जालना जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १४ जुलै, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी प्रधान सचिव, पशुसंवर्धन विभाग यांनी विदित केले की, कामधेनू दत्तक ग्रामविकास योजना जिल्हा योजनेतून औषधी खरेदीसाठी स्थायी समितीने दिनांक २८ नोव्हेंबर, २०१३ रोजी मान्यता दिली असताना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी दिनांक २५ फेब्रुवारी, २०१४ रोजी प्रशासकीय व तांत्रिक मंजूरीचे आदेश एवढया विलंबाने काढल्याप्रकरणी करण्यात आलेल्या सखोल चौकशीनुसार संबंधितांविरुद्ध कारवाईच्या, दोषनिश्चितीचा अहवाल समितीला सादर करण्याबाबत आदेशित केले होते. याबाबत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी केली आहे. विलंबाबाबत चौकशीअंती समजले की, पशुसंवर्धन विभागातील श्रीमती के.एस.राठोड, पशुधन पर्यवेक्षक यांनी ४१ दिवस उशीरा नस्ती सादर केली आहे.

यावर समितीने विचारणा केली की, पुन्हा तेच घडत आहे. ४१ दिवस उशीर केला म्हणजे वरिष्ठ अधिकारी याकडे पाहत नाहीत. साप्ताहिक बैठक किंवा आढावा बैठक घेत नाहीत. यावर प्रधान सचिव, पशुसंवर्धन विभाग यांनी विदित केले की, चौकशी अहवालात नमूद असल्याप्रमाणे कारवाई केली आहे. यावर समितीने विचारणा केली की, वास्तविक ही खाते प्रमुखांची जबाबदारी असताना प्रधान सचिव खालच्या स्तरावरील कर्मचा-यांवर कारवाई करीत आहेत. यावर प्रधान सचिव, पशुसंवर्धन विभाग यांनी विदित केले की, इतिवृत्त पाहिले असता, नोट एनिशिएट करणे व ती वरिष्ठ स्तरापर्यत आणण्याची जबाबदारी एलएसएसची आहे. श्रीमती राठोड यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार होता.

यावर समितीने निदर्शनास आणून दिले की, खाते प्रमुखांनी ४१ दिवस उशीरा अहवाल सादर केला. खाते प्रमुखांच्या अधिनस्त असलेल्या कर्मचा-यांची या दरम्यान त्यांनी एकही दिवस साप्ताहिक सभा घेतली नाही. शासनाच्या कालबद्ध कार्यक्रमानुसार खातेप्रमुखांनी प्रत्येक आठवड्यास बैठक घेतली पाहिजे. वास्तविक नस्ती सादर करणे हे काम एलएसएसचे नाही, एलएसएसची जबाबदारी कारकुनी काम करण्याची नाही. जनावरांवर उपचार करण्याचे काम त्यांचे आहे. यावर प्रधान सचिव, पशुसंवर्धन विभाग यांनी विदित केले की, श्रीमती राठोड सेवानिवृत्त झाल्या आहेत, दोष निश्चीतीबाबतच्या अहवालात एलएसएस यांना जबाबदार व पात्र धरलेले आहे. त्यांची एक वेतनवाढ तात्पुरती रोखली आहे.

यावर समितीने आक्षेप घेत मत व्यक्त केले की, अशा प्रकरणात वरिष्ठ अधिका-यास जबाबदार धरले नाही तर असेच वर्षानुवर्षे चालत राहिल. वरिष्ठांवर कारवाई झाली तर ताबडतोब अहवाल मागितला जाईल. खालच्या अधिका-यावर कारवाई होत असल्याने वरिष्ठ पाहत नाहीत. यावर प्रधान सचिव, पशुसंवर्धन विभाग यांनी विदित केले की, अहवालात नमूद आहे की, वयोमानानुसार जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्यासह दोन्ही अधिकारी सेवानिवृत्त झाले आहेत. दोषीस शिक्षा बजावली आहे. समितीच्या आदेशाची पुर्तता झालेली आहे.

यावर समितीने आक्षेप घेत निदेश दिले की, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चुकीची चौकशी केली आहे. चौकशीचे काही निकष आहेत, जबाबदारी का व कोणावर निश्चित करायची हे त्यात आहे. पशुधन पर्यवेक्षकाचा पगार काढताना सांगता की त्याचे काम समाधानकारक आहे. दैनिक टिपणी तपासून त्याचे काम समाधानकारक आहे म्हणून त्याचा पगार मंजूर करता. परंतु लेखा आक्षेप आल्यावर त्याच्यावर जबाबदारी निश्चित करता, हे योग्य नाही. याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात यावी. वारंवार प्रत्येक विभागाशी संबंधी हा विषय येत असतो. यामुळे याबाबत धोरणात्मक निर्णय झाला पाहिजे. पंचायती राज समिती वर्ग-३ व वर्ग-४ चे कामकाज पाहण्यासाठी जात नाही.

यावर प्रधान सचिव, पशुसंवर्धन विभाग यांनी विदित केले की, विभागाने त्यांच्यावर कारवाई केली असती, परंतु सन २०१५ व २०१७ मध्ये हे दोघे सेवानिवृत्त झाले आहेत. सध्याच्या नियमाप्रमाणे त्यांच्यावर कारवाई करता येत नाही. यावर समितीने मत व्यक्त केले की, सन २०१३-२०१४ मध्ये लेखापरिक्षण झाले आहे. तेव्हाच त्यांच्यावर कारवाई करणे अपेक्षीत होते. हा मुद्दा सर्व विभागाशी संबंधीत आहे. याबाबत राज्याकरिता धोरणात्मक निर्णय घेतला गेला पाहिजे. प्रशासन गतिमान झाले पाहिजे. एखादी घटना घडली तर खालच्या कर्मचा-यावर जबाबदारी निश्चित करून आपण मोकळे होऊन जातो. विभाग प्रमुखांचीही जबाबदारी आहे की, त्यांनी साप्ताहिक बैठका घेणे, अभिलेख तपासणे त्याकडील केसेस निकाली निघाल्या पाहिजेत. समितीसमोर येणारी सर्व उत्तरे कायद्याला अनुसरुन आली पाहिजे, त्या प्रत्येक उत्तरात शासन निर्णय क्रमांक व दिनांकाचा उल्लेख झाला पाहिजे. अमुक शासन निर्णयामध्ये असे नमूद असून त्याप्रमाणे कोण दोषी आहे व कोणावर कारवाई करण्यात आली असे लिहिणे अपेक्षित आहे. यामध्ये विधी व न्याय विभागाचे अभिप्राय अप्राप्त आहेत.

यावर सचिव, विधी व न्याय विभाग यांनी खुलासा केला की, याबाबत शासन निर्णय आहे. यावर समितीने विचारणा केली की, शासनाच्या वतीने मार्गदर्शक तत्वे विधी व न्याय विभागाला निर्गमित करावयाची आहेत. यावर सचिव, विधी व न्याय विभाग यांनी विदित केले की, मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यासंबंधी विषय आहे. ही बाब ग्राम विभागाशी संबंधित आहे. यानंतर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, स्थायी समितीने मंजूर केल्यानंतर किती महिन्याच्या आत कारवाई करावी या संबंधी काही मार्गदर्शक तत्वे निर्गमित करणार काय यासंबंधी विधी व न्याय विभागाच्या सचिवांना बोलवण्यात यावे असे सांगण्यात आले होते. या करिता त्यांना बोलावले आहे.

यावर समितीने आक्षेप घेत विचारणा केली की, पहिल्या सभेपासून दुस-या सभेपर्यंतच्या कालावधीत कारवाई झाली पाहिजे. यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांची चूक झालेली आहे. निवृत्त होण्यापूर्वी पंचायती राज समितीने आक्षेप घेतला होता. सन २०१३-१४ चे लेखापरिक्षण झाले असून तेव्हाच आक्षेप घेण्यात आलेला आहे. सन २०१४ मधील खरेदी असून लेखापरिक्षण सन २०१४ मध्ये झाल्यानंतर सन २०१५ मध्ये सादर झाले. याबाबत कारवाई करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेची होती. ३ वेळा जिल्हा परिषदेला संधी दिली जाते. त्यातून समितीचे समाधान न झाल्यास तो मुद्दा या ठिकाणी येतो. विधी व न्याय विभागाचा असा मुद्दा होता की , सर्वसाधारण सभेचा ३० दिवसांचा कालावधी आहे. आज निर्णय झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी ३० दिवसात झाली पाहिजे. विषय समितीपुढे हा विषय जावा या करिता हा कालावधी दिलेला आहे. तरी देखील विहित मुदतीत कोणत्याही ठरावावर अंमलबजावणी होत नाही. कलम ११६ (१) प्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना डेलिगेशन ऑफ पॉवर्स बाबत अधिकार असल्याचे म्हटले होते. यावर सचिव, विधी व न्याय विभाग यांनी विदित केले की, कलम ११६ प्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना करार करण्याचा अधिकार आहे. ११६ (३) अंतर्गत हे अधिकार दुय्यम अधिका-याला डेलिगेट करण्याचा अधिकार आहे.

यावर समितीने निदर्शनास आणून दिले की, मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयीन प्रमुख आहेत व खातेप्रमुखांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांची कामे वाटून द्यायची आहेत. त्यांचे वेगळे अधिकार आहेत. जिल्हा परिषदेचे अधिकार ठरवून दिलेले आहेत. त्यामध्ये मात्र प्रशासकीय अधिकार सोडून त्यांचे अधिकार वापरता येत नाहीत.

यावर सचिव, विधी व न्याय विभाग यांनी समितीस नियम ११६ मध्ये “Subject to the provisions of this Act, the Chief Executive Officer may, on behalf of the Zilla Parishad or on its behalf for the purposes of a Panchayat Samiti, enter into any contract or agreeement in such manner and form as, according to the law for the time being in force, would bind him if such contract or agreement were on his own behalf.” हे अधिकार त्यांनी जिल्हा परिषदेच्या वतीने वापरायचे आहेत असे विदित केले.

यावर समितीने माहिती दिली की, सर्व अधिकार नाही तर केवळ शासनाने ठरवून दिलेले अधिकार. यावर सचिव, विधी व न्याय विभाग यांनी विदित केले की, कायद्याने व जिल्हा परिषदेने मान्य केलेले, समितीने मान्य केलेल्या ठरावानुसार करार करण्याबाबतचे अधिकार आहेत.

यावर समितीने विचारणा करून मत व्यक्त केले की, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या अधिनस्थ असलेले खातेप्रमुखांचे मुल्यमापन करणे, जिल्हा परिषद व विषय समित्यांनी घेतलेल्या ठरावाची अंमलबजावणी करणे, एखादा समाज कल्याणचा विषय असल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांची जबाबदारी आहे की, या बाबत समितीने असा निर्णय घेतला आहे, असे सांगणे. खाते प्रमुखांशी समन्वय करणे व आदेश निर्गमित करणे. मात्र मुख्य कार्यकारी अधिकारी विषय समित्यांचे ठराव पाहतात की, नाही ही देखील शंका आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी कधीच विषय समित्यांच्या बैठकांना जात नाहीत मात्र त्यांच्याकडे कार्यवृत्त जाते. वार्षिक लेखे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अर्थ समितीपुढे ठेवायचे आहेत. मात्र आतापर्यंत कोणतेही मुख्य कार्यकारी अधिकारी हे वार्षिक लेखे अर्थ समितीपुढे ठेवत नाही, केवळ सही करून पाठवून देतात. अर्थ समितीपुढे वार्षिक लेखे मंजूर झाल्यानंतर सप्टेंबर महिन्यातील सर्वसाधारण सभेसमोर मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आपले मत नोंदवून ते ठेवायचे आहेत. त्या नंतर हिवाळी अधिवेशनात त्याच वर्षी सभागृहात वार्षिक लेखे मांडले पाहिजेत. मात्र हे लेखे सध्या ४-५ वर्षानंतर मांडले जातात. त्यावर काय चर्चा होणार, ज्या दिवशी ते मांडले जातात, त्याच दिवशी तो विषय समजतो, हा फार अडचणीचा विषय आहे.

## अभिप्राय व शिफारशी

जालना जिल्हा परिषदेंतर्गत सन २०१३-२०१४ या वर्षामध्ये कामधेनू दत्तक ग्रामविकास योजना जिल्हा योजनेतून औषधी खरेदीबाबत पुढील प्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत.

ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक २० जून, २००१८ रोजीच्या परिपत्रकानुसार कामधेनू दत्तक ग्रामविकास योजना राबविण्यात आलेली नाही. उपयोगिता प्रमाणपत्र घेण्यात आलेली नाही. भांडारसाठ्याची प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही. ज्या वित्तिय वर्षात खरेदी केली आहे त्या वित्तिय वर्षात वाटप व विनियोजन केलेले नाही. विषय समितीच्या सभेत माहिती अवलोकनार्थ सादर केलेली नाही. उपरोक्त लेखा आक्षेपाच्या संदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, कामधेनू दत्तक ग्रामविकास योजनेस दिनांक २९ नोव्हेंबर, २०१३ रोजी जालना जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीने मान्यता दिलेली असताना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिका-यांनी दिनांक २५ फेब्रुवारी, २०१४ रोजी प्रशासकीय व तांत्रिक मंजुरीचे आदेश काढले आहेत. सदर आदेश काढण्यासाठी जवळपास तीन महिने विलंब झालेला आहे. स्थायी समितीने ज्या तारखेला मान्यता दिली त्याच तारखेला म्हणजेच दिनांक २८ नोव्हेंबर, २०१३ रोजी पुरवठा आदेश काढावयास पाहिजे होते. स्थायी समितीमध्ये झालेल्या ठरावावर स्थायी समितीचे अध्यक्ष आणि सचिव यांच्या स्वाक्ष-या झाल्यानंतर जिल्हा परिषद अध्यक्षांनी स्वाक्षरी करावी असे आदेश काढले होते. परंतु त्यामध्ये स्पष्टता नसल्यामुळे यासंदर्भात स्पष्टता आणण्यासाठी ग्रामविकास विभागातर्फे उचित कार्यवाही करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी.

तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम ११६ (१) मध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, "या अधिनियमाच्या तरतुदींना अधिन राहून मुख्य कार्यकारी अधिका-यास जिल्हा परिषदेच्या वतीने किंवा पंचायत समितीच्या प्रयोजनासाठी जिल्हा परिषदेच्या वतीने अशा रीतीने व अशा स्वरुपाची कोणतीही संविदा किंवा करार करता येईल की, जी त्याने स्वत:च्या वतीने केली असती तर ती त्यावेळी अंमलात असलेल्या कायद्यानुसार त्यास बंधनकारक झाली असती" तसेच ११६ (२) मध्ये नमूद करण्यात आले आहे की, "अशी प्रत्येक संविदा किंवा करार लेखी असेल आणि त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी सही करील आणि ज्या संविदेची किंवा कराराची विषयभूत रक्कम पाच हजार रुपयांहून अधिक असेल ती संविदा किंवा करार जिल्हा परिषदेच्या सामान्य मुद्रेने मोहरबंद करण्यात येईल" तसेच ११६ (३) मध्ये नमूद केले आहे की, "या कलमान्वये मुख्य कार्यकारी अधिका-यास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर जिल्हा परिषदेच्या ज्या विभाग प्रमुखास किंवा गटविकास अधिका-यास याबाबत मुख्य कार्यकारी अधिका-याने लेखी आक्षेपाद्वारे सर्व साधारणपणे किंवा विशेषरित्या अधिकार दिला असेल अशा कोणत्याही विभाग प्रमुखास किंवा गटविकास अधिका-यास मुख्य कार्यकारी अधिका-याच्या निमंत्रणाला अधीन राहून आणि या अधिनियमाच्या तरतुदींच्या व त्यास विहित करणे योग्य वाटेल अशा कोणत्यही शर्ती व मर्यादा असल्यास त्या शर्तींना व मर्यादांना अधीन राहून करता येईल अशा दिलेल्या प्रत्येक आदेशाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी अध्यक्षाकडे व स्थायी समितीकडे किंवा संबंधित विषय समितीकडे किंवा पंचायत समितीकडे माहितीसाठी ताबडतोब पाठवील" या सर्व तरतुदींचा विचार करता कार्यालयीन आदेश कोणी द्यावेत, विषय समित्यांचे अधिकार काय आहेत, करारनामा कोणी करायचा आणि तांत्रिक मान्यता कोणी द्यायची या सर्व बाबतीत संदिग्धता आहे. कारण **प्रशासकीय मान्यता देणा-या सक्षम अधिका-याला कामाचा करारनामा कोणी केला आणि कोणत्या अटी व शर्तींच्या अधीन राहून केला हे ज्ञान नसेल तर संबंधित अधिकारी त्या कामाचा आढावा आणि हिशेब घेऊ शकणार नाहीत या सर्व बाबींचा विचार करता याबाबत मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्याबाबत वित्त विभाग, विधी व न्याय विभाग आणि ग्रामविकास विभाग यांनी संयुक्तरित्या उपरोक्त तरतुदींसंदर्भात असणा-या संदिग्धता दुर करून संबंधित अधिनियमात स्वयंस्पष्ट सुधारणा अंतर्भूत करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, जालना

## तेराव्या वित्त आयोगाअंतर्गत केलेल्या विविध दुरुस्ती व बांधकामाबाबत

**परिच्छेद क्रमांक ४.३२८/१० (सन २०१३-१४)**

तेराव्या वित्त आयोगांतर्गत हिवर्डी येथे प्राथमिक शाळा खोली दुरुस्ती करणे, अहंकार देऊळगाव येथे गोपालनगर ते बोरखेडी मातीरस्ता आणि वंजार उम्रद येथे गावांतर्गत सिमेंट रस्ता ही कामे करण्यात आली व त्यावर १,२४,२९८/- इतका खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तावआ-२०१०/प्र.क्र./२२/वित्त-४, दिनांक ३० ऑगस्ट, २०१० अन्वये पंचायत समितीचे विविध ठरावानुसार विविध कामे मंजूर करणे आवश्यक आहे. मात्र या तीन कामांना शासन निर्णयाप्रमाणे अपेक्षित विकासाचा समतोल साधल्याचे दिसून आले नाही.

(२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए २०००/प्र.क्र.४४, दिनांक २२ डिसेंबर, २००० अन्वये मोजमाप पुस्तिकेत दिनांकित नोंदी करणे आवश्यक आहे. त्या प्रमाणे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ७७ - दोन नुसार नमुना ७ मध्ये पावती आवश्यक आहे. नियम ९७ नुसार नमुना नं. ३९ प्रमाणे स्थावर मालमत्ता नोंदवही व नमुना ४० प्रमाणे रस्ते नोंदवही ठेवणे आवश्यकता आहे. नियम १३२ प्रमाणे तांत्रिक अधिका-याची पाहणी अहवाल चिन्हांकित नकाशे आवश्यक आहे. नियम १४६ नुसार करारनाम्यावर दिनांक व कामाची मुदत नमूद असणे आवश्यक आहे. नियम १८० नुसार देयक प्रदान करताना मोजमाप पुस्तिकेतील त्या नोंदीवर लाल शाईने कर्णरेषा काढली पाहिजे. नियम १९७ नुसार नमुना ६९ मध्ये पूर्ण कामाची नोंद घेतलेली असावयास हवी.

(३) अंदाजपत्रकासोबत क्वारी चार्ट जोडणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जालना यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तावआ-२०१०/प्र.क्र./२२/वित्त-४, दिनांक ३० ऑगस्ट, २०१० मधील क (II) अ.क्र.१ ते १० नुसार पंचायत समिती स्तरावर करावयाच्या कामे व पंचायत समितीच्या सर्वसाधारण सभेने मंजुरी दिलेल्या ठरावाप्रमाणे कामे मंजूर करण्यात आलेली आहेत. तालुक्यामध्ये कामाची मागणी व निधी यांचे अवलोकन करून कामाच्या प्रमाणामध्ये निधी उपलब्ध नसल्याने कामाच्या आवश्यकतेनुसार सभेने कामे घेतलेली आहेत.

(२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए २०००/प्र.क्र.४४, दिनांक २२ डिसेंबर, २००० अन्वये मोजमाप पुस्तिकेत मौजे हिवर्डी येथील प्राथमिक शाळा दुरुस्ती करणे, मौजे अहंकार देऊळगाव येथील गोपालनगर ते बोरखेडी मातीरस्ता व वंजार उम्रद येथील गावाअंतर्गत सिमेंट रस्ता या तिन्ही कामाच्या मोजमाप पुस्तिकेत दिनांकित नोंदी केलेल्या आहेत व गोषवा-यावर काम पूर्ण झाल्याचा दिनांक नमूद केलेली आहे. सोबत मोजमाप पुस्तिकेची छायांकित प्रती जोडलेल्या आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ७७-दोन नुसार वरील तिन्ही कामाच्या ग्रामपंचायतीस प्रदान केलेल्या रकमांची नमुना नं. ७ ची पावती ग्रामपंचायतीकडून घेण्यात आलेल्या आहेत. सदर पावतीच्या छायांकित प्रती सोबत जोडलेल्या आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ९७ नुसार नमुना नं.३९, स्थावर मालमत्ता नोंदवही व नमुना नं.४० प्रमाणे रस्ता नोंदवही ठेवून वरील तिन्ही कामाच्या नोंदी घेतल्या आहेत.

बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद क्र.१३२ नुसार तांत्रिक अधिकारी यांनी वरील तिन्ही कामाचे स्थळ निरिक्षण करूनच प्रथम पाहणी अहवाल व प्रस्तावित कामांचे चिन्हांकित नकाशे अंदाजपत्रकासोबत जोडलेले आहे. सोबत छायांकित प्रती जोडलेल्या आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १४६ नुसार तिन्ही कामाच्या ग्रामपंचायतीबरोबर केलेल्या करारनाम्यावर दिनांक व कामाची मुदत नमूद केलेली आहे. सोबत करारनाम्याच्या छायांकित प्रती जोडलेल्या आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १८० नुसार तिन्ही कामाच्या मोजमाप पुस्तिकेवर मोजमाप नोंदवलेली सर्व पृष्ठे लाल शाईने कर्णरेषा काढण्यात आलेल्या आहेत. सोबत छायांकित प्रती जोडलेल्या आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १९७ नुसार पूर्ण झालेल्या कामांच्या नमुना नं. ६९ मध्ये नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. सोबत छायांकित प्रती जोडलेल्या आहेत.

(३) तिन्ही कामांच्या अंदाजपत्रकासोबत क्वारी चार्ट जोडण्यात आलेले आहेत. सोबत क्वारी चार्टची छायांकित प्रत जोडलेली आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

जालना जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, आक्षेपातील कामे ही शासन निर्णय २०१० मधील निश्चित कोणत्या बाबीमध्ये येतात. तसेच आक्षेपातील त्रुटींची/कागदपत्रांची पूर्तता लेखापरीक्षणापूर्वी केली होती की त्यानंतर केली आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, पंचायत समिती स्तरावर करावयाची कामे व पंचायत समितीच्या सर्वसाधारण सभेने मंजुरी दिलेल्या ठरावाप्रमाणे कामे मंजूर करण्यात आलेली आहेत. तालुक्यामध्ये कामाची मागणी व निधी यांचे अवलोकन करून कामाच्या प्रमाणामध्ये निधी उपलब्ध नसल्याने कामाच्या आवश्यकतेनुसार सभेने कामे घेतलेली आहेत. तशा प्रकारे प्रत्येक स्तरावर कामे हाती घेण्यात आलेली आहेत. क्वॅारी चार्ट जोडलेला आहे.

यावर समितीने विचारणा केली की, क्वॅारी चार्ट जोडले आहेत, लेखापरिक्षणावेळी जोडले नव्हते म्हणून आक्षेप निघाला आहे. तसेच नंतर क्वॅारी चार्ट जोडला असला तरी मायनिंग ऑफीसरची व सक्षम प्राधिका-याची स्वाक्षरी आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या संदर्भात माहिती घेऊन सांगण्यात येईल. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, लेखा आक्षेपानुसार तिन्ही कामांच्या अंदाजपत्रकासोबत क्वारी चार्ट जोडण्यात आलेले आहेत. सोबत क्वारी चार्टची छायांकित प्रत जोडलेली आहे, असे केवळ म्हटलेले आहे. हे बरोबर नाही. म्हणजे समितीला चुकीची माहिती दिली आहे. येथील अधिका-यांनी समितीला खोटी माहिती दिली आहे, समितीचा वेळ वाया घालविला आहे. समितीची दिशाभूल केल्याचा प्रकार या परिच्छेदाच्या बाबतीत झाला आहे. बाब क्र. १७ याकरिता संबंधित अधिकारी कारवाईस पात्र आहेत. म्हणून समिती निदेश देत आहे की, या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या प्रकरणी यापूर्वी कारवाई करणे अपेक्षित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी अशा प्रकारे अधिका-यांना संरक्षण का देत आहेत. जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांना यातील माहिती नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पदाधिका-यांसमोर माहिती ठेवलेली दिसत नाही.

समितीच्या दौ-याबाबतचे दिनांक ५ मे, २०१८ रोजीचे पत्र आहे. यानंतर सदरील दौरा पुढे ढकलण्याबाबत विनंती केलेली आहे. तरीही तयारी झालेली दिसत नाही. भंडारा येथे पंचायती राज समितीच्या बैठकीची तयारी १० दिवसात केली होती. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) यांनी विदित केले की, ते स्वतः ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रात प्राध्यापक आहेत, त्यांच्याकडे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) पदाचा कार्यभार दोन महिन्यांपासून आहे. त्यामुळे त्यांना माहित नाही. यावर समितीने तीव्र नाराजी व्यक्त करून असे मत व्यक्त केले की, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य यांना ही बाब माहित नाही याची कार्यवृत्तात नोंद घेण्यात येत आहे. त्यांना कोठेही काम करण्याचा अनुभव नाही, त्यामुळे ते अशा प्रश्नाचे उत्तर देऊ शकत नाही, त्यांनीदेखील असे स्पष्ट सांगितले आहे.

यावर समितीने विचारणा केली की, ज्याला क्वॅारी चार्ट जोडला नाही असे अंदाजपत्रक कोणी तयार केले आहे. तांत्रिक मान्यता कोणी दिली. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, उप अभियंता यांनी मान्यता दिलेली आहे, ५ लाखांचे अंदाजपत्रक आहे. त्यावर उप अभियंता यांनी खुलासा केला की, त्यांच्याकडे सध्या कार्यकारी अभियंता पदाचा कार्यभार आहे, हे काम त्यांच्या विभागाचे नाही. संबंधित अधिका-यांना बोलावून घेण्यात येईल. यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, तिन्ही कामे ५ लाख रुपयांपेक्षा कमी किंमतीची आहेत. संबंधित अधिका-यांनी चूक केलेली आहे. कामाचे देयक अदा केलेले आहे. सदर कामांची तपासणी केलेली नाही.

यावर समितीने विचारणा केली की, मुख्य लेखा व वित्त अधिका-यांनी पंचायत समित्यांना किती भेटी दिलेल्या आहेत, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, त्यांनी प्रत्येक पंचायत समितीला २ भेटी दिलेल्या आहेत. जाफ्राबाद पंचायत समितीला १ भेट दिलेली आहे. यावर समितीने असे निदेश दिले की, गौण खनिज २ किलो मीटर अंतरावरुन उचलले जाते. परंतु, ते २५ किलो मीटर अंतरावरून उचलल्याचे दाखविले जाते. अंदाजपत्रकासोबत क्वारी चार्ट जोडण्यात आलेला नाही. यामध्ये अनियमितता झाल्याचे दिसून येते. ज्या अधिका-यांवर जबाबदारी होती त्यांनी आपली जबाबदारी पार पाडलेली नाही. सदर प्रकरणाची तत्काळ चौकशी करून दोषी अधिका-यांवर कारवाई करून समितीला १५ दिवसात अहवाल सादर करावा. तसेच, कागदपत्रांची पूर्तता न करणे या संदर्भात संबंधित अधिका-यांवर मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार कारवाई करण्यात यावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

तेराव्या वित्त आयोगांतर्गत केलेल्या विविध दुरुस्ती बांधकामाबाबतच्या अंदाजत्रकासोबत क्वॅारी चार्ट जोडण्यात आलेला नाही, त्यामुळे झालेल्या अनियमिततेप्रकरणी करण्यात आलेल्या चौकशीनुसार संबंधिताची जबाबदारी निश्चित करून कोणती कार्यवाही केली आहे. तसेच उपरोक्त विविध दुरुस्ती बांधकामाबाबत लेखा परिक्षणावेळी कागदपत्राची पुर्तता न केल्याप्रकरणी महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार संबंधिताविरुद्ध केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सदर प्रकरणी संबंधितावर जबाबदारी निश्चित करण्यात येऊन लेखा परिक्षणास विविध विकास कामाचे अद्यावत अभिलेखे न दर्शविल्यामुळे संबंधिताचे पंचायत समिती, जालना आदेश क्र.पंसजा/आस्था/पंरासआ/कावि/२०१९/२४००, दिनांक २९ जुलै, २०१९ अन्वये एक वार्षिक वेतनवाढ बंद करण्याबाबत आदेशित केले आहे व लेखा परिक्षणाच्यावेळी कागदपत्राची पुर्तता न केल्याप्रकरणी संबंधितावर जबाबदारी निश्चित करण्यात येवून कार्यालयाचे आदेश क्र.पंसजा/आस्था/पंरासआ/कावि/२०१९/२४०१, दिनांक २९ जुलै, २०१९ अन्वये महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार दंडात्मक कारवाईसह दंडाची रक्कम रुपये २५,०००/- (अक्षरी रुपये - पंचवीस हजार मात्र) शासन खाती भरणा करणेबाबत आदेशित केले होते. त्यानुषंगाने श्री. डी. बी. सोनार, शाखा अभियंता यांच्याकडून दिनांक १ ऑगस्ट, २०१९ रोजी दंडाची रक्कम रुपये २५,०००/- पावती क्रमांक ७८५८२१ दिनांक १ ऑगस्ट, २०१९ रोजी भरणा केला आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय (वित्त-७) :-** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

सन २०१३-२०१४ या वर्षामध्ये जालना जिल्हा परिषदेमध्ये तेराव्या वित्त आयोगांतर्गत हिवर्डी येथे प्राथमिक शाळाखोली दुरुस्ती करणे, अहंकार देऊळगाव येथे गोपालनगर ते बोरखेडी माती रस्ता आणि वंजार उम्रद येथे गावांतर्गत सिमेंट रस्ता या तीन कामांवर रुपये १,२४,२९८/- एवढा खर्च करण्यात आला असून याबाबत पुढीलप्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले. ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक ३० ऑगस्ट, २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार पंचायत समितीच्या विविध ठरावानुसार विविध कामे मंजूर करणे आवश्यक होते. तथापि, सदर शासन निर्णयानुसार अपेक्षित विकासाचा समतोल साधल्याचे दिसून आले नाही. मोजमाप पुस्तिकेत नोंदी करणे आवश्यक होते. जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ७७-दोन नुसार नमुना ७ मध्ये प्रत्येक प्रदानाची पावती मिळविणे व ती संवितरण अधिका-याकडून साक्षांकित करून घेणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे स्थावर मालमत्ता नोंदवही व नमुना ४० प्रमाणे रस्ते नोंदवही ठेवणे, तांत्रिक अधिका-याचा पाहणी अहवाल, चिन्हांकित नकाशे, करारनाम्यावर दिनांक व कामाची मुदत नमूद असणे, मोजमाप पुस्तिकेतील नोंदीवर लाल शाईने कर्णरेषा काढणे, नमुना ६९ मध्ये पूर्ण कामाची नोंद घेणे आवश्यक होते. अंदाजपत्रकासोबत दगड खाणीचा नकाशा (क्वारी चार्ट) जोडणे देखील आवश्यक होते.

सदरहू लेखा आक्षेपाच्या संदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, **हिवर्डी येथे प्राथमिक शाळा खोली दुरुस्ती करणे, अहंकार देऊळगाव येथे गोपालनगर ते बोरखेडी माती रस्ता आणि वंजार उम्रद येथे गावांतर्गत सिमेंट रस्ता या तिन्ही कामांच्या अंदाजपत्रकासोबत क्वारी चार्टची छायांकित प्रत जोडल्याचे लेखी उत्तरामध्ये नमूद केलेले असले तरी अंदाजपत्रकासोबत क्वारी चार्ट जोडण्यात आलेला नाही. त्यामुळे यामध्ये अनियमितता झाल्याचे दिसून येते. यासंदर्भात ज्या संबंधित अधिका-यांवर जबाबदारी होती त्यांनी आपली जबाबदारी पार पाडलेली नाही, त्यामुळे समिति याप्रकरणी तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी व चौकशीनुसार दोषी आढळून आलेल्या अधिका-यांविरुद्ध कारवाई करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.**

तसेच **कागदपत्रांची पूर्तता न केल्याप्रकरणी वा अभिलेखे वेळेवर सादर न केल्याप्रकरणी मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार तत्कालिन शाखा अभियंता यांच्याकडून दंडाची रक्कम जास्त विलंबाने वसूल केल्याप्रकरणी समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. सबब, सदर प्रकरणी वसुली करण्यास विलंब झाल्याप्रकरणी संबंधितांची जबाबदारी निश्चित करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, जालना

## सामुहिक विकास योजनेअंतर्गत केलेल्या अंगणवाडी बांधकामाबाबत

**परिच्छेद क्रमांक ४.३२९/८ (सन २०१३-१४)**

१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/प्र.क्र.४४४/वित्त-९ दिनांक १५ जुलै २००८ अन्वये पंचायत समिती स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची माहिती पंचायत समितीच्या पुढील बैठकीत सादर करणे आवश्यक आहे, परंतु तसे केल्याबाबत पंचायत समितीचा ठराव दिसून आला नाही.

२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ परिशिष्ट-८ मधील भाग-२, १५ (४) नुसार ग्रामपंचायतीने संमती घेतलेली असली पाहिजे. तसेच नियम ९७ नुसार नमुना ३९ प्रमाणे स्थावर मालमत्ता नोंदवही व नमुना ४० प्रमाणे रस्ते नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. नियम १०७ अन्वये प्रशासकीय मान्यतेच्या ठरावाची प्रत अंदाजपत्रकावर नमूद करण्यात आली पाहिजे. नियम १४७ नुसार करारनामा नमुना नंबर ४८ मध्ये नोंदविण्यात आला पाहिजे. नियम १७७ (४) नुसार देयकावर ठेकेदाराची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. नियम १८० नुसार मोजमाप पुस्तिकेवरील नोंदीप्रमाणे प्रदान करताना त्या नोंदी लाल शाईने कर्णरेषा काढून खोडल्या पाहिजेत. नियम १९७ नुसार नमुना ६९ मध्ये पूर्ण कामाची नोंद घेतलेली असावयास हवी.

३) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/प्र.क्र.१८६४/५३ दिनांक १४ नोव्हेंबर १९९६ नुसार काम करण्यास ग्रामपंचायत सक्षम असल्याबाबत गट विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जालना यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.

१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/प्र.क्र.४४४/वित्त-९ दिनांक १५ जुलै, २००८ च्या शासन निर्णयानुसार दिलेल्या प्रशासकीय मान्यतेची माहिती पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करण्यात आली आहे, त्याबाबतचा ठराव पंचायत समिती सभागृहात घेण्यात आलेला नाही.

२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ परिशिष्ट-८ मधील भाग-२, १५ (४) नुसार ग्रामपंचायतीने संमती घेतलेली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ नुसार नियम ९७ अन्वये नमुना नंबर ३९ स्थावर मालमत्ता नोंदवही व नमुना नंबर ४० रस्ते नोंदवही ठेवण्यात आली आहे. नियम १०७ नुसार अंदाजपत्रक तयार करताना प्रशासकीय मान्यतेची प्रत सोबत जोडण्यात आली आहे. नियम १४७ नुसार करारनामा नमुना नंबर ४८ मध्ये नोंदविण्यात आला आहे. नियम १७७ (४) नुसार देयकावर ठेकेदाराची स्वाक्षरी घेण्यात आली आहे. नियम १८० नुसार मोजमाप पुस्तिकेवरील नोंदीप्रमाणे प्रदान करताना त्या नोंदी लाल शाईने कर्णरेषा काढून खोडून टाकण्यात आल्या आहेत. नियम १९७ नुसार पूर्ण झालेल्या कामांची नोंद नमुना नंबर ६९ मध्ये घेण्यात आली आहे.

३) सदरील काम हे ग्रामपंचायत सक्षम करण्यास असल्याचे प्रमाणपत्र गट विकास अधिकारी यांच्या सहीने देण्यात आलेले आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

जालना जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सामुहिक विकास योजेनेंतर्गत केलेल्या अंगणवाडी बांधकामाबाबत प्रशासकीय मान्यतेची माहिती कोणत्या मासिक बैठकीत अवलोकनार्थ ठेवण्यात आली, बैठकीच्या कार्यवृत्तांमध्ये तशी नोंद घेण्यात आली आहे काय, बैठकीचे कार्यवृत्तांत समितीस सादर करावे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक १५ जुलै, २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिलेल्या प्रशासकीय मान्यतेची माहिती पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करण्यात आली आहे.

यावर समितीने विचारणा केली की, सामुहिक विकास योजनेंतर्गत केलेल्या अंगणवाडी बांधकामास प्रशासकीय मान्यता कोणी दिली, सदरहू योजनेचा निधी कोणाच्या खात्यावर जमा झाला होता आणि सदरहू अंगणवाडी बांधकाम किती रकमेचे होते, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, सदरहू योजनेंतर्गत प्राप्त झालेला निधी मुख्य लेखा व वित्त अधिका-यांच्या खात्यावर जमा झाला होता. एका अंगणवाडी बांधकामाची किंमत ४.५ लाख रुपये होती.

यावर समितीने मत व्यक्त केले की, समितीच्या माहितीप्रमाणे त्या वेळी विभाग प्रमुखांना १० लाख रुपयांपर्यंत प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार होते. विभाग प्रमुखांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार असताना, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कशाच्या आधारावर प्रशासकीय मान्यता दिली, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, सदरहू अंगणवाड्यांच्या बांधकामाचे स्वरुप बघून प्रशासकीय मान्यता दिली होती. मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या अधिकार क्षेत्रात १ कोटी रुपयांच्या कामांना मान्यता देण्यात आली. अंगणवाडीचे एक युनिट लक्षात घेऊन प्रती अंगणवाडी बांधकामाचा खर्च ४.५ लाख रुपये गृहीत धरल्यास विभाग प्रमुखांनी प्रशासकीय मान्यता द्यावयाची होती, परंतु आम्ही सर्व अंगणवाडी बांधकाम एकत्रित केल्यामुळे १ कोटी रुपयांच्या कामांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या अधिकारात प्रशासकीय मान्यता दिली.

यावर समितीने नाराजी व्यक्त करुन मत व्यक्त केले की, वास्तविक पाहता १ कोटी रुपयांचे काम असल्यामुळे सर्वसाधारण सभेसमोर जाऊन मुख्य कार्यकारी अधिका-यांनी मान्यता घ्यावयास पाहिजे होती. समितीला वाटते मुळात मुख्य कार्यकारी अधिकारी यांना स्वतःचे अधिकार काय आहेत हेच माहीत नाही. त्यांना आपले अधिकार माहीत असते तर त्यांनी समितीसमोर अशाप्रकारे चुकीची उत्तरे दिली नसती. जिल्हा परिषदेतील सर्व अधिकारी हे मुख्य कार्यकारी अधिका-यांना मिसफिडींग करीत आहेत. तरी सुद्धा मुख्य कार्यकारी अधिकारी या नात्याने आपण अधिका-यांना वाचविण्याचा प्रयत्न करीत असाल तर मुख्य कार्यकारी अधिका-यांना या पदावर बसण्यात काहीच अर्थ नाही. ५० लाख रुपयांच्या वर प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार कोणाला आहेत हे मुख्य कार्यकारी अधिका-यांना माहीत असावयास पाहिजे. तद्नंतर या विषयी विभागीय आयुक्तांचे काय म्हणणे आहे असे समितीने विचारले असता उपायुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी समितीस विदित केले की, विभागीय आयुक्त कार्यालयाने मागच्या वर्षी सदरहू अहवालाचे वाचन करून तपासणी केली आहे. एकूण १०८ मुद्यांची तपासणी करून ते कम्युनिकेट केले आहेत. विभागीय आयुक्त कार्यालयाने केलेल्या तपासणीचा अहवाल उपलब्ध आहे.

यावर समितीने मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना विचारणा केली की, सदरहू बांधकामाचे देयक मुख्य लेखा व वित्त अधिका-यांच्या माध्यमातून झाले की थेट पंचायत समितीकडून झाले आहे, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विदित केले की, काम ग्रामपंचायती कडून केले जाते, हा कालमर्यादीत कार्यक्रम होता. सदरहू बांधकामाचे देयक जिल्हा परिषद येथून पंचायत समितीकडे पाठविण्यात येते व पंचायत समितीच्या माध्यमातून ग्रामपंचायतींना दिले जाते.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, पंचायत समिती क्षेत्रात किती अंगणवाड्यांचे बांधकाम मंजूर झाले आणि त्या बांधकामास कोणत्या विभाग प्रमुखांनी प्रशासकीय मान्यता दिली या बाबतची माहिती माहिती पुस्तिकेमध्ये नमूद करावयास पाहिजे होती. सदरहू बांधकामास ज्यांनी प्रशासकीय मान्यता दिली त्यांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकारच नाहीत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, विभाग प्रमुखांना जे अधिकार आहेत ते अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी आपल्या अखत्यारीत कधीही वापरु शकतात.

यावर समितीने आक्षेप घेत मत व्यक्त केले की, असे असेल तर मुख्य कार्यकारी अधिका-यांचे अधिकार सभापती वा अध्यक्ष हे सुद्धा वापरु शकतील. मुख्य कार्यकारी अधिका-यांना २५ लाख रुपयांपर्यंत प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार आहेत आणि अध्यक्षांना २८ लाख रुपयांपर्यंत प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार आहेत. मुख्य कार्यकारी अधिका-यांनी विहित मुदतीत प्रशासकीय मान्यता दिली नाही तर अध्यक्ष हे आपले अधिकार वापरु शकतात. शासनाने मुख्य कार्यकारी अधिकारी, विभाग प्रमुख आणि अध्यक्षांना आपापले अधिकार वाटून दिलेले आहेत. जर मुख्य कार्यकारी अधिकारी हे अध्यक्षांचे अधिकार वापरु शकत असतील तर अध्यक्ष सुद्धा मुख्य कार्यकारी अधिका-यांचे अधिकार वापरु शकतात. जिल्हा परिषद ही मुख्य कार्यकारी अधिकार चालवितात की जिल्हा परिषदेचे सदस्य वा पदाधिकारी चालवितात, मुख्य कार्यकारी अधिकारी हे जिल्हा परिषदेचे मालक होऊ शकत नाहीत किंवा ट्रस्टी होऊ शकत नाहीत. मुख्य कार्यकारी अधिकारी त्या ट्रस्टीतील केवळ एक अधिकारी आहेत आणि ही प्रक्रिया शासनाने निश्चित केलेली आहे. मुख्य कार्यकारी अधिका-यांनी चुकीची नोट पुट अप केली असेल तर त्यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी आक्षेप का घेत नाहीत, चुकीचे देयक करताना मुख्य लेखा व वित्त अधिकारी या बाबत विचारणा का करीत नाहीत, ज्यावेळी चुकीच्या गोष्टींच्या बाबतीत कारवाई करण्याची वेळ येते त्यावेळी मुख्य कार्यकारी अधिका-यांवर नव्हे तर संबंधित विभाग प्रमुखांवर कारवाई करण्यात येते. चुकीची प्रक्रिया राबविली जात असताना तत्कालिन उपमुख्य कार्यकारी अधिका-यांनी या बाबतची टिप्पणी का सादर केली नाही, कारण त्यावेळी १० लाख रुपयांपर्यंतच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार विभाग प्रमुखांना आणि ५० लाख रुपयांच्या वर प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार सर्वसाधारण सभेला होते. तत्कालिन विभाग प्रमुखांनी ही बाब मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या निदर्शनास आणून द्यावयास पाहिजे होती.

यावर तत्कालिन उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण यांनी खुलासा केला की, सदरहू बांधकामाचा निधी जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेचा होता. यावर समितीने विचारणा केली की, हा निधी जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेचा असल्यामुळे त्यास प्रशासकीय मान्यता मुख्य कार्यकारी अधिकारी देणार काय, जिल्हा परिषदेच्या कायद्याने जे नियम ठरवून दिलेले आहेत त्यानुसार काम करावयास पाहिजे होते. समितीला वाटते या प्रकरणी तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिका-यांवर कारवाई प्रस्तावित करावयास पाहिजे. त्यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कोण होते, यावर तत्कालिन उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण यांनी खुलासा केला की, त्यावेळी श्रीमती प्रेरणा देशभ्रतार या मुख्य कार्यकारी अधिकारी होत्या.

यावर समितीने मत व्यक्त केले की, एकंदरीत या सर्व चर्चेवरुन यामध्ये तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चूक केल्याचे निदर्शनास येत आहे. मुळात प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार विभाग प्रमुखांचे असताना मुख्य कार्यकारी अधिका-यांनी सर्व कामे एकत्रित करून स्वतःच्या अधिकारात प्रशासकीय मान्यता दिली. तसेच विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी सांगत आहेत की, विभाग प्रमुखांचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिका-यांना वापरता येतात. मुळात एवढ्या मोठ्या रकमेच्या कामासाठी प्रशासकीय मान्यता देत असताना सर्व साधारण सभेची मान्यता घ्यावयास हवी होती. त्यातच विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी या तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिका-यांनी केलेल्या चुकीचे समर्थन करीत आहेत. समितीला वाटते तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी आणि तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिका-यांवर कारवाई करावयास पाहिजे. तसेच विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी चुकीचे उत्तर देत असल्यामुळे त्यांना देखील समज दिली पाहिजे अशी समितीने नाराजी व्यक्त करून तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना विचारणा केली की, प्रशासकीय मान्यता देण्यापूर्वी पंचायत समितीला निधी दिला की नंतर दिला, यावर तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी विदित केले की, प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर निधी देण्यात आला.

तद्नंतर समितीने सदर विषयाच्या अनुषंगाने संबंधितांना पुढीलप्रमाणे निदेश दिले की, सामुहिक विकास योजनेंतर्गत केलेल्या अंगणवाडी बांधकामाच्या बाबतीत समितीने विविध प्रश्न उपस्थित केले. विभाग प्रमुखांना १० लाख रुपयांपर्यंतच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार होते आणि स्थायी समितीला ५० लाख रुपयांपर्यंतच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार होते. परंतु तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिका-यांनी एका अंगणवाडी बांधकामाचे ४.५ लाख रुपये इतक्या रकमेची अनेक कामे एकत्रित करून १ कोटी रुपयांपर्यंतच्या कामांना प्रशासकीय मान्यता दिली. वास्तविक पाहता एवढ्या रकमेच्या कामाच्या मंजुरीसाठी सर्वसाधारण सभेसमोर जाणे अनिवार्य होते. परंतु तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिका-यांना अधिकार नसताना सुद्धा त्यांनी प्रशासकीय मान्यता दिली. एकंदरीत यामध्ये शासनाने आखून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करण्यात आलेले आहे. तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी व तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी आपली जबाबदारी योग्यप्रकारे पार पाडली नाही. शिवाय या विषयाच्या अनुषंगाने विद्यमान मुख्य कार्यकारी अधिका-यांकडून समर्पक उत्तर येणे अपेक्षित होते. मुख्य कार्यकारी अधिका-यांनी अशाप्रकारे कामकाज पार पाडले तर प्रशासन गतिमान होणार नाही. प्रत्येक वेळी नियमांचे उल्लंघन करून काम केले जात असेल तर जिल्हा परिषद गतिमान होणार नाही. त्यामुळेच या संपूर्ण प्रकरणाची चौकशी होणे गरजेचे आहे. समिती असे निदेश देत आहे की, या संपूर्ण प्रकरणाच्या अनुषंगाने समितीने जे जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्यांची सखोल चौकशी करून यामध्ये जे अधिकारी/कर्मचारी दोषी असतील त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करून त्या बाबतचा अहवाल समितीला १५ दिवसांत सादर करावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होकारार्थी उत्तर दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक १४ नोव्हेंबर, १९९६ रोजीच्या शासन निर्णयानुसार ग्रामपंचायत काम करण्यास सक्षम असल्याबाबत गट विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. परंतु सध्या ग्रामपंचायतीला अग्रीम देण्यात येत नसल्यामुळे गट विकास अधिका-यांकडून ग्रामपंचायतीच्या सक्षमतेचे प्रमाणपत्र घेण्याची गरज नाही. त्यामुळे या संदर्भातील शासन निर्णयामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने ग्रामविकास विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती समितीला सादर करण्यात यावी ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सदरील मुद्याच्या अनुषंगाने याबाबत शासन स्तरावरुन कार्यवाही अभिप्रेत आहे.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय (वित्त-७) :—** ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक १४ नोव्हेंबर, १९९६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सक्षमता प्रमाणपत्र घेणे बंधनकारक होते. तथापि, आता ग्रामपंचायतीना अग्रीम देत नसल्यामुळे सक्षमता प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नसल्याबाबतचे परिपत्रक ग्रामविकास विभागाकडून निर्गमित करण्यात येईल.

### अभिप्राय व शिफारशी

सन २०१३-२०१४ या वर्षामध्ये जालना जिल्हा परिषदेमध्ये सामुहिक विकास योजनेअंतर्गत केलेल्या अंगणवाडी बांधकामाबाबत असे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत की, ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक १५ जुलै, २००८ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेच्या माहितीबाबतचा ठराव सादर केल्याचे दिसून आले नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ मधील तरतुदीनुसार ग्रामपंचायतीने संमती घेणे आवश्यक होते. तसेच नमुना ३९ प्रमाणे स्थावर मालमत्ता नोंदवही व नमुना ४० प्रमाणे रस्ते नोंदवही ठेवणे, नियम १०७ अन्वये प्रशासकीय मान्यतेच्या ठरावाची प्रत अंदाजपत्रकावर नमूद करणे आवश्यक होते. नियम १४७ नुसार करारनामा नमुना क्रमांक ४८ मध्ये नोंदविणे व नियम १७७ (४) नुसार देयकावर ठेकेदाराची स्वाक्षरी असणे आवश्यक होते. नमुना क्रमांक ६९ मध्ये पूर्ण कामाची नोंद घेणे आवश्यक होते. दिनांक १४ नोव्हेंबर, १९९६ नुसार काम करण्यास ग्रामपंचायत सक्षम असल्याबाबत गट विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र आवश्यक होते.

उपरोक्त लेखा आक्षेपाच्या संदर्भात जालना जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, सामुहिक विकास योजनेअंतर्गत केलेल्या अंगणवाडी बांधकामाबाबत ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक १५ जुलै, २००८ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिलेल्या प्रशासकीय मान्यतेची माहिती पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करण्यात आली आहे. सदरहू योजनेअंतर्गत प्राप्त झालेला निधी मुख्य लेखा व वित्त अधिका-याच्या खात्यावर जमा झाला होता. एका अंगणवाडी बांधकामाची किंमत रुपये ४.५ लक्ष एवढी होती. सर्व अंगणवाडी बांधकाम एकत्रित केल्यामुळे १ कोटी रुपयांच्या कामांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या अधिकारात प्रशासकीय मान्यता दिल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले आहे. तथापि, समितीच्या मते १ कोटी रुपयांचे काम असल्यामुळे जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेसमोर सदर मान्यता घेणे आवश्यक होते. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्हा परिषदेमधील अधिका-यांच्या जबाबदा-यांबाबत माहिती नसल्यामुळे व संबंधित अधिकारी समितीला दिशाभूल करणारी उत्तरे देत असल्यामुळे समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

सामुहिक विकास योजनेअंतर्गत केलेल्या अंगणवाडी बांधकामाच्या बाबतीत समितीच्या मते विभाग प्रमुखांना १० लाख रुपयांपर्यंतच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार होते आणि स्थायी समितीला ५० लाख रुपयांपर्यंतच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार होते. परंतु तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिका-यांनी एका अंगणवाडी बांधकामाचे ४.५ लक्ष रुपये इतक्या रकमेची अनेक कामे एकत्रित करून १ कोटी रुपयांपर्यंतच्या कामांना प्रशासकीय मान्यता दिली. वास्तविक पाहता एवढ्या रकमेच्या कामांच्या मंजुरीसाठी सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणे अनिवार्य होते. **तथापि, तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिका-यांनी अधिकार नसताना सुद्धा प्रशासकीय एकत्रित मान्यता दिली त्यामुळे शासनाने आखून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करण्यात आलेले आहे व तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी आपली जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडली नाही. या विषयाच्या अनुषंगाने विद्यमान मुख्य कार्यकारी अधिका-यांकडून समर्पक उत्तर येणे अपेक्षित होते. तथापि, प्रस्तुत प्रकरणी प्रत्येकवेळी नियमांचे उल्लंघन झाल्याचे दिसून येत असतानाही मुख्य कार्यकारी अधिकारी त्यांच्या अधिनस्त अधिका-यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न करीत असल्यामुळे समिती प्रस्तुत प्रकरणी तीव्र नाराजी व्यक्त करीत असून या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी व चौकशीनुसार या प्रकरणी जे अधिकारी/कर्मचारी दोषी आढळून आल्यास त्यांचेविरुद्ध प्रशासकीय कारवाई करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण सात

## जिल्हा परिषद, जालना

### खाजगी टँकरने पाणीपुरवठा केल्याबाबत कंत्राटदाराला केलेल्या प्रदानामधील अनियमिततेबाबत

**परिच्छेद क्रमांक ४.४७१/१३ (सन २०१३-१४)**

पंचायत समिती, परतूर, जिल्हा जालना येथे सन २०१३-२०१४ मध्ये (परिच्छेद क्रमांक १३) खाजगी टँकरने पाणीपुरवठा करणे या कामासाठी पंचायत समितीने माहे जुलै, २०१३ ते ऑगस्ट, २०१३ या कालावधीत रुपये ३८,६६,७३०/– इतका खर्च केला आहे. यामध्ये टँकर भाडे व किलोमीटर भाडे यांचा समावेश आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, परिपत्रक क्रमांक टंचाई १००२/ प्र.क्र.३९२/पापु १४, दिनांक ४ जानेवारी, २०१३ अन्वये गावात टँकर पोहोचल्यावर न चुकता ग्रामसेवक, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने नामनिर्देशित केलेले सदस्य व महिला सदस्य यांची स्वाक्षरी रोजवहीवर घेतल्याशिवाय देयके अदा करावयाची नाहीत अशा स्पष्ट सूचना आहेत. तसेच महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई १०९९/प्र.क्र.१२/पापु १४, दिनांक ३ फेब्रुवारी, १९९९ नुसार तपासणी पथके गठीत करून तपासण्या करण्यात आल्या नाहीत. तसेच या बाबतची कार्यवाही झालेली नाही.

२) ज्या कामासाठी टँकर कंत्राटदाराला प्रति किलोमीटर प्रमाणे भाडे अदा करण्यात आले त्या प्रमाणे त्याच्या लॉगबुकची तपासणी केली असता रोजवही गटविकास अधिकारी व तहसीलदार यांनी प्रमाणित केलेले नसून त्याचे क्षमता प्रमाणपत्र देखील आढळले नाही. रोजवही मध्ये नमूद केलेले दिवस व फेरी संख्या यामध्ये तफावत आढळून आली आहे. त्यानुसार रुपये ४,०४,०६९/- अधिक प्रदान करण्यात आले आहेत ते वसूल करण्यात यावेत.

३) देयकातील टँकरची नोंदवही पाहता प्रत्येक खेपेला मिटर रिडींग घेतलेली नाही. त्याचप्रमाणे पुरविण्यात आलेल्या पाण्यात टिसीएल पावडरचा उपयोग केला किंवा नाही याची नोंद नाही. ग्रामसेवक, सरपंच यांची एकाच दिवशी झालेल्या ३-४ फे-यांची एकत्रित स्वाक्षरी घेतलेली असून महिला सदस्यांची स्वाक्षरी नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जालना यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला**

१) आक्षेपात नमूद केल्याप्रमाणे सादर करण्यात येते की, गावात टँकर पोहचल्यावर टँकरच्या लॉगबुकवर ग्रामसेवक, सरपंच, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने नामनिर्देशित केलेले सदस्य व महिला सदस्य यांच्या स्वाक्ष-या असल्याची खात्री करूनच देयके अदा करण्यात आली आहेत. तसेच गटविकास अधिकारी यांचे दिनांक ५ फेब्रुवारी, २०१३ च्या आदेशान्वये तपासणी पथके गठीत करून तपासण्या करण्यात आलेल्या आहेत.

२) टँकर कंत्राटदाराला प्रति किलोमीटर प्रमाणे भाडे अदा करण्यात आले आहे. टँकरचे लॉगबुक गटविकास अधिकारी यांनी प्रमाणित केलेले आहे. तसेच जिल्हाधिकारी, जालना यांचे खाजगी टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचे आदेश जा.क्र.२०१३/मशाका/पाटं/कावी-२३१, दिनांक ५ मार्च, २०१३ मधील अटी व शर्तीनुसार उप अभियंता पाणीपुरवठा यांनी क्षमता प्रमाणपत्र दिलेले आहे. त्यानुसारच देयक पारित करण्यात आले. लॉगबुकमध्ये नमूद केलेले दिवस व फेरी संख्या यामध्ये तफावत नाही. त्यामुळे कंत्राटदारास जादा अदाई झालेली नाही. याबाबत अभिलेख्यांची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

३) खाजगी टँकर जुने असल्यामुळे मीटर नादुरुस्त होते. त्यामुळे मीटर रिडींग घेण्यात आलेली नाही. परंतु पाण्याच्या स्त्रोतापासून ते गावापर्यंत टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी, जालना यांचे खाजगी टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचे आदेश जा.क्र.२०१३/मशाका/पाटं/कावी-२३१, दिनांक ५ मार्च, २०१३ मधील अटी व शर्तीनुसार पाण्याचा स्त्रोत ते गाव याचे अंतराचे प्रमाणपत्र उपअभियंता (बांधकाम) यांना दिले असून त्या प्रमाणपत्रानुसार टँकरच्या नोंदवही मध्ये नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

टँकरद्वारे पुरविण्यात येणारे पाणी पिण्यासाठी असल्यामुळे त्यामध्ये टिसीएल पावडर ग्रामपंचायत स्तरावरुन पुरविण्यात आलेले असून पाण्याच्या टँकरमध्ये टाकण्यासाठी उपयोग केला नाही. तसेच ग्रामसेवक, सरपंच व महिला सदस्य यांच्या प्रत्येक फेरीला स्वाक्ष-या घेण्यात आलेल्या आहेत.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

जालना जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, लेखापरिक्षण अहवालातील दर्शविण्यात आलेल्या त्रुटींची पूर्तता केव्हा केली आहे, सदर पूर्तता स्थानिक निधी लेखापरिक्षा विभागाकडून तपासून घेण्यात याव्यात. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, गावात टँकर पोहोचल्यावर टँकरच्या रोजवहीवर ग्रामसेवक, सरपंच, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने नामनिर्देशित केलेले सदस्य व महिला

सदस्य यांच्या स्वाक्ष-या असल्याची खात्री करूनच देयके अदा करण्यात आली आहेत. तद्नंतर समितीने विचारणा केली की, जुलै ते ऑगस्ट, २०१३ या दोन महिन्यांच्या कालावधीमध्ये ३८ लाख ६६ हजार ७३० रुपये खर्च झाले आहेत. दोन महिन्यांमध्ये एवढा निधी कसा लागला, यावर टँकर कंत्राटदाराला प्रति किलोमिटर प्रमाणे भाडे अदा करण्यात आले आहे. टँकरचे लॉगबुक गटविकास अधिकारी यांनी प्रमाणित केलेले असून त्यानंतरच पैसे देण्यात आले आहेत असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस उत्तर दिले. या उत्तराच्या अनुषंगाने समितीने याबाबतची कागदपत्रे सादर करावीत असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केल्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला कागदपत्रे सादर केली.

यावर समितीने आक्षेप घेत विचारणा केली की, सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये खाडाखोड करण्यात आलेली आहे. एकूण किती टँकरमार्फत पाणीपुरवठा करण्यात आला होता. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत सविस्तर माहिती घेऊन समितीस सादर करण्यात येईल असे आश्वासित केले. यावर समितीने विचारणा केली की, यामध्ये गटविकास अधिकारी यांच्या अॅटेस्टेशनची काय गरज आहे. गटविकास अधिकारी यांनी तेथे जाऊन प्रत्यक्ष वस्तुस्थिती पाहिलेली आहे का, प्रमाणपत्रांवर स्वाक्ष-या करताना गटविकास अधिकारी यांनी प्रत्यक्षात अंतर किती आहे याची खातरजमा केली होती का, कारण टँकरचे मिटर तर नादुरुस्त होते. तसेच लॉगबुकवर कोणी स्वाक्षरी केली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, महिला सदस्यांनी स्वाक्षरी केलेली आहे.

यावर समितीस मिळालेल्या उत्तराच्या अनुषंगाने आक्षेप घेत विचारणा केली की, लॉगबुकवर वाहनचालक व सक्षम अधिकारी यांची स्वाक्षरी असली पाहिजे. तसेच साक्षीदार म्हणून महिला सदस्यांची स्वाक्षरी असली पाहिजे. सदर लॉगबुक कोणी प्रमाणित केले आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, गटविकास अधिकारी यांनी लॉगबुक प्रमाणित केले आहे. यावर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निदर्शनास आणून दिले की, पृष्ठ क्रमांक ३२ वरील परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद केलेले आहे की, “ ज्या कामासाठी टँकर कंत्राटदाराला प्रति किलोमीटर प्रमाणे भाडे अदा करण्यात आले त्याप्रमाणे त्याच्या लॉगबुकची तपासणी केली असता लॉगबुक गटविकास अधिकारी व तहसीलदार यांनी प्रमाणित केलेले नसून, त्याचे क्षमता प्रमाणपत्र देखील आढळले नाही. लॉगबुकमध्ये नमूद केलेले दिवस व फेरी संख्या यामध्ये तफावत आढळून आली आहे........, ” तसेच लॉगबुकवर सर्वच महिलांनी स्वाक्ष-यांच्या जागी अंगठे दिलेले आहेत. सर्वच साक्षीदार महिला निरक्षर आहेत का, हे सर्व रेकॉर्ड बनावट आहे, असे समितीला वाटते.

तद्नंतर समितीने पुढीलप्रमाणे मत व्यक्त करून निदेश दिले की, खाजगी टँकरने पाणीपुरवठा केल्याबाबत कंत्राटदाराला केलेल्या प्रदानामधील अनियमिततेबाबत हा परिच्छेद आहे. यामध्ये त्रुटींची पूर्तता करताना सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये सर्वच महिलांच्या स्वाक्ष-यांच्या जागी अंगठे घेण्यात आलेले आहेत. याबाबत सखोल चौकशी होण्याची आवश्यकता आहे. ज्यावेळी ऑडिट झाले त्यावेळी याबाबतचे रेकॉर्ड उपलब्ध नव्हते, हे सर्व नंतर तयार करण्यात आले आहे. या सर्व गोष्टी जाणिवपूर्वक व गैरप्रकार लपविण्यासाठी झाल्या किंवा कसे याबाबत सखोल चौकशी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून या प्रकरणी महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार २५ हजार रुपये दंड, सेवा पुस्तिकेत नोंद आणि एक वर्षाची वेतनवाढ रोखण्याबाबतची कारवाई प्रस्तावित करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस १५ दिवसांमध्ये सादर करावा.

यावर समितीच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येईल असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस आश्वासित केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

खाजगी टँकरने पाणीपुरवठा केल्याबाबत कंत्राटदाराला केलेल्या प्रदानामधील अनियमितताबाबत तसेच त्रुटींची पूर्तता करताना सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये सर्वच महिलांच्या स्वाक्ष-यांच्या जागी अंगठ्याचे ठसे घेण्यात आलेले आहेत. चौकशीनुसार जबाबदारी निश्चित करून त्यांचेविरुद्ध केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तसेच या संदर्भातील कागदपत्रे लेखा परिक्षणावेळी न दर्शविल्यामुळे महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

खाजगी टँकरने पाणीपुरवठा केल्याबद्दल कंत्राटदाराला केलेल्या प्रदानामधील अनियमितताबाबत तसेच त्रुटीची पूर्तता करताना सादर करण्यात आलेल्या टँकरच्या लॉगबुकमध्ये काही ठिकाणी टँकरची ट्रीप आल्यावर ज्या महिला उपस्थित होत्या त्यांच्या स्वाक्ष-या घेण्यात आल्या आहेत. तथापि, काही ठिकाणी महिला निरक्षर असल्याने त्यांचे अंगठ्याचे ठसे टँकरचालकांनी घेतले होते. तसेच लेखा परिक्षणास अभिलेखे न दर्शविल्याने संबंधित श्री.ए.पी.पोतदार, सेवानिवृत्त शाखा अभियंता यांचेवर जबाबदारी निश्चित करून या प्रकरणी महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० चे कलम ७ नुसार रुपये २५,०००/— दंडाची रक्कम तात्काळ या कार्यालयास चलनाद्वारे भरणा करणेबाबत

आदेशित केले आहे. संबंधित कर्मचारी सेवानिवृत्त झाले असल्याने रोख रक्कमेचा भरणा न केल्यास सेवानिवृत्तीच्या लाभातून एकरकमी वसुलीबाबत नोटीस क्रमांक १०२०, दिनांक १७ जुलै, २०१९ रोजी देण्यात आली आहे. सोबत आदेशाची प्रत संलग्न करण्यात येत आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय (वित्त-७) :—** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने जालना जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १४ ऑगस्ट, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या सचिवांनी विदित केले की, टँकरच्या संबंधी तक्रार होती. त्यामध्ये काही त्रुटी दिसल्या होत्या. टँकर गावात पोहचतो तेव्हा टँकर पोहचला आहे म्हणून स्थानिक महिलांच्या स्वाक्ष-या घेतल्या पाहिजेत असा नियम आहे. काही ठिकाणी सह्या घेतल्या तर काही ठिकाणी त्यांचा अंगठा घेतला. काही महिला निरक्षर होत्या. तो रेकॉर्ड कनिष्ठ अभियंता यांनी लेखा परिक्षणाच्यावेळी दाखवला नाही, यामुळे दंड लावण्यात आला. दंड भरण्याचे आता आदेशित केले आहे. २५ हजार रुपयांचा दंड लावला आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

जालना जिल्ह्यातील पंचायत समिती, परतूर येथे माहे जुलै ते ऑगस्ट, २०१३ या कालावधी दरम्यान खाजगी टँकरने पाणीपुरवठा केल्याबाबत संबंधित कंत्राटदाराला ३८,६६,७३०/- रुपये इतके प्रदान करण्यात आले. यामध्ये टँकरभाडे व किलोमीटर भाडे यांचा समावेश करण्यात आला होता. महाराष्ट्र शासन, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या दिनांक ४ जानेवारी, २०१३ रोजीच्या परिपत्रकानुसार टँकर पोहोचल्यावर न चुकता ग्रामसेवक, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने नामनिर्देशित केलेले सदस्य व महिला सदस्य यांची स्वाक्षरी लॉगबुक वर घेतल्याशिवाय देयके अदा करावयाचे नाहीत अशा स्पष्ट सूचना आहेत. तसेच पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या दिनांक ३ फेब्रुवारी, १९९९ रोजीच्या शासन निर्णयानुसार तपासणी पथके गठीत करून तपासणी करणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी सदरहू नियमातील तरतुदीनुसार कार्यवाही न झाल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

टँकर कंत्राटदाराला किलोमीटर प्रमाणे भाडे अदा करताना लॉगबुक गटविकास अधिकारी व तहसीलदार यांनी प्रमाणित केले नसल्याचे तसेच क्षमता प्रमाणपत्र देखील आढळून न आल्याचे तसेच लॉगबुक मध्ये दिवस व फेरी यांच्या संख्येमध्ये तफावत आढळून आली असून कंत्राटदाराला रुपये ४,०४,०६९/- इतके अधिकचे प्रदान झाले असल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

या अनुषंगाने समितीने ज्यावेळी लेखापरिक्षण झाले त्यावेळी याप्रकरणातील गैरप्रकार जाणीवपूर्वक लपविण्यासाठी या संदर्भातील दस्ताऐवज उपलब्ध केले गेले नाहीत, यासंदर्भातील कागदपत्रे नंतर तयार केली गेली असल्याचे तसेच अनियमिततेबाबत त्रुटींची पूर्तता करताना सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये सर्वच महिलांच्या स्वाक्ष-यांच्या जागी अंगठे घेण्यात आले असल्याचे समितीच्या निदर्शनास आले असून याबाबत सखोल चौकशी करून संबंधितांवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार २५,०००/- रुपये दंड, सेवापुस्तिकेत नोंद आणि एक वर्षाची वेतनवाढ रोखण्याबाबत कारवाई प्रस्तावित करण्याबाबत समितीने निर्देश दिले.

समितीने दिलेल्या निर्देशास अनुसरुन जिल्हा परिषदेमार्फत टँकरच्या लॉगबुक मध्ये काही ठिकाणी टँकरची ट्रीप आल्यावर ज्या महिला उपस्थित होत्या त्यांच्या स्वाक्ष-या घेण्यात आल्या तथापि, काही ठिकाणी महिला निरक्षर असल्याने त्यांचे अंगठ्याचे ठसे घेण्यात आले, तसेच लेखापरिक्षणास अभिलेखे न दर्शविल्याने संबंधित श्री.ए.पी.पोतदार, सेवानिवृत्त शाखा अभियंता यांचेवर जबाबदारी निश्चित करून महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार रुपये २५,०००/— दंडाची रक्कम तात्काळ भरण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले असून सदरहू कर्मचारी सेवानिवृत्त असल्याने रोख रकमेचा भरणा न केल्यास सेवानिवृत्तीच्या लाभातून एक रकमी वसुलीबाबत दिनांक १७ जुलै, २०१९ रोजी नोटीस बजावण्यात आली असल्याचे समितीस अवगत करण्यात आले. **या अनुषंगाने श्री.ए.पी.पोतदार, सेवानिवृत्त शाखा अभियंता यांचेकडून दंडाच्या वसुली झाली असल्यास त्यासंदर्भातील इत्यंभूत माहिती समितीस उपलब्ध करून देण्यात यावी, तसेच अद्यापपावेतो वसुली झाली नसल्यास तातडीने रक्कम वसूल करण्यासंदर्भात कार्यवाही व्हावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत उपलब्ध करून देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

सदरहू प्रकरणी कंत्राटदारास रुपये ४,०४,०६९/- इतके अधिकचे प्रदान झाले असून या सर्व गैरप्रकार व अनियमिततेमध्ये कंत्राटदाराचा सुद्धा सहभाग असल्याचे समितीचे अभिप्राय असून सदरहू रक्कम संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्यात यावी तसेच या गैरप्रकारामध्ये कंत्राटदाराचा सहभाग स्पष्ट झाल्यास संबंधित कंत्राटादारांना काळ्या यादीमध्ये टाकण्यासंदर्भात कार्यवाही व्हावी, अशी समितीची शिफारस आहे.

प्रकरण आठ

## जिल्हा परिषद, जालना

## पंचायत समित्यांनी लेखापरिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे

**परिच्छेद क्रमांक ४.७९३/१० (सन २०१३-२०१४)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद, पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहीत मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरी सुद्धा लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते, त्यामुळे असे परिच्छेद लेखापरिक्षण अहवालात समाविष्ठ केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदांबाबत लेखापरिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसांचे आत सादर करणेबाबत सूचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देवून सुद्धा लेखापरिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्यांबाबत लेखापरिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जालना यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला**

बांधकाम विभागाचे अभिलेखे लेखापरिक्षणास दर्शविण्याबाबत लेखापरिक्षण पथकाच्या अर्धसमास पत्राच्या अनुषंगाने या कार्यालयाने उप अभियंता बांधकाम व बांधकाम शाखा प्रमुख श्री.एन.के.रायपील्ली, वरिष्ठ सहाय्यक, श्री.एस.एस.सुंगधे, तत्कालिन शाखा अभियंता व श्री.एम.आर.सोमवंशी, तत्कालिन शाखा अभियांता यांना दिनांक १२ ऑगस्ट, २०१४, दिनांक २८ ऑगस्ट, २०१४ व दिनांक १६ सप्टेंबर, २०१४ च्या पत्रान्वये लेखापरिक्षण करून घेण्याबाबत कळविण्यात आले होते. तरीसुद्धा संबंधितांनी लेखापरिक्षणास अभिलेखे दर्शविले नाही. अभिलेखे न दर्शविल्यामुळे मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा (सुधारणा) अध्यादेश, २०११ चे कलम ८ अन्वये संबंधितांकडून रुपये २५,००० दंड वसुलीची कार्यवाही चालू आहे. सद्यःस्थितीत सदरील अभिलेखे लेखापरिक्षणास दर्शविण्यासाठी उपलब्ध आहेत.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

जालना जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २७ सप्टेंबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, लेखापरीक्षणास अभिलेख सादर न केल्याबाबत संबंधितांवर कोणती प्रशासकीय व दंडात्मक कारवाई केली आहे, वास्तविक पाहता लेखापरीक्षणाच्या वेळी आवश्यक ती कागदपत्रे सादर न केल्यामुळे संबंधितांवर आपण तात्काळ कारवाई करणे अपेक्षित होते की नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, संबंधितांकडून २५ हजार रुपये दंड वसुलीची कार्यवाही सुरू आहे. त्याच वेळी कारवाई करणे अपेक्षित होते. तद्नंतर समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेने तात्काळ कारवाई का केली नाही, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेमार्फत तात्काळ एक महिन्यात कारवाई करण्यात येईल.

तथापि, बैठक सुरू असताना गणवेशधारी पोलीस अधिकारी यांनी सभागृहात येऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सॅल्यूट केल्यामुळे समितीने तीव्र नापसंती व खेद व्यक्त करून असे मत व्यक्त केले की, समितीची बैठक सुरू असताना गणवेशधारी पोलीस कर्मचा-याने सभागृहात येऊन सॅल्यूट करणे हे कोणत्या नियमात आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, बाहेर गर्दी होऊ नये म्हणून त्यांना बाहेरील कर्तव्य दिले आहे. त्यांना कदाचित समितीचे संकेत माहीत नसल्यामुळे ते आत आले असावेत. यावर समितीने आक्षेप घेत अशी विचारणा केली की, संबंधित पोलीस कर्मचा-यास जिल्हा परिषदेच्या परिसरातून लोकांना हाकलून लावण्याचा अधिकार नाही. सर्वसामान्य जनता समितीला भेटण्यासाठी येत असताना मुख्य कार्यकारी अधिकारी हे पोलिसांच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला हाकलून लावत आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, जिल्हा परिषदेचा परिसर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अखत्यारित असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना त्यासंदर्भातील अधिकार आहेत.

या खुलाशावर तीव्र आक्षेप घेत समितीने असे मत व्यक्त केले की, मुख्य कार्यकारी अधिकारी या जिल्हा परिषदेच्या प्रशासक नाहीत. मुख्य कार्यकारी अधिकारी शासनाच्या नोकर आहेत. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी पंचायती राज समितीपेक्षा मोठ्या नाहीत ही गोष्ट लक्षात घ्यावी तसेच पंचायत समित्यांनी लेखापरिक्षणासाठी अभिलेखे सादर न केल्याप्रकरणी प्रस्तुत परिच्छेदासंदर्भात पंचायती राज समिती येण्यापूर्वी संबंधितांवर

दंडात्मक कारवाई का केली नाही, पाच महिन्यांपूर्वी बैठकीबाबत पत्र व्यवहार करून सुद्धा अद्यापपर्यंत कारवाई न करता, त्यांना पाठीशी घालण्याचे काम का करण्यात येत आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, सदर परिच्छेदाच्या अनुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यात विलंब झाला हे मान्य आहे. या प्रकरणी लवकरात लवकर संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

तथापि, याबाबत समितीने असे मत व्यक्त केले की, वास्तविक पाहता समितीच्या दौ-यापूर्वीच संबंधितांवर कारवाई करणे अपेक्षित होते. परंतु आपण संबंधितांवर कारवाई न करता त्यांना पाठीशी घालण्याचे काम केले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून आपण आपली जबाबदारी पार पाडली नाही. त्यामुळे आपल्यावरच कारवाई का प्रस्तावित करु नये, हा लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवाल सन २०१३-१४ चा आहे. या अहवालाच्या अनुषंगाने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या बाबतीत संबंधितांवर अगोदरच कारवाई करणे अपेक्षित असताना मुख्य कार्यकारी अधिका-यांनी कारवाई केलेली नाही. कारवाई करण्याबाबत विभागीय उपायुक्तांचे काय म्हणणे आहे अशी समितीने विचारणा केली असता विभागीय उपायुक्त यांनी खुलासा केला की, दंडाची वसुली ही समितीच्या दौ-यापूर्वीच करणे अपेक्षित होते.

यावर समितीने असे निदेश दिले की, मुख्य कार्यकारी अधिका-यांनी समिती दौ-यावर येईपर्यंत कारवाई केली नाही. त्यांनी कारवाई करण्यात दिरंगाई केली आहे. किंबहुना त्यांनी संबंधितांना जाणीवपूर्वक पाठीशी घालण्याचे काम केले आहे. या प्रकरणी आयुक्त कार्यालयाच्या माध्यमातून या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून समितीला कारवाईसह अहवाल सादर करावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

लेखापरिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे बाबत—परतूर पंचायत समितीमधील संबधित अधिका-यांनी लेखा परिक्षणावेळी कागदपत्रे सादर न केल्याप्रकरणी या संदर्भातील कागदपत्रे लेखापरिक्षणावेळी न दर्शविल्यामुळे महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली**

परतूर पंचायत समिती अंतर्गत लेखापरिक्षणास अभिलेखे न दर्शविल्याने संबधितावर जबाबदारी निश्चित करून या प्रकरणी मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० चे कलम ७ नुसार रुपये २५,००० दंडाची रक्कम पावती क्रमांक ७७६१८७ दिनांक १ ऑगस्ट, २०१९ रोजी भरणा करण्यात आले.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :—** (वित्त-७) जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने जालना जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ६ व १४ ऑगस्ट, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी अशी विचारणा केली की, जिल्हा बैठकीच्या वेळी एका गणवेशधारी पोलीस अधिका-याने सभागृहात येऊन मुख्य कार्यकारी अधिका-यांना अभिवादन केले होते ते पोलीस अधिकारी कोण होते हे सुद्धा कळविलेले नाही. तसेच अशाप्रकारे अभिवादन करण्यामागे नेमका काय उद्देश होता व हे कितपत योग्य आहे याबाबत मुख्य कार्यकारी अधिका-यांनी समितीला सांगितले पाहिजे. समितीचे मत आहे की, या संपूर्ण प्रकारामुळे समितीचा अवमान झाला आहे. वास्तविक पाहता समिती प्रमुखांना राज्यमंत्र्यांचा दर्जा असताना सुद्धा त्या बाबीकडे दुर्लक्ष करण्यात आले होते. या प्रकरणी जिल्हा परिषदेने संबंधितांवर काय कारवाई केली आहे. या प्रकरणी संबंधितांकडून खुलासा मागवून समितीच्या पुढील बैठकीच्या वेळी तो सादर करावा.

यावर या संपूर्ण प्रकारामुळे समितीचा अवमान झाला असे वाटत असेल तर सर्वप्रथम प्रधान सचिवांनी ग्रामविकास विभागाच्या वतीने दिलगिरी व्यक्त केली. मुळात समिती ही संपूर्ण विधानसभेचे आणि संपूर्ण राज्याचे प्रतिनिधित्व करते. विभागीय साक्षीच्या वेळी सुद्धा पाच-सात आमदार प्रश्न विचारत नसून, समितीमार्फत संपूर्ण विधानसभा प्रधान सचिवांना प्रश्न विचारत असते. राजशिष्टाचाराच्या बद्दल कोणाच्या मनात काही संदिग्धता असण्याचे कारण नाही. समितीचा अवमान झाला असे वाटले असेल तर ग्रामविकास विभागाचा प्रधान सचिव म्हणून पुन्हा एकदा दिलगिरी व्यक्त करतो.

यावर समितीने मत व्यक्त केले की, समितीच्या मते ते पोलीस शिपाई नव्हते, ते पोलीस उप निरीक्षक होते ते नेमके कोण होते हे स्पष्ट केले पाहिजे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, प्रभाकर डोईफोडे नावाचे ते पोलीस शिपाई होते. यानंतर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, पोलीस अधीक्षकांनी त्यांना मुख्य कार्यकारी अधिका-यांसाठी नेमले होते. कदाचित त्या पोलीस शिपायाकडून चूक झाली असेल. ती व्यक्ती पोलीस शिपाई आहे.त्या व्यक्तीच्या मनात समितीचा अवमान करण्याचा कोणत्याही प्रकारचा हेतू नव्हता. माझी विनंती आहे की, संबंधित पोलीस शिपायावर समितीने कारवाई प्रस्तावित करु नये. त्यांना कदाचित बैठकीचा शिष्टाचार माहीत नसेल. त्यांनी जाणूनबुजून चूक केली नाही.

यावर समितीने निदर्शनास आणून दिले की, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांना चुकीची माहिती दिली गेली आहे, ती व्यक्ती पोलीस निरीक्षक आहेत. समितीचा आरोप त्या पोलिसावर नाही. तेथे त्या पोलिसांना कशाला बोलावले हा विषय आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांना बोलावले आहे असे सांगितले. बैठक सुरू होण्यापूर्वी समितीमार्फत साक्षीदारांनी पाळावयाचे नियम वाचून दाखविण्यात येतात. ज्याचा समितीच्या कामकाजाशी संबंध नाही त्याला बैठकीत कोणी बोलावले, तो स्वतःहून आला नाही. मुख्य कार्यकारी अधिका-यांनी त्यांना तेथे बोलावले होते. समितीने महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात दौरे केले परंतु पोलीस अधिकारी कधी बैठकीत दिसले नाहीत कारण त्यांचा बैठकीत काही विषय नसतो. समितीच्या बैठकीत पोलीस येण्याचा काही संबंध नव्हता. पोलिसांना बोलावल्याशिवाय कोणत्याही सभागृहामध्ये पोलीस येऊ शकत नाहीत. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पोलिसांना अगोदर सूचना द्यायला पाहिजे होत्या की, सभागृहातील बैठक गोपनीय आहे, त्यांनी बाहेर थांबले पाहिजे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, समितीचे म्हणणे माझ्या उशीरा लक्षात आले, त्यांना बाहेर थांबण्यासाठी बोलावले होते. त्यांना माहिती नव्हते की, समितीमध्ये कोण आहे. यावर समितीने आक्षेप घेत विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पोलिसांना जाणूनबुजून बोलावले होते. तेथे कोणतेही दहशतीचे वातावरण निर्माण झालेले नव्हते. याबाबत सचिवांनी दिलगिरी व्यक्त केली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलगिरी व्यक्त करून याबाबत चूक झाली आहे असे वाटत नाही असे विदित केले.

यावर समितीने मत व्यक्त केले की, समितीने जालना जिल्हा दौ-यामध्ये जिल्हा परिषदेसंबंधी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना तेथेच ब-याच गोष्टी समजावून सांगितल्या होत्या. आयएएस अधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्रशिक्षण झालेले असते, तेथे कोणत्या गोष्टी का केल्या जातात हे त्यामुळे समजते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दौ-याच्या दरम्यान वेगळे वातावरण तयार करून लोकांमध्ये संभ्रमाची स्थिती निर्माण केली. आज विभागीय सचिवांच्या साक्षीच्या बैठकीदरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी जे बोलत आहेत ते त्यांनी समितीच्या जिल्हा भेटी दरम्यान झालेल्या बैठकीत बोलणे अपेक्षित होते. सचिवांनी दिलगिरी व्यक्त केली आहे परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अजून दिलगीरी व्यक्त करावी असे वाटत नाही. भविष्यात मुख्य कार्यकारी अधिकारी देखील मंत्रालयात सचिव पदावर येणार आहेत. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून समितीस असे अपेक्षित नाही. सचिवांनी दिलगिरी व्यक्त केली हा त्यांचा मोठेपणा आहे.

## अभिप्राय व शिफारशी

जालना जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या साक्षी दरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, सन २०१३-२०१४ या पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आले नाही. असे आक्षेप सदर परिच्छेदामध्ये घेतल्याचे समितीस आढळून आले. त्या अनुषंगाने संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार रुपये २५,००० पर्यंत दंडाची शास्ती करण्यात आली आहे. त्यानुसार एकूण शास्तीची रक्कम रुपये २५,००० जमा करण्यात आलेली आहे. तथापि, अद्याप ज्या प्रकरणांमध्ये अभिलेखे उपलब्ध करून न देणे याबाबत दंडात्मक कारवाई केलेली नाही त्या प्रकरणामध्ये दंड आकारणी करण्यात यावी. समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी केलेल्या अनुपालनामध्ये सदर अभिलेखे उपलब्ध असल्याचे स्पष्टीकरण केले आहे. सदर अभिलेखे लेखापरिक्षणाच्या वेळी उपलब्ध करून देणे आवश्यक होते.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार दंड करण्याबाबत विभागीय आयुक्तांना अधिकार असून त्यांचेकडून वेळेवर कारवाई होणे आवश्यक आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समिती दौ-यावर येईपर्यंत कारवाई केली नाही. त्यांनी कारवाई करण्यात दिरंगाई केल्याचे दिसून येत आहे. किंबहुना त्यांनी संबंधितांना जाणीवपूर्वक पाठीशी घालण्याचे काम केले आहे, त्यामुळे **प्रस्तुत प्रकरणी आयुक्त कार्यालयाच्या माध्यमातून संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून संबंधितावर जबाबदारी निश्चित करून समितीला कारवाईसह दोन महिन्यांच्या आत अहवाल सादर करावा, अशी समितीची शिफारस आहे.**

**तसेच समितीची जालना जिल्हा परिषदेच्या सभागृहामध्ये बैठक सुरू असताना गणवेशधारी पोलीस अधिका-याने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अभिवादन/सलाम (सॅल्युट) केल्यामुळे समितीचा हा एक प्रकारे अवमान झाला. यावर समितीने तीव्र आक्षेप घेत अत्यंत नाराजी व खेद व्यक्त केला. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार सभागृहाच्या बाहेर गर्दी होऊ नये म्हणून गणवेशधारी पोलीस अधिकारी सभागृहाबाहेर त्यांचे कर्तव्य बजावत होते. त्यांना कदाचित समितीचे संकेत माहिती नसावेत असा खुलासा केला. तथापि, सदर खुलासा समर्थनीय वाटत नाही. कारण समितीचे असे स्पष्ट मत आहे की, संबंधित गणवेशधारी पोलीस अधिका-यास समितीला भेटण्यासाठी आलेल्या सर्व सामान्य जनतेला हाकलून देण्याचा अधिकार नाही ही बाब अत्यंत गंभीर व चिंताजनक आहे. त्यामुळे समिती या प्रकरणी तीव्र नापसंती व खेद व्यक्त करीत आहे. यासंदर्भात गणवेशधारी पोलीस अधिका-याने केलेल्या खुलाशामध्ये अनावधानाने (चुकीने) सलाम (सॅल्युट) केला असल्याचे नमूद केलेले असले तरी समितीने याप्रकरणी गंभीर दखल घेतलेली असल्यामुळे भविष्यात असे प्रकार पुन्हा होऊ नयेत असे समितीला वाटते. यासाठी ग्रामविकास विभागाने पंचायती राज समितीच्या शिष्टाचार विषयक बाबी यासंदर्भात तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांना माहिती नसणे याबाबत समिती तीव्र स्वरूपात नाराजी व्यक्त करते. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांना या प्रकरणी जाणीव करून द्यावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्यात अवगत करावी.**

प्रकरण नऊ

## जिल्हा परिषद, जालना

### सन २०१३-२०१४ या वर्षात पंचायत समित्यांमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (शिक्षक समायोजनाबाबत)

**परिच्छेद क्रमांक ४.७९८/३३ (सन २०१३-२०१४)**

पंचायत समिती, बदनापूर सन २०१३-१४ या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षणात गटविकास कार्यालय अंतर्गत कार्यरत सहशिक्षक यांचे मंजूर पदांपेक्षा जादा पदे भरल्याचे आढळून आले आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १) | केंद्र प्रमुख | ११ | ९ | २ | |
| २) | मुख्याध्यापक | ३९ | ३७ | २ | समायोजन जिल्हा परिषद स्तर |
| ३) | प्रा.पदवीधर | १३२ | २१ | १११ | |
| ४) | सहशिक्षक | ४९३ | ५४१ | ४८ | |
| ५) | सेवक | ७ | ७ | ० | |
| ६) | अंश. निदेशक | ६ | ० | ६ | |

तपशिलात नमूद अ.क्र.४ सहशिक्षक मंजूर पदे ४९३ असताना ५४१ पदे भरलेली व कार्यरत आहेत. परिणामी मंजूर पदांपेक्षा ४८ पदे जादा भरलेली आहेत. याबाबत समायोजन प्रक्रिया ही जिल्हा परिषद, जालना स्तरावर सुरू आहे असे या संचिकेत नमूद केलेले आहे. तरी लवकरात लवकर अतिरिक्त रिक्त पदांवर समायोजन करून जिल्हा स्तरावर एकत्रित मंजूर पदांपेक्षा भरलेली पदे जादा नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, जालना यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०१२-१३ च्या संच मान्यतेनुसार सहशिक्षकांची व प्रा.पदवीधर शिक्षकांची अनुक्रमे ५४९ व ३३ पदे मंजूर होती. तथापि, संच मान्यता सन २०१३-१४ मध्ये RTE Act-२००९ नुसार संच मान्यतेमध्ये बदल झाल्याने सहशिक्षकांची पदे कमी होऊन ती ५४९ ऐवजी ४४२ झाली व प्रा.पदवीधर शिक्षकांच्या पदांमध्ये वाढ होऊन ती ३३ ऐवजी १३२ झाली आहेत. दोन्ही वर्षाच्या संचमान्यतेची छायांकित प्रत अवलोकनासाठी सोबत जोडली आहे. सन २०१३-१४ मध्ये प्रा.पदवीधर शिक्षकांची १११ पदे रिक्त असल्याने जिल्हा स्तरावरुन सह शिक्षक संवर्गातील शिक्षकांना प्रा.पदवीधर शिक्षक संवर्गात पदोन्नती देण्यात आली. तद्नंतर ऑगस्ट-२०१४ मध्ये अतिरिक्त असलेल्या उर्वरित ३७ शिक्षकांचे समायोजन करण्यात आले. समायोजना नंतरची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | मंजूर पदे संच मान्यता २०१२-१३ | मंजूर पदे संच मान्यता २०१३-१४ | भरलेली पदे २०१३-१४ | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|
| १) | केंद्र प्रमुख | ११ | ११ | ९ | २ |
| २) | मुख्याध्यापक | ३३ | ३९ | ३६ | ३ |
| ३) | प्रा.पदवीधर | ३३ | १३२ | १२३ | ९ |
| ४) | सहशिक्षक | ५४९ | ४४२ | ४३४ | ८ |
| ५) | सेवक | ७ | ७ | ० | ० |
| ६) | अंश. निदेशक | ६ | ६ | ० | ६ |

अहवाल वर्षामध्ये जालना जिल्ह्यासाठी ६१६९ पायाभूत पदे मंजूर होती. त्यानुसार ६१६९ शिक्षकांची पदे भरलेली होती. त्यामुळे मंजूर पदांपेक्षा भरलेली पदे जादा नव्हती. वरील कोष्टकावरुन अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन पूर्ण होऊन एक ही शिक्षक अतिरिक्त नाही. सोबत संच मान्यता सन २०१२-१३ व सन २०१३-१४ ची प्रत, समायोजनाचे आदेश दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ व शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, जालना यांचे पत्र दिनांक ११ सप्टेंबर, २०१८ अवलोकनास्तव सादर करण्यात येत आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

जालना जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २७ सप्टेंबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, शिक्षक अतिरिक्त कोणत्या महिन्यात ठरले आणि त्यांचे समायोजन कोणत्या महिन्यात झाले, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, माहे मे, २०१४ मध्ये शिक्षक अतिरिक्त ठरले आणि माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये ३६ शिक्षकांचे समायोजन करण्यात आले. यावर समितीने विचारणा केली की, अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांच्या समायोजनाला मंजुरी कोणी दिली होती, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मंजुरी दिली होती असे उत्तर समितीस मिळाले असता समितीने विचारणा केली की, माहे मे, २०१४ मध्ये शिक्षक अतिरिक्त ठरल्यानंतर त्यांचे समायोजन तीन महिन्यानंतर म्हणजेच माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये करण्यात आले. सदरहू अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचा माहे मे, जून व जुलै या तीन महिन्यांचा पगार कोठून दिला. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन मुख्य कार्यकारी अधिका-यांनी केले आहे.

यावर समितीला मिळालेल्या उत्तराच्या अनुषंगाने समितीने मत व्यक्त करून विचारणा केली की, मे महिन्यात अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन माहे ऑगस्ट महिन्यात केले. या शिक्षकांनी माहे मे, जून व जुलै या तीन महिन्यात काम केलेले नाही. उक्त तीन महिन्यात काम न केलेल्या शिक्षकांचा पगार आपण कोणत्या नियमान्वये अदा केला ? जर या शिक्षकांचे वेळीच म्हणजे माहे मे महिन्यातच समायोजन केले असते तर त्यांना घरी बसल्या पगार द्यावा लागला नसता आणि सर्वात महत्वाची बाब म्हणजे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले नसते. यास प्रशासकीय प्रमुख म्हणून तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी जबाबदार आहेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सुद्धा जबाबदारी होती.

यावर समितीने विचारणा केली की, या संदर्भातील कार्यवाही करण्यात तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी चुकल्या आहेत काय, असल्यास, या बाबतीत शासनास का कळविले नाही की, अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे लवकर समायोजन न झाल्यामुळे त्यांना तीन महिन्यांचा पगार कामाविना देण्यात आलेला आहे. एका शाळेमध्ये दोन शिक्षकांची गरज असताना तेथे तीन शिक्षक कार्यरत राहिले. तेथील एका शिक्षकाला फुकट पगार देण्याऐवजी जिल्ह्यामधील इतर ठिकाणच्या रिक्त पदी त्याचे समायोजन करणे आवश्यक होते, परंतु तसे करण्यात आले नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, आरटीईच्या अनुषंगाने शिक्षक पदांचा रेश्यो ठरलेला असतो आणि त्या रेश्योच्या बेसवरच शिक्षक अतिरिक्त ठरलेले आहेत. यासाठी जिल्हा परिषद विभागीय आयुक्तांची परवानगी घेऊन कार्यवाही करीत असते.

यावर समितीने नाराजी व्यक्त करत निदेश दिले की, विभागीय आयुक्तांची परवानगी प्रतिनियुक्तीसाठी लागते; समायोजनासाठी त्यांची परवानगी लागत नाही. तीन महिने अतिरिक्त असलेल्या शिक्षकांना जर रिक्त जागी समायोजित केले असते तर विद्यार्थ्यांचे देखील शैक्षणिक नुकसान झाले नसते. एखाद्या शाळेमध्ये २ पदे मंजूर असताना तेथे ३ शिक्षक असतील तर एका शिक्षकाला गरज नसताना पगार दिला गेला. याउलट ज्या ठिकाणी शिक्षकांची पदे रिक्त होती तेथे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्यामुळे त्या ठिकाणच्या पालक व विद्यार्थ्यांच्या सतत तक्रारी येत होत्या. जिल्हा परिषदेचे प्रशासकीय प्रमुख या नात्याने हे सर्व पाहण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची आहे. तसेच अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांना तीन महिन्यांचा फुकट पगार दिला गेला याच्याशी मुख्य कार्यकारी अधिकारी सहमत नाहीत काय, यावर शिक्षक अतिरिक्त ठरले तरी त्यांना पगार द्यावा लागतो असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला उत्तर दिले असता समितीने असा प्रश्न विचारला की, अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे किती दिवसांमध्ये समायोजन केले पाहिजे. या प्रकरणी शिक्षकांचे समायोजन करण्यामध्ये उशीर झाला असल्याचे मान्य करून संबंधितांवर कारवाई करण्यात येईल असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून समितीला आश्वासन देण्यात आले.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, लेखी उत्तरामध्ये तसे नमूद केलेले नाही. ३७ शिक्षक ३ महिने अतिरिक्त होते. एका शिक्षकाचे सरासरी मासिक ५० हजार रुपये वेतन धरले तर ३ महिन्यांची किती रक्कम होते ? यामध्ये एका बाजुला मुलांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे तर दुस-या बाजुला शासनाचे अतिरिक्त पैसे गेले आहेत. तरीही मुख्य कार्यकारी अधिकारी संबंधितांना वाचविण्याचा प्रयत्न करीत आहेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सदर बाब माझ्या लक्षात आली नव्हती. याबाबत कारवाई करण्यात येईल.

यावर समितीने मत व्यक्त केल की, सदर प्रकरणी समितीने विस्ताराने चर्चा केली आहे. ज्या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना संबंधितांवर कारवाई करणे अपेक्षित होते तो विषयच मुख्य कार्यकारी अधिकारी यांना लक्षात आला नसल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीसमोर सांगितले आहे. विषय समजला असला तरीही यामध्ये कानाडोळा करण्याचे काम केलेले आहे. या सर्व प्रकारामुळे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहिलेले आहेत. अतिरिक्त शिक्षकांना शासनाकडून पगार देण्यात आला परंतु त्या बदल्यात आवश्यक ठिकाणच्या विद्यार्थ्यांना मात्र शिक्षण मिळाले नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून ही जबाबदारी असताना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ती योग्य प्रकारे पार पाडली नाही. पंचायती राज समिती जालना जिल्हा दौ-यावर आली असताना केलेल्या कारवाईची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देता आली नाही कारण मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कोणावरही कारवाईच केलेली नाही. या सर्व प्रकारावरुन असे दिसून येते की, समितीच्या दौ-याबाबत

वेळेवर सूचना देऊन देखील मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुरेशी तयारी केलेली नाही. यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागले आहे. याचा अर्थ मुख्य कार्यकारी अधिकारी या संबंधितांना पाठीशी घालत आहेत, असा होतो. शिक्षकांचे तीन महिने उशिरा समायोजन केल्यामुळे सुमारे १ कोटी ८५ लाख रुपयांचा बोजा सरकारी तिजोरीवर पडला. अतिरिक्त शिक्षकांना वेतनापोटी देण्यात आलेल्या रकमेची मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांचेकडून वसुली करण्यात यावी.

तद्नंतर समितीने निर्देश दिले की, उप सचिव, ग्रामविकास विभाग व उप आयुक्त, विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना समिती सांगू इच्छिते की, जिल्हा परिषदेमध्ये वरीष्ठ अधिकारी फार मोठ्या प्रमाणात दिरंगाई करतात. समितीचा देखील विनाकारण वेळ वाया घातला जात आहे. या प्रकरणी तात्काळ सखोल चौकशी करून दिरंगाईची कारणे शोधावित तसेच तत्कालिन शिक्षणाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधितांवर का कारवाई केली नाही. याबाबत सर्व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कारवाईसह समितीस अहवाल सादर करावा. तसेच या प्रकरणी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात येत आहे. यावर उपायुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी समितीने निर्देशित केलेल्या बाबींवर कार्यवाही करण्याबाबत समितीला आश्वासित केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

बदनापुर पंचायत समिती अंतर्गत माहे मे, २०१४ मध्ये शिक्षक अतिरिक्त ठरले आणि माहे ऑगस्ट,२०१४ मध्ये ३६ शिक्षकांचे समायोजन करण्यात आले, या प्रकरणी केलेल्या सखोल चौकशीनुसार संबधिताची जबाबदारी निश्चित करून त्यांचेवर केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात पंचायत समिती, बदनापूर स्तरावर ३६ शिक्षक अतिरिक्त झालेले असतांना त्यांचे समायोजन माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये विलंबाने केल्या संदर्भात खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

बालकांचा मोफत व सक्तीचा अधिनियम, २००९(RTE) मधील निकषानुसार सन २०१३-१४ ची संच मान्यता दिनांक ३० सप्टेंबर, २०१३ ची पट संख्या विचारात घेऊन शिक्षण संचालक (प्रा.) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक २१ एप्रिल, २०१४ चे पत्रान्वये प्रथमच ऑनलाईन संगणक प्रणालीव्दारे संच मान्यता उपलब्ध करून दिलेली आहे.

त्यामध्ये इयत्ता ६ वी ते ८ वी करिता नव्याने पदवीधर शिक्षक संवर्गाची पदे मंजूर करण्यात आलेली असून मुख्याध्यापक पदा मध्ये वाढ झालेली आहे. शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांनी दिनांक १३ मे, २०१४ चे पत्रान्वये जिल्ह्यास पायाभूत पदाच्या अधिन राहून संच मान्यतेस मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये प्राथमिक शिक्षकांची पदे कमी होऊन मुख्याध्यापक व प्राथमिक पदवीधरांच्या पदामध्ये वाढ झालेली आहे. त्यामुळे मुख्याध्यापक व प्राथमिक पदवीधरांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याचे संच मान्यतेनुसार दिसून आले. अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यासंदर्भात संचिका विभागाने दिनांक १६ मे, २०१४ रोजी सादर केली होती. तथापि, तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाचे शासन निर्णय दिनांक १८ मे, २०११ नुसार प्रथम पदोन्नती नंतर समायोजन प्रक्रिया राबविण्यासंदर्भात सूचना देण्यात आलेल्या होत्या.

त्यानुसार दिनांक १६ मे, २०१४ ते दिनांक २५ जुलै, २०१४ या कालावधीत शासन निर्णयातील प्राधान्य क्रमांनुसार मुख्याध्यापकाची पदे पदोन्नतीने भरण्यात आली. तसेच प्राथमिक पदवीधरांची पदे पद परावर्तनाने भरण्यात आली. सदरची पदोन्नतीची प्रक्रिया संपल्यानंतर या कार्यालयाचे पत्र दिनांक ११ ऑगस्ट २०१४ अन्वये गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बदनापूर यांचे सह सर्व गटविकास अधिकारी पंचायत समिती अंतर्गत जिल्हा परिषद, जालना यांना तालुक्यातील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यासंदर्भात प्राधिकृत करण्यात आले होते. त्यानुसार गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बदनापूर यांनी दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ च्या आदेशान्वये एकूण ३६ अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन केलेले आहे. समायोजनानंतरचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | सन २०१३-१४ नुसार संच मान्यतेची मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे | अतिरिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|
| १) | केंद्र प्रमुख | ११ | ०९ | ०२ | ०० |
| २) | मुख्याध्यापक | ३९ | ३६ | ०३ | ०० |
| ३) | प्रा.पदवीधर | १३२ | १२३ | ०९ | ०० |
| ४) | सहशिक्षक | ४४२ | ४३४ | ०८ | ०० |
| ५) | सेवक | ०७ | ०७ | ०० | ०० |
| ६) | अंश. निदेशक | ०६ | ०० | ०६ | ०० |

वरील प्रमाणे संच मान्यतेनुसार पदे मंजूर असून कार्यरत पदे ही मंजूर पदापेक्षा जास्तीची नाहीत. केवळ बदनापूर तालुक्यातील काही शाळेत सह शिक्षकांची पदे अतिरिक्त झाल्याने त्याच तालुक्यातील इतर शाळेवर विद्यार्थी संख्येनुसार नव्याने निर्माण झालेल्या सह शिक्षक/ प्राथमिक पदवीधर/मुख्याध्यपक पदावरील ३६ अतिरिक्त शिक्षकाचे समायोजन बदनापूर तालुक्यांतर्गत नव्याने पद निर्माण झालेल्या शाळेवर समायोजन करण्यात आलेले आहे. या प्रकरणात शिक्षणाधिकारी (प्रा.) यांचे मार्फत चौकशी करण्यात आली. शिक्षणाधिकारी (प्रा.) यांनी दिनांक ३० जुलै, २०१९ रोजी चौकशी करून अहवाल सादर केलेला आहे. चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार शासन निर्णय, दिनांक १८ मे, २०११ नुसार प्रथम पदोन्नती व तद्नंतर समायोजन करण्याबाबतच्या सूचना असल्याने सन २०१३-१४ चे संच मान्यतेनंतर विभागाने प्रथमतः मुख्याध्यापकाची पदे पदोन्नतीने भरलेली असून प्राथमिक पदवीधरची पदे प्राथमिक शिक्षकांमधून पद परावर्तनाने दिनांक १६ मे, २०१४ ते दिनांक २५ जुलै, २०१४ या कालावधीत भरलेली आहे. पदोन्नतीची प्रक्रिया संपल्यानतर गटविकास अधिकारी सर्व यांना दिनांक ११ ऑगस्ट, २०१४ चे पत्रान्वये अतिरिक्त शिक्षकाचे समायोजन करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेले होते. त्यानुसार गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बदनापूर यांनी दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ रोजी तालुका स्तरावरील ३६ अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करून अहवाल सादर केलेला आहे. त्यामुळे अतिरिक्त शिक्षक समायोजनाच्या प्रक्रियेमध्ये विलंब झालेला नाही असे चौकशी अहवालावरुन सिद्ध होते.

तसेच प्रस्तुत प्रकरणात विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे स्तरावरुन देखील चौकशी सुरू असून चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार प्रकरणात पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (आस्था-१४) जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

सन २०१३-२०१४ या वर्षात पंचायत समित्यांमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (शिक्षक समायोजनाबाबत) संदर्भात पंचायत समिती, बदनापूर येथे लेखा परिक्षणात गटविकास कार्यालय अंतर्गत कार्यरत सहशिक्षक यांचे मंजूर पदांपेक्षा जादा पदे भरल्याचे आढळून आले. सहशिक्षकांची ४९३ पदे मंजूर असताना ५४१ पदे भरलेली व कार्यरत आहेत. परिणामी मंजूर पदांपेक्षा ४८ पदे जादा भरलेली आहेत. उपरोक्त लेखा आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषद, जालना यांचेकडून कळविण्यात आलेल्या खुलाशानुसार सन २०१२-२०१३ या वर्षाच्या संच मान्यतेनुसार सहशिक्षकांची व प्रा. पदवीधर शिक्षकांची अनुक्रमे ५४९ व ३३ पदे मंजूर होती. तथापि, संच मान्यता सन २०१३-२०१४ मध्ये RTE-Act-२००९ नुसार संच मान्यतेमध्ये बदल झाल्याने सहशिक्षकांची पदे कमी होऊन ती ५४९ ऐवजी ४४२ झाली व प्रा. पदवीधर शिक्षकांच्या पदांमध्ये वाढ होऊन ती ३३ ऐवजी १३२ झाली. सन २०१३-२०१४ मध्ये प्रा.पदवीधर शिक्षकांची १११ पदे रिक्त असल्याने जिल्हा स्तरावरुन सहशिक्षक संवर्गातील शिक्षकांना प्रा.पदवीधर शिक्षक संवर्गात पदोन्नती देण्यात आली. तद्नंतर माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये अतिरिक्त असलेल्या उर्वरित ३७ शिक्षकांचे समायोजन करण्यात आले.

उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे समितीने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांच्या समायोजनाला मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मंजुरी दिली होती. माहे मे, २०१४ मध्ये अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन तीन महिन्यानंतर म्हणजेच माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये करण्यात आले, त्यामुळे माहे मे, जून, जुलै, २०१४ या तीन महिन्यांचे वेतन जिल्हा परिषदेच्या निधीतून देण्यात आले. वास्तविक पहाता सदर अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन माहे मे, २०१४ या महिन्यामध्ये केले असते तर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले नसते. त्यामुळे यासाठी प्रशासकीय प्रमुख म्हणून तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी हे जबाबदार आहेत असे समितीचे स्पष्ट मत आहे. कारण शिक्षक अतिरिक्त असल्याबाबत तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शासनास कळविणे आवश्यक होते. अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे लवकर समायोजन न झाल्यामुळे सदरहू अतिरिक्त शिक्षकांना तीन महिन्यांचे वेतन कामाविना देण्यात आलेले आहे. एका शाळेमध्ये दोन शिक्षकांची आवश्यकता असताना त्याठिकाणी तीन शिक्षक कार्यरत राहिले, त्यामुळे एक प्रकारे शासनाची फसवणूक झाल्याचे दिसून येत आहे. तीन महिने उशीराने शिक्षकांचे समायोजन केल्यामुळे सुमारे १ कोटी ८५ लक्ष रुपयांचा बोजा सरकारी तिजोरीवर पडला आहे. त्यामुळे समिती याप्रकरणी तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

**यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार शासन निर्णय दिनांक १८ मे, २०११ नुसार प्रथम पदोन्नती व तद्नंतर समायोजन करण्याबाबतच्या सूचना असल्याने सन २०१३-२०१४ चे संच मान्यतेनंतर विभागाने प्रथमतः मुख्याध्यापकाची पदे पदोन्नतीने भरलेली असून प्राथमिक पदवीधरची पदे प्राथमिक शिक्षकामधून पद परावर्तनाने दिनांक १६ मे, २०१४ ते दिनांक २५ जुलै, २०१४ या कालावधीत भरलेली आहे. पदोन्नतीची प्रक्रिया संपल्यानंतर सर्व गटविकास अधिकारी यांना दिनांक ११ ऑगस्ट, २०१४ रोजीच्या पत्रान्वये अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेले होते. त्यानुसार गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बदनापूर यांनी दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ रोजी तालुका स्तरावरील ३६ अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करून अहवाल सादर केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे स्तरावरुन करण्यात आलेल्या चौकशी अहवालामध्ये काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई करण्यात आली आहे. त्याबाबतचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण दहा

## जिल्हा परिषद, जालना

## सर्वसाधारण शिफारशी

### १) गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्याबाबत :-

समितीने राज्यातील जिल्हा परिषदांना भेटी दिल्या असता विशेषतः जालना जिल्हा परिषदेत गैरव्यवहार व अपहाराच्या मोठ मोठ्या रकमा वसुलीविना प्रलंबित आहेत. अशी अनेक प्रकरणे समितीसमोर तपासणीसाठी आली असता समितीने या प्रकरणात सदरच्या रकमा शासन खाती जमा करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निदेशित केले आहे. सदर गैरव्यवहाराची/अपहाराची अनेक प्रकरणे असून ती जुनी आहेत. जिल्हा परिषदांनी वेळीच कार्यवाही केली असती तर शासनाचा कोट्यवधी रुपयांचा निधी या प्रकरणांमध्ये अडकून पडला नसता व तो वेळीच वसूल झाला असता. जिल्हा परिषदांनी सदरच्या रकमा संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करून वसुल केल्या असत्या तर या रकमा केंव्हाच शासन खाती जमा झाल्या असत्या. शासनाचा विविध योजनांवरील निधी हा गैरव्यवहाराने जेव्हा हडपला जातो तेव्हा त्या त्या योजना राबविताना त्यात निश्चितच मोठ्या प्रमाणावर अनियमितता होऊन योजनेच्या फलनिष्पत्तीवर त्याचा विपरीत परिणाम होतो असे समितीला आढळून आले आहे. जिल्हा परिषदांकडून त्यांच्या कर्मचा-यांवर कारवाई करण्यात विलंब होत असल्यामुळे जिल्हा परिषदा अशा कर्मचा-यांना पाठीशी घालत असून त्यांचेवरील संभाव्य कार्यवाहीस पुढे ढकलण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्याद्वारे एकप्रकारे शासनाचा निधी वेळीच वसूल होत नसल्यामुळे याबाबत मोठ्या प्रमाणात प्रशासकीय अनियमितता होत असल्याचे समितीला आढळून आले आहे. **याप्रकरणी समिती अशी शिफारस करीत आहे की, जिल्हा परिषदेची योजना राबविताना संबंधित योजनेत एखादा गैरव्यवहार अथवा अपहार उघडकीस आला असल्यास त्या गैरव्यवहारासंदर्भात कोणत्याही परिस्थितीत तीन महिन्यात दोषारोपपत्र दाखल करून असे प्रकरण सहा महिन्यात निकाली काढण्यासंदर्भात शासनाने निश्चित अशी भूमिका घ्यावी त्याचप्रमाणे अशी कार्यवाही मुदतीत पूर्ण करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या संबंधित विभाग प्रमुखांवर सोपविण्यात यावी व असे विभाग प्रमुख गैरव्यवहाराच्या अथवा अपहाराच्या रकमा सहा महिन्यात शासन खाती जमा करण्यात अयशस्वी झाल्यास त्यांचेविरुद्ध जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर त्या प्रकरणी शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत विभागाने ठोस भूमिका घ्यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

शासनाकडून एखादी योजना राबविताना कोट्यवधी रुपयांचा निधी तरतूदी करून मिळविला जातो व असा निधी वेळेत खर्च केला जात नाही व तो शासन खाती जमादेखील केला जात नाही. त्यामुळे वित्तीय बाबीत मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असून संबंधित अधिका-यांकडून रकमा वेळीच खर्च करण्याबाबत कमालीचा हलगर्जीपणा करण्यात येतो. कोट्यवधी रुपये अखर्चित ठेवल्यामुळे शासनाला असा निधी आवश्यक असणा-या अत्यंत महत्वाच्या योजनांवर खर्च करता येत नाही. पर्यायाने विविध भौगोलिक भागातील निधी वाटपातील असंतोष वाढतो. खर्चाच्या बाबतीतील अनियमितता व योजना राबविण्याच्या कामातील अधिका-यांद्वारा होत असलेला हलगर्जीपणा हा प्रशासकीयदृष्ट्या अत्यंत गंभीर असून त्यामुळे अखर्चित निधी राहून तो दुस-या महत्वाच्या योजनांवर खर्च केला जात नाही. **म्हणून एखाद्या योजनेसाठी मागितलेला निधी त्या योजनेची उपयुक्तता तसेच जनसामान्यांच्या हिताचा विचार करून राबविणे आवश्यक आहे. जनतेला देय असलेल्या सुविधा योजना राबवून वेळीच मिळत नसल्याने जनतेत नैराश्य व संतापाच्या भावना वाढीस लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता अखर्चित रकमांवर बंधन टाकण्यासंदर्भात शासनाने यासंदर्भात कडक धोरण आखून त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात जिल्हा परिषदांना एका परिपत्रकाद्वारे कळविण्यात यावे अशीही समितीची शिफारस आहे.**

**गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्यासंदर्भात समितीने उपरोक्तप्रमाणे केलेल्या शिफारशीनुसार यासंदर्भात शीघ्रतेने कार्यवाही करून जालना जिल्हा परिषदेमधील रक्कमा शासन खाती जमा करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व पंचायती राज समितीने तपासणी केलेल्या अहवालासंदर्भात एकूण किती रकमेची शासन खाती वसुली केली याबाबीची माहिती समितीला कळविण्यात यावी, अशीही समितीची शिफारस आहे.**

### २) लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे :-

समितीने जालना जिल्हा परिषदेला भेट दिली असता अनेक लेखा परिच्छेदांमध्ये लेखा परिक्षकांना संबंधित लेख्यांवरील कागदपत्रे उपलब्ध करून दिली नसल्याने त्याबाबतचा अंतिम अभिप्राय लेखा परिक्षकांस व्यक्त करता आला नाही. याबाबत समितीने असे लेखे विचारात घेतले असता अनेक प्रकरणात लेखा परीक्षणाच्या वेळी कागदपत्रे उपलब्ध नव्हती आता उपलब्ध आहेत असे समितीला सांगण्यात आले. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध नव्हती त्याची कारणे काय या शोधात समितीला अनेक गंभीर बाबी निदर्शनास आल्या. **मुळात कागदपत्रे उपलब्ध असतानाही ते लेखा परिक्षणास न दाखविणे ही गंभीर बाब आहे. तो सरळ शिस्तभंगाचा प्रकार आहे. लेखा परीक्षक सुरूवातीला कागदपत्रे**

**उपलब्ध करून देण्यासाठी चार महिन्यांचा वेळ देतात व त्यानंतर पुन्हा दोन महिन्यांचा कालावधी संबंधितांना दिला जातो. असे असूनदेखील संबंधित अधिकारी लेखा परीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून देत नाहीत. मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ मध्ये सन २०११ पूर्वी लेखा परीक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करून देणा-या अधिका-यास केवळ १०० रुपयांचा दंड आकारण्यात येत असे. कदाचित त्यामुळे लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध होत नसतील अशी समितीने भावना व्यक्त केल्यानंतर शासनाने सन २०११ मध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ७ मध्ये सुमारे २५,००० रुपये (पंचवीस हजार रुपये) दंडाच्या रकमेची तरतूद केली आहे. समितीने या प्रकरणी जिल्हा परिषदांना ज्या कोणी लेखा परीक्षणाचे वेळी लेखा परिक्षकांस कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाहीत अशा जबाबदार असणा-या सर्व संबंधितांना अधिनियमातील तदतुदीनुसार रुपये २५,००० इतका दंड आकारण्याची शास्ती करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार जालना जिल्हा परिषदेमध्ये अशा किती व्यक्तींना प्रत्येक प्रकरणी दंड करण्यात आला व एकूण किती रक्कम शासन खाती जमा करण्यात आली याची संपूर्ण माहिती प्रकरणनिहाय समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**३) नियमानुसार व नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरुन दोषीतांवर कारवाई करण्याबाबत :-**

संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीततेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, प्रभावी व अर्थपूर्ण असे नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे म्हणून कार्यकारी प्रशासन राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी पंचायती राज समितीची रचना करण्यात आली. समितीला अधिकार मिळाल्यावरुन समितीने अनेक प्रकरणात दोषीतांवर कार्यवाही करण्याबाबत शासनाला निर्देश दिले आहेत. असे निर्देश देत असताना समितीने एखाद्या अधिकारी/कर्मचा-याची प्रथमदर्शनी चूक आढळून देखील संबंधित दोषींविरुद्ध जाणीवपूर्वक निलंबनाची कारवाई प्रस्तावित केली जात नाही. भारतीय संविधानाने प्रत्येकाला समान संधी देण्याचे धोरण अंगिकारल्याने कारवाई करतानादेखील दोषीताने तो निर्दोष असल्याचे अभिकथन करणे आवश्यक आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते. कोणत्याही निर्दोष व्यक्तीवर दोष लादले जाणे हे नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरुन नाही असे समितीला वाटते. म्हणून प्रशासनाने कार्यवाही करताना कोणत्याही निर्दोष व्यक्तीला शास्ती करू नये आणि दोषी व्यक्तीला कोणत्याही परिस्थितीत शास्तीविना सोडू नये असे समितीला वाटते. भेटीच्या वेळी संबंधित प्रकरणाची निंष्पक्षपणे चौकशी करून चौकशी अहवालामध्ये दोषीविरुद्ध कार्यवाही करून त्यास शिक्षा करणे योग्य आहे. **तथापि, एखाद्या निर्दोष व्यक्तीवर कार्यवाही केल्यास ती समितीच्या सूचनेनुसार कार्यवाही केली असे म्हणणे ही बाब समाजाची लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास उडवणारी आहे. जनमानसात समितीची भूमिका ही प्रशासनाने केलेल्या चांगल्या व वाईट बाबींना शोधून काढून त्यातून जनतेप्रती महत्वाची कामे कशी केली जातील याबाबतची प्रतिमा उभी करणे हे संसदीय लोकशाहीने दिलेले एक कर्तव्य आहे. समितीची नाहक बदनामी काही कर्तव्यपारायणवत व सचोटी नसलेले अधिकारी निर्माण करतात आणि जाणीवपूर्वक वैयक्तिक द्वेषापोटी, हेवेदाव्यापोटी निर्दोष व्यक्तींवर कार्यवाही करून समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सतर्क राहणे आवश्यक असून एखादा गुन्हेगार सुटत असताना त्यास नैसर्गिक न्याय मिळेल परंतु एखाद्या निर्दोष व्यक्तीला शिक्षा होता कामा नये ही समितीची भूमिका असल्यामुळे समितीने ज्या ज्या प्रकरणांमध्ये चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत. अशा सर्व प्रकरणांमध्ये दोषारोपांची चौकशी करताना सर्व संबंधित व्यक्तींना नैसर्गिक न्याय तत्वानुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार संपूर्ण वस्तुस्थिती विचारात घेतल्यानंतरच निःपक्षपातीपणे कार्यवाही करून दोषींना शास्ती तर निर्दोषींना मुक्ती या तत्वानुसार कारवाई करण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

# परिशिष्ट

## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**बुधवार, दिनांक २५ सप्टेंबर, २०१८**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, जालना**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स

(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(५) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(६) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(७) श्री. राहूल बोंद्रे, वि.स.स.

(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(९) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१०) श्री. राहूल मोटे, वि.स.स.

(११) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(२) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक पदाधिकारी :**

(१) श्री. अनिरूद्ध खोतकर, अध्यक्ष, जिल्हा परिषद जालना

(२) श्री. सतिश टोपे, उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, जालना

(३) श्री. रघुनाथ तौर, सभापती, शिक्षण व आरोग्य समिती, जिल्हा परिषद, जालना

(४) श्री. दत्ता बनसोडे, सभापती, समाजकल्याण समिती, जिल्हा परिषद, जालना

(५) श्रीमती जिजाबाई कळंबे, सभापती, कृषी व पशुसंवर्धन समिती, जिल्हा परिषद, जालना

(६) श्री. पांडूरंग डोंगरे, सभापती. पंचायत समिती, जालना

**स्थानिक निधी लेखा संचालनालय**

श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, मुंबई

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई**

(१) श्री. र. अ. नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

(२) श्री. आ. शं. शेंडगे, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विभागीय आयुक्त कार्यालय, जालना**

(१) श्री. पारस बोथरा, उपायुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

(२) श्री. अनंत कुमार, सहाय्यक आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**जिल्हा परिषद, जालना**

(१) श्रीमती निमा अरोरा, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. सुरेश बेदमुथा, प्रकल्प संचालक व प्रभारी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. शाम वाखर्डे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(४) श्री. संजय इंगळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

(५) श्री. अशोक खरात, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण)

(६) श्री. पी. पी. कोकणी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता)

(७) श्री. उत्तम चव्हाण, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(८) श्री. प्रविण निर्मल, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(९) डॉ. हणमंत गुट्टे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी व प्रभारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१०) डॉ. अमोल गिते, जिल्हा आरोग्य अधिकारी

(११) श्री. कैलास दातखीळ, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१२) श्री. एम. एस .चौधरी, शिक्षणाधिकारी माध्यमिक

(१३) श्री. डी. एच. डाकोरे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा

(१४) श्री. पी. एम. खोत, उप अभियंता (यांत्रिकी)

(१५) श्री. ए. एस. फरास, जिल्हा जलसंधारण अधिकारी, लघुपाटबंधारे विभाग

(१६) श्री. हरिश्चंद्र झनझन, कृषि विकास अधिकारी

(१७) श्री. कि. बा. मराठे, प्रभारी कार्यकारी अभियंता (बांधकाम)

(१८) श्रीमती मिना रावतळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जालना

(१९) श्री. के. डी. भुतेकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बदनापूर

(२०) श्री. डी. टी. भिसे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अंबड

(२१) डॉ. एस. एस. वेणीकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, घनसावंगी

(२२) श्री. अरुण चौलवार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन

(२३) श्री. राजपुत उदयसींग, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद

(२४) श्री. विलास गंगावणे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, परतूर

(२५) श्रीमती एस. एल. झरे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मंठा

(२६) डॉ असरार अहमद, पशुधन विकास अधिकारी (तांत्रिक), पशुसंवर्धन

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१३-२०१४ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील जालना जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक २६ सप्टेंबर, २०१८**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, जालना**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(५) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.

(६) श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(७) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(८) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(९) प्रा, विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१०) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(११) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(१२) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि. प. स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि प. स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(२) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई**

(१) श्री. र. अ. नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

(२) श्री. आ. शं. शेंडगे, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद**

(१) श्री. पारस बोथरा, उपायुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

(२) श्री. अनंत कुंभार, सहाय्यक आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**जिल्हा परिषद, जालना**

(१) श्रीमती निमा अरोरा, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. सुरेश बेदमुथा, प्रकल्प संचालक व प्रभारी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. शाम वाखर्डे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(४) श्री. संजय इंगळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

(५) श्री. अशोक खरात, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण)

(६) श्री. कोकणी पी. पी., उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता)

(७) श्री. उत्तम चव्हाण, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(८) श्री. प्रविण निर्मल, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(९) डॉ. हणमंत गुट्टे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी व प्रभारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१०) डॉ. अमोल गिते, जिल्हा आरोग्य अधिकारी

(११) श्री. कैलास दातखीळ, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१२) श्री. एम. एस .चौधरी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१३) श्री. डी. एच. डाकोरे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा

(१४) श्री. पी. एम. खोत, उप अभियंता (यांत्रिकी)

(१५) श्री. ए. एस. फरास, जिल्हा जलसंधारण अधिकारी, लघुपाटबंधारे विभाग

(१६) श्री. हरिश्चंद्र झनझन, कृषि विकास अधिकारी

(१७) श्री. कि. बा. मराठे, प्रभारी कार्यकारी अभियंता (बांधकाम)

(१८) श्रीमती मिना रावतळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जालना

(१९) श्री. के. डी. भुतेकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बदनापूर

(२०) श्री. डी. टी. भिसे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अंबड

(२१) डॉ. एस. एस. वेणीकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, घनसावंगी

(२२) श्री. अरुण चौलवार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन

(२३) श्री. राजपुत उदयसींग, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद

(२४) श्री. विलास गंगावणे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, परतूर

(२५) श्रीमती एस. एल. झरे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मंठा

(२६) डॉ. असरार अहमद, पशुधन विकास अधिकारी (तांत्रिक), पशुसंवर्धन

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी तसेच गटविकास अधिकारी यांची सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक २ संदर्भात जालना जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक २७ सप्टेंबर, २०१८**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, जालना**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(५) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(६) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(७) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(८) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(९) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि. प. स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि प. स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(२) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी.

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, मुंबई

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई**

श्री. र. अ. नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

श्री. आ. शं. शेंडगे, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद**

(१) श्री. पारस बोथरा, उपयुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

(२) श्री. अनंत कुमार, सहाय्यक आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**जिल्हा परिषद, जालना**

(१) श्रीमती निमा अरोरा, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. सुरेश बेदमुथा, प्रकल्प संचालक व प्रभारी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. शाम वाखर्डे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(४) श्री. संजय इंगळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

(५) श्री. अशोक खरात, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण)

(६) श्री. पी. पी. कोकणी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता)

(७) श्री. उत्तम चव्हाण, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(८) श्री. प्रविण निर्मल, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(९) डॉ. हणमंत गुट्टे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी व प्रभारी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१०) डॉ. अमोल गिते, जिल्हा आरोग्य अधिकारी

(११) श्री. कैलास दातखीळ, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१२) श्री. एम. एस .चौधरी, शिक्षणाधिकारी माध्यमिक

(१३) श्री. डी. एच. डाकोरे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा

(१४) श्री. पी. एम. खोत, उप अभियंता (यांत्रिकी)

(१५) श्री. ए. एस. फरास, जिल्हा जलसंधारण अधिकारी, लघुपाटबंधारे विभाग

(१६) श्री. हरिश्चंद्र झनझन, कृषि विकास अधिकारी

(१७) श्री. कि. बा. मराठे, प्रभारी कार्यकारी अभियंता (बांधकाम)

(१८) श्रीमती मिना रावतळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जालना

(१९) श्री. के. डी. भुतेकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बदनापूर

(२०) श्री. डी. टी. भिसे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अंबड

(२१) डॉ. एस. एस. वेणीकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, घनसावंगी

(२२) श्री. अरुण चौलवार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, भोकरदन

(२३) श्री. राजपुत उदयसींग, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जाफ्राबाद

(२४) श्री. विलास गंगावणे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, परतूर

(२५) श्रीमती एस. एल. झरे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मंठा

(२६) डॉ. असरार अहमद, पशुधन विकास अधिकारी (तांत्रिक), पशुसंवर्धन

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांनी सन २०१३ - १४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील जालना जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

(शा.म.मु.) एचबी २५५१—८अ (४५०—३-२०२१)

**मंगळवार, दिनांक ६ ऑगस्ट २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(३) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि. प. स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि प. स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, सह सचिव ( २) (का)

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(४) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. स. रा. भोसले, संचालक

**विभागीय सचिव**

(१) श्री. मनुकुमार श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव, महसूल विभाग

(२) श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग

(३) डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(४) श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

(५) श्री. अमिताभ गुप्ता, प्रधान सचिव, गृह विभाग

(६) श्री. एकनाथ डवले, सचिव, मृद व जलसंधारण विभाग

(७) श्री. राजेंद्र भागवत, सचिव, विधी व न्याय विभाग

(८) श्री. महेंद्र हजारी, सह सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

(९) श्री. दिनेश डिंगळे, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(१०) श्री. सं. द. सुर्यवंशी, सह सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग

(११) श्री. मनोहर ठोंबरे, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(१२) श्री. विजय चौधरी, उप सचिव (पस), कृषी व पणन विभाग

**विभागीय आयुक्त कार्यालय, जालना**

श्री. पारस बोथरा, उप आयुक्त (आस्थापना)

**जिल्हा परिषद, जालना**

(१) श्रीमती नीमा अरोरा, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्रीमती कल्पना क्षीरसागर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. उत्तम चव्हाण, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(४) श्री एन. आर. केंद्रे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(५) श्री. संजय इंगळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

(६) श्रीमती एम. के. धुपे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(७) श्री. आर. जी. दातखीळ, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(८) श्रीमती संगिता लोंढे, उप मुख्य कार्यकारी अधिकरी पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग)

( ९) श्री. डी. एच. डाकोरे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

**संक्षिप्त कार्यवृत्त**

सन २०१३-१४ च्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात जालना जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, महसूल विभाग, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग. प्रधान सचिव गृह विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, मृद व जलसंधारण विभाग, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, सह सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता, सह सचिव. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सह सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, उप सचिव, कृषी व पणन विभाग, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, अवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, कक्ष अधिकारी, महिला व बालविकास विभाग, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, उपनिबंधक, सहकारी संस्था, सहकार आयुक्त कार्यालय तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जालना यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक १४ ऑगस्ट २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(३) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(३) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. सु. रा. भोसले, संचालक

**विभागीय सचिव**

(१) श्री. श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

(२) श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग

(३) डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(४) श्री. अनुप कुमार, प्रधान सचिव, पशुसंर्वधन विभाग

(५) श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

(६) श्री. दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(७) श्री. अमिताभ गुप्ता, प्रधान सचिव, गृह विभाग

(८) श्री. राजेंद्र भागवत, सचिव, विधी व न्याय विभाग

(९) श्री. विनायक देशमुख, ए. आय. जी. एल ॲन्ड ओ.

(१०) श्री. दिनेश डिंगळे, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(११) श्री. दे. आ. गावडे, सह सचिव, ग्रामविकास विभाग

(१२) श्री. यु. ब. अजेटराव, उप सचिव, गृह विभाग

(१३) श्री. रमेश चव्हाण, उप सचिव, महसूल विभाग

(१४) डॉ. एस. एस. पंचपोर, अवर सचिव, पदुम विभाग

(१५) श्री. गणेश पवार, अवर सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

(१६) श्री. ए. जी. गोटेकर, अवर सचिव, वित्त विभाग

**विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद**

(१) श्री. व्ही. एम. रसाळ, सहाय्यक आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

(२) श्री. के. ए. चव्हाण, सहाय्यक संचालक (लेखा), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**जिल्हा परिषद, जालना**

(१) श्रीमती नीमा अरोरा, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्रीमती कल्पना क्षीरसागर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. उत्तम चव्हाण, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(४) श्री. एन. ओर. केंद्रे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(५) श्री. संजय इंगळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

(६) श्रीमती एम. के. धुपे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(७) श्री. आर. जी. दातखीळ, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(८) श्रीमती संगिता लोंढे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग)

(९) श्री. डी. एच डाकोरे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

(१०) श्री. व्ही. आर. हरकळ, गटविकास अधिकारी, बदनापूर

**संक्षिप्त कार्यवृत्त**

सन २०१३-१४ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात जालना जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, महसूल विभाग, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, वित्त विभाग, सहाय्यक सचिव, (तांत्रिक) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, ए. आय. जी. एल ॲन्ड ओ. अवर सचिव, ग्रामविकास विभाग, अवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, कक्ष अधिकारी, महिला व बालविकास विभाग, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, उपनिबंधक, सहकारी संस्था, सहकार आयुक्त कार्यालय तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जालना यांची साक्ष घेतली.

## बैठकीचे कार्यवृत्त

पंचायत राज समिती (Panchayati Raj Samiti) ची बैठक बुधवार, दिनांक ०३ मार्च २०२१ रोजी ०३:०० वाजता, विसावा मजला, कक्ष क्र. २००१, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. अनिल पाटील, वि.स.स.

(३) श्री. संग्राम जगताप, वि.स.स.

(४) श्री. शेखर निकम, वि.स.स.

(५) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

(६) श्री. माधवराव जवळगावकर पाटील, वि.स.स.

(७) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.

(८) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

(९) श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर, वि.स.स.

(१०) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. किशोर आप्पा पाटील, वि.स.स.

(२) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. रंगनाथ खैरे, अवर सचिव (समिती)

(३) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

(४) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत :**

समितीने बैठकीत पाचव्या अहवालाच्या प्रारूपावर विचार करून किरकोळ दुरुस्त्यांसह संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.